पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in
# द पीपल्स पोस्ट
स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १० वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जानेवारी २०२२

# एका वादळी घटनादुरूस्तीची चित्तरकथा




**धर्मसंसदेला फुटताहेत भगवे काटे**
संपादकीय

**परीक्षांमधल्या गोंधळाने बेरोजगारांच्या जीवाला घोर**
भास्कर नाशिककर

**फॅसिझमचे मूळ : मनुस्मृती**
बी.जी. वाघ

# वाचकांची पत्रे

## आरक्षणावरील लेख उत्तम

१६ ते ३१ डिसेंबरच्या अंकातील 'आरक्षण: न्याय पुनर्रचनेची नितांत गरज' हा प्रा. अविनाश कोल्हे यांचा लेख अभ्यासपूर्ण होता. आरक्षणाने सर्वच लाभार्थ्यांना फायदा झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे समाजात अस्वस्थता आहे. ही अस्वस्थता संपुष्टात आणण्यासाठी सात दशकांपासून राबवण्यात येत असलेल्या आरक्षण धोरणाची पुनर्रचना गरजेची बनली आहे, या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. ओबीसी, मराठा, मुस्लिम आणि धनगर आरक्षणाचा तिढा लवकर सुटण्यासाठी आरक्षण धोरणाची पुनर्रचना लवकरात लवकर करणे गरजेचे आहे. प्रा. कोल्हे यांचा लेख आरक्षणाशी संबधित घटनांचं विश्लेषण करून लिहिल्यामुळे तो वाचनीय वाटला.

**– सुनंदा पाटील,** नांदेड

## आरक्षणाचा तिढा सुटलाच पाहिजे

आरक्षण धोरणाच्या पुनर्रचनेची गरज अधोरेखित करणारा प्रा. अविनाश कोल्हे यांचा लेख उत्कृष्ट होता. मराठा, धनगर आणि मुस्लिमांच्या आरक्षणाची मागणी लक्षात घेऊन आरक्षण धोरणाची पुनर्रचना लवकरात लवकर करणे आवश्यक बनले आहे. या लेखाबद्दल लेखकाचे अभिनंदन.

**– दयानंद कांबळे,** परभणी

## पत्रकारांचं 'न्याय्य' वर्तन हवं

'प्रबोधनकारी महाराष्ट्रातून बहुजनांनाच का केले डिलीट?' हा डॉ. श्रीमंत कोकाटे यांचा लेख पक्षपाती लिखाण करणाऱ्या पत्रकारांचा खरा चेहरा उघड करणारा आहे. पत्रकार गिरीश कुबेर यांनी त्यांच्या पुस्तकात, पुरोगामी महाराष्ट्र घडवणाऱ्या महापुरूषांना डावलून इतरांचं उदात्तीकरण केल्याच्या पार्श्वभूमीवर हा लेख होता. पत्रकारांनी समाजाचं लोकशिक्षण, प्रबोधन करताना त्यांना माहिती देण्याचं काम केलं पाहिजे. पत्रकारिता म्हणजे समाजाचा आरसा असतो. कुबेर यांच्या लिखाणातून समाजाचा विद्रुप चेहरा पुढं आणला जात आहे, हे निषिद्ध आहे.

**– संजय माखेकर,** मुंबई

## बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी कष्ट केलेच पाहिजेत

ग्रंथपरिचय सदरात, 'आठवणी आणि अश्रू' या पुस्तकाचं जे परीक्षण प्रसिद्ध केलं, त्यातून डॉ. बाबासाहेबांचे कटू अनुभव समजले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत हालअपेष्टा सोसून शिक्षण घेतल्यामुळे आमचे दिवस पालटले आहेत. समताधिष्ठित समाज निर्माण व्हावा म्हणून बाबासाहेबांनी कष्ट सोसले. त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आम्हीही काम केलेच पाहिजे.

**– सुनील ग. शिंदे, विद्या पाटील, पुणे**

## एस.टी. कामगारांचे केविलवाणे जिणे

'एस.टी. कामगारांच्या संपाचे त्रांगडे' या लेखात कॉ. भीमराव बनसोड यांनी वस्तुस्थितीवर नेमके बोट ठेवले आहे. या लेखात, एस.टी. कर्मचाऱ्यांचा पगार आणि त्यांच्या एकूण जीवनाची शोकांतिका लेखकाने मांडली आहे. अत्यल्प पगारात जगणाऱ्या एस.टी. कामगारांना विनाविलंब न्याय मिळावा, या दृष्टीने या लेखाची मांडणी होती.

**– वंदना पडघन, पुणे**

## आरक्षणाचा अंक दर्जेदार

द पीपल्स पोस्टचा अंक पोचला. काही लेख चाळले. काही वाचले. १. एकूणच अंक दर्जेदार आहे. २. तुमचं संपादकीय अनेकांना न आवडणारं सत्य सांगतं म्हणून मला विशेष मोलाचं वाटलं. तुमचं हार्दिक अभिनंदन! ३. बी.जी. वाघ आणि अविनाश कोल्हे यांचे लेख या अंकातले महत्त्वाचे लेख आहेत. कोल्हेंचा लेख थांबला तिथं थांबायला नको होता. कारण इथूनच तर प्रश्न सुरू होतो. आरक्षणाच्या धोरणाची न्याय्य पुनर्रचना हेच तर त्यांच्या लेखाचं प्रतिपाद्य आहे. म्हणूनच लेखात पुनर्रचनेचं प्रारूप अभिप्रेत होतं. लेखातील इतर इतर माहिती मौलिकच आहे. अंकातील इतरही लेख महत्त्वाचे आहेत. अभिनंदन!

**– यशवंत मनोहर, नागपूर**

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | 8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

• **वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १० । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जानेवारी २०२२

संपादकीय ४

परीक्षांमधल्या गोंधळाने बेरोजगारांच्या जीवाला घोर
– भास्कर नाशिककर ६

एका वादळी घटनादुरूस्तीची चित्तरकथा
– प्रा. अविनाश कोल्हे ९

...तरच शक्ती कायदा प्रभावी ठरेल
– रेणुका कड १६

हवा दिल्लीची : लोकशाहीसाठी शिखर परिषद आणि सद्यस्थिती
– विजय नाईक १८

धर्म एक चक्रव्यूह : फॅसिझमचे मूळ : मनुस्मृती
– बी. जी. वाघ २१

फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा गोव्यात जागर
– प्रा. डॉ. रोहिदास जाधव २६

डॉ. आंबेडकरांचे देदीप्यमान विद्यार्थीजीवन आणि शैक्षणिक तत्त्वज्ञान
– भीमराव सरवदे २८

व्यक्तिविशेष : विचारवंत अन् शिक्षणतज्ज्ञ : डॉ. जनार्दन वाघमारे
– प्रतिनिधी ३१

ग्रंथ परिचय : सात शतकांचा विविधांगी पट असलेली कादंबरी: सातपाटील कुलवृत्तांत
– प्रा. डॉ. शंकर विभुते ३३

कविता : नाती मनातली – डॉ. संगीता जी. आवचार
बापाची दिवाळी – माधव जाधव ३५

आज-कालचे प्रश्न ३७

कोण काय बोलतं ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

# संपादकीय

# धर्मसंसदेला फुटताहेत भगवे काटे

अयोध्येतील वादग्रस्त वास्तू पाडण्यापूर्वी काही भगव्या नेत्यांनी आणि टिकेकऱ्यांनी, 'आम्ही येत आहोत', असा पुकारा रथयात्रा काढून केला होता. पुकारा खरा ठरला आणि टप्प्याटप्प्याने का होईना ते आले. सुरुवातीला अडखळलेले आणि आता चांगले ध्रुवासारखे स्थिरस्थावर झाले. पन्नास वर्षे आम्हाला कोणी हलवणार नाही असा त्यांचा दांडगा विश्वास आहे. या विश्वासाला भरभक्कम पाया मिळावा म्हणून आता नवा राष्ट्रवाद आणि नवा धर्मवाद यांचा पुकारा चालू आहे. पहिली पाच वर्षे भारतातील सगळ्या लोकांचा डीएनए सारखाच आहे, असे सांगत इथं हिंदूशिवाय दुसरे कोणी नाही, हे सिद्ध करणारा नवसिद्धांत डार्विनला डोक्यावर उभं करून सांगण्यात आला. या सिद्धांतामुळे स्वाभाविकच अल्पसंख्याकांमध्ये असुरक्षिततेची भावना तयार झाली. आम्ही कोणी आहो नाही आहोत, आम्ही तेच आहोत मग जे आम्ही होतो त्याचं काय, असाही प्रश्न तयार होणे स्वाभाविकच होते. तो तसा तयार होणे अर्थातच यांच्या हिताचेच होते. आता धर्मवाद्यांची मदत घेऊन हा सिद्धांत अधिक आक्रमक करण्याचा प्रयत्न सुरू झाला. ठिकठिकाणी धर्मसंसदा भरवल्या जाऊ लागल्या. पूर्वी कधीही नव्हत्या इतक्या त्या आक्रमक होऊ लागल्या. एरव्ही दया, क्षमा, शांती, बंधूभाव, सत्य की जय हो वगैरे सांगणारे धर्मवादी आता आपल्या धर्माविषयी अधिक हळवे आणि तेवढेच आक्रमक बनू लागले. या भावनेतून धर्माधिष्ठित म्हणजे हिंदू राष्ट्राचा जन्म होणार आहे. काहींनी तर त्याची तारीखही जाहीर केली आहे आणि तसे न झाल्यास आत्मदहनाचा इशाराही देऊन ठेवला आहे. गेल्या काही वर्षांपासून आत्महत्या हाही परवलीचा शब्द झाला आहे. आता आत्महत्येला कोणतेही कारण चालते. समाधी घेऊन शेवटचा श्वास सोडणारे म्हणून ज्यांची पारंपारिक ओळख आहे, तेही आत्महत्येचा इशारा देऊ लागले आहेत. तर माझाच देश, माझाच धर्म या नाऱ्यात अनेकांची भावना सशासारखी झाली आहे. पाठीवर गवताचं पान पडलं तरी सशाला घाबरल्यासारखं वाटतं. आता माणसाकडेही सशाचं काळीज आलं आहे किंवा त्याला ते कल्याणकारी योजनांचा संकोच होण्याच्या काळात मिळते आहे.

भगव्या किंवा धर्माधिष्ठित राष्ट्राला सर्वात मोठा अडथळा असतो तो स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि सामाजिक न्याय या मूल्यांची एक सुरेख माळ विणणाऱ्या राज्यघटनेचा म्हणजेच संविधानाचा. तसं तर जयपूरच्या उच्च न्यायालयासमोर मनुचा पुतळा केव्हापासून उभाच आहे. या पुतळ्याच्या पलिकडे जाऊन काही साधूंनी धर्मसंसदेत संविधानाला भगवा रंग देऊन ती आणली. मूळ रंगालीही राज्यघटना नाकारली. काहींनी संस्कृत किंवा हिंदी भाषेतील धर्मवादी राज्यघटनेची अपेक्षा व्यक्त केली. काहींनी ती नाकारली. खरं तर, राज्यघटनेची निर्मिती होत असतानाच अनेक बुवाबाबांनीही भावी राज्यघटना देवाधर्माला अर्पण करावी, असा आग्रह धरला होता. पण डॉ. आंबेडकर, नेहरू यांच्यासारख्या खंबीर धर्मनिरपेक्षवाद्यांनी त्यांची डाळ शिजू दिली नाही. आता या महान नेत्यांची जागा मोकळीच राहिल्याने कुणीही काहीही मागणी करते आहे. धर्मवाद्यांचं साधं सरळ सोप गणित आहे आणि ते म्हणजे म. गांधी, नेहरू, आंबेडकर यांच्यासारखे नेतेच हिंदू राष्ट्राच्या आड होते. रोज त्यांची निंदानालस्ती सुरू आहे. आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेची रोज निंदानालस्ती करायची, संविधानाऐवजी मनू मिरवायचा आणि गांधी-नेहरूंना तर फाळणीचे गुन्हेगार ठरवायचे. त्यातही म. गांधी म्हणजे राष्ट्रपिता, राष्ट्रनायक नव्हे तर जणू काही खलनायकच. धर्मसंसदेत त्यांच्यावर मुक्तपणे तोंडसुख घेतले जाते. अनेक आरोप त्यांच्यावर केले जातात. त्यांना कसला आधार आहे ना कसलं औचित्य आहे. म. गांधी यांना खोडायचं आणि नथुराम गोडसेचा जयजयकार करायचा. स्टेजवर नथूरामाचा पुतळा आणायचा. त्याची पूजा करायची. त्याच्यावर सिनेमे काढायचे. त्याच्यावर नाटक कारायचे. जणू काही गांधींचा खुनी गोडसेच राष्ट्राचा निर्माता आणि नायक आहे. गांधी हत्येसाठी जणू काही त्याला पुरस्कार आहे. साधू-संतांच्यामार्फत हे घडवून आणलं जातंय कारण साधूंना कोण विचारणार? आम्ही गांधींना काहीही बोलू, कोण आमचं वाकडं करणार, अशा मग्रूरीच्या भूमिकेत काही साधू गेले आहेत. अर्थात, हे स्वयंघोषित साधू आहेत.

कोणतं तरी नृत्य केल्यानं साधू बनलेल्या एकानं तर काही झालं तरी मी गांधीनिंदेबद्दल माफी मागणार नाही. मला फासावर चढवा, तुरूंगात टाका तरी मी माफी मागणार नाही असं पुनःपुन्हा सांगितलं. त्याच्याविरूद्ध शेवटी गुन्हा दाखल झाला. दुसऱ्या एका भगव्या साधूनं त्याच्यावर टीका केली. धर्मसंसदेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. काही कायदेतज्ज्ञांनी सर्वोच्च न्यायालयाकडे निवेदन दाखल केले. पण हे सारे करूनही भगव्यावर दिसणारा काटेरीपणा काही कमी व्हायला तयार नाही.

धर्मसंसदेत धर्माच्या आणि राष्ट्राच्या नावाखाली द्वेषाची भाषा अधिक झाली. आता द्वेष कुणाचा करणार तर मुस्लिमांचा.



हिंदू राष्ट्राच्या आड त्यांचीच एक अडचण यांना वाटत असावी. कोण्यातरी साधूने शोध लावला, की २०२९ सालच्या निवडणुकीत मुस्लिम व्यक्ती पंतप्रधान होणार आहे. खरं तर, तसं झाल्यास वाईट वाटण्याचं काही कारण नाही. धर्मनिरपेक्ष असलेल्या देशात मुस्लिम राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री आणि न्यायाधीश झाला आहे. कोणत्याही पदावर जाण्यासाठी व्यक्तीची जात आणि धर्म महत्त्वाचा नाही, असे आपली राज्यघटना सांगते. इथं महिलाही राष्ट्रपती, पंतप्रधान झाली. तशी ती पाकिस्तान, बांगलादेशातही पंतप्रधान झाली. जर्मन, इंग्लंड या देशातही झाली. जग खूप पुढं निघालं आहे. सर्व प्रकारचे भेदाभेद तोडत निघालं आहे. भारतही अशाच मार्गावर आहे. पण साधू-संतांना कोण सांगणार? सर्वजण परमेश्वराची लेकरे आहेत असे ते एकीकडे सांगतात आणि दुसरीकडे, मुस्लिम पंतप्रधान होईल असे भाकीत करत जणूकाही सामान्य माणसाच्या पोटात भीतीचा गोळा निर्माण करतात. पण असं आम्ही घडू देणार नाही, कारण मुस्लिम पंतप्रधान हिंदू राष्ट्रात नको असं सांगतात. अमेरिकेत भारतीय वंशाची महिला म्हणजे हिंदू वंशाची महिला उपाध्यक्ष कशी होते, जग कुठं निघालं आहे यावर ते भाष्य करत नाहीत. २०२९ पर्यंत मुस्लिम आपली लोकसंख्या दुप्पट वेगाने वाढवणार आहेत आणि जणू काही राष्ट्र बळकावणार आहेत, असे काही साधूंना वाटते. हिंदू राष्ट्र लवकर जाहीर करावे, असा तगादा त्यांनी लावला आहे. या साधूंना ना इतिहास ठाऊक ना तो समजून घेण्याची इच्छा आहे. स्वातंत्र्यापूर्वी अशी अनेक संस्थाने आपण पाहिली आहेत, की हिंदू प्रजेचा राजा मुस्लिम आणि मुस्लिम प्रजेचा राजा हिंदू होता. यातील कोणत्याही गोष्टींशी धर्मसंसदेशी काहीही देणेघेणे नाही. तिच्या विषयपत्रिकेत आता धर्म कमी आणि राजकारण जादा, धर्म कमी आणि द्वेष जादा, काळजात गोळी घुसल्यावर हे राम म्हणणारे गांधी कमी आणि गोळी मारणारे गोडसे जादा दिसत आहेत. धर्मसंसद धर्माऐवजी मूलतत्त्ववादाचा प्रचार-प्रसार करण्याचे काम अधिक करते आहे का, असे वाटण्यासारखी स्थिती आहे. बाकी लोकशाहीवादी देशातही धर्म आहेत. पण तेथे धर्माचे प्रमुख किंवा ठेकेदार संसदेत कधी निवडून जात नाहीत. त्यांनी आपलं आपलं रिंगण आखून घेतलं आहे. आपल्याकडे अनेक साधू-सन्याशी आणि सन्याशीनी सत्तेची खुर्ची उबवताना दिसतात. अर्थात, राज्यघटनेमुळेच आपल्याला हे मिळाले आहे धर्मामुळे नाही, हेही ते समजून घ्यायला तयार नाहीत किंवा तसं ते समजून घेतले तर त्यांना ते महागात पडणार आहे. शेवटी प्रश्न एकच उरतो आणि तो म्हणजे या सर्वांना बळ कोठून मिळतंय? भाकरीपेक्षा, नोकरीपेक्षा, महामारीपेक्षा मंदिर मोठं हे जनतेच्या मनात कोण भरवतंय? याचं उत्तर सर्वांनाच ठाऊक आहे. सत्तेत म्हणजे लोकशाही रचनेत गेल्यावरही आपला पूर्वीचा ड्रेस घालून मिरवणारे त्यात आहेत. सत्तेत जाऊन राजकारणाचे संचित मिळवणारे त्यात आहेत. धार्मिक दंगलीत, जातीय दंगलीत, जात पंचायतीत, कोरोनाच्या जबड्यात मरणारे लोक धर्मसंसदेला सहसा दिसत नाहीत. लोकसंख्या वाढवायला निघालेले लोक मात्र यांना दिसतात. आपल्या देशात हिंदूंचीच नव्हे तर मुस्लिमांचीही लोकसंख्या झपाट्यानं कमी होते आहे. दिल्लीतल्या सरकारची आकडेवारीही तेच सांगते. पण साधू आत्मज्ञानी, स्वयंप्रकाशित असल्यानं त्यांना कोण सांगणार? शेवटी लोकांनीच समजून घ्यायला हवे. त्यासाठी म. फुल्यांचे अखंड समजून घ्यायला हवे.

**जगामाजी धर्म अगणित होती**
**लढाया खेळती रेड्यापरी!**
**रेडे धरणारे प्राणास मुकती**
**कोणी म्हणती जन्नतीस गेले**
**कोणी म्हणती स्वर्गी गेले, मार्टर झाले**
**सद्विवेकाविन सर्व भांबावले**
**रक्तपाती झाले जोती म्हणे!**

आपल्याला रक्तपाती व्हायचे नाही, एवढेच नव्या वर्षात लक्षात ठेवायला हवे. जगामाजी धर्म अगणित होती, लढाया खेळती रेड्यापरी!

**रेडे धरणारे प्राणास मुकती,**
**कोणी म्हणती जन्नतीस गेले, स्वर्गी गेले,**
**मार्टर झाले, असेही म्हणती,**
**सद्विवेकाविन सर्व भांबावले, रक्तपाती झाले जोती म्हणे!**

●●●

# परीक्षांमधल्या गोंधळाने बेरोजगारांच्या जीवाला घोर

*राज्य सरकारचा आरोग्य विभाग, म्हाडा आणि शिक्षक पात्रता परीक्षा तसेच पोलिस भरतीतील गैरप्रकारांमुळे पदभरतीतील सावळा गोंधळ पुढे आला आहे. यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा तसेच भरती प्रक्रिया नव्याने राबविण्याचा निर्णय सरकार घेत आहे. यातून राज्यातील बेरो- जगारांमध्ये चिंतेचे वातावरण पसरल्याचे दिसते.*

**भास्कर नाशिककर**



राज्य सरकारच्या विविध खात्यांतील नोकरभरती आणि त्यासाठीच्या परीक्षा प्रक्रियेतील संतापजनक सावळ्या गोंधळाने उभा महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या गोंधळाची सुरुवात झाली ती आरोग्य खात्याच्या परीक्षेतील गैरप्रकाराने. त्याच्या तपासातून विविध परीक्षांमधीलही सावळा गोंधळ उघड होत गेला, तसतसे कुंपणानेच शेत गिळंकृत केल्याचे निदर्शनाला येऊ लागले आहे. आरोग्य विभाग, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी), पोलिस भरती अशा एकामागून एक घडणाऱ्या परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांनी महाराष्ट्रातील बेरोजगार तरूण हादरून गेला आहे. हे सत्र अद्याप थांबलेले नाही. गैरप्रकाराच्या आणि गैरकारभाराच्या आणखी किती सुरस आणि रंजक कथा बाहेर येतील, याचा अंदाज अद्याप येत नसला तरी, तपासाची गती आणि दिशाच त्याची व्याप्ती ठरवेल, हे निश्चित.

गेल्या सप्टेंबरच्या आसपास आरोग्य खात्यातील परीक्षांचा घोळ पहिल्यांदा समोर आला. विविध पदे आणि पात्रतांच्या परीक्षांकरता उमेदवारांनी दिलेली केंद्रे, वेळा यांच्यात तफावत आढळली. काहींना देशाच्या विविध भागातील, एवढेच नव्हे तर चीनमधील काही शहरेदेखली परीक्षा केंद्र म्हणून दिली गेली. त्याने उडालेल्या गोंधळाने कामकाजातील ढिसाळपणा समोर आला. त्याचा गवगवा झाला आणि परीक्षा रद्द करावी लागली. न्यासा नावाच्या कंपनीकडे याचे काम दिले होते. मुळात कारभाराबाबत ही संस्था बदनाम होती. तिच्या कामकाजाबाबत देशातील विविध राज्यांत ओरड होती, तरीही तिला पावन करून काम दिले होते. नंतर विविध गटांच्या परीक्षांचा बिगुल वाजला आणि तेवढ्याच दणक्यात पेपरफुटीचे प्रकार समोर आले. गट ड पाठोपाठ गट क चाही पेपर फुटला. एकूण शंभरपैकी ९२ प्रश्न फुटल्याचे निदर्शनाला आले. पेपर काढणाऱ्या समितीतील डॉ. बोटले आणि सहकाऱ्यांना अटक झाली. याबाबत पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**म्हाडाच्या परीक्षेने फुटले बिंग**

आरोग्य खात्यातील पेपरफुटीचा तपास पूर्ण होण्याआधीच महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) १२ डिसेंबरला होणाऱ्या परीक्षेचे पेपर फुटल्याचे निदर्शनाला आले. त्यामुळे पेपर रद्द करण्यात आल्याची घोषणा करण्याची नामुष्की राज्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यावर ओढवली. तथापि, त्यांनी मध्यरात्री केलेल्या याबाबतच्या घोषणेने उमेदवारांमध्ये संताप व्यक्त झाला. मात्र उमेदवारांचे हाल होऊ नयेत, त्यांचा प्रवास खर्च आणि वेळ यांचा अपव्यय टाळण्याचा मंत्र्यांचा सद्हेतू साध्य होऊ शकला नाही. तथापि,

फुटलेल्या पेपरवर परीक्षा न झाल्याने मोठा अनर्थ टळला. अखेर म्हाडाची परीक्षा स्वतः म्हाडाच घेणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

येथून खरे तर परीक्षांच्या गैरप्रकारातील गौडबंगाल, त्यामागे असलेले अस्तनीतले निखारे, अधिकारी आणि परीक्षांसाठी कोचिंग क्लास चालवणारी मंडळी, शॉर्टकटने यश मिळवू पाहणारे उमेदवार यांच्यातील लागेबांधे आणि त्यांची राज्यात सर्वदूर पसरलेली साखळी उघड होऊ लागली. गैरप्रकाराच्या सुरस कहाण्या, त्यातून जमा केली गेलेली अमर्यादा माया आणि त्याची व्याप्ती समोर येऊ लागली. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार समोर येऊ लागला. सरकार आणि परीक्षा घेणारी यंत्रणा आणि यातील खाते यांच्यासाठी काम करणाऱ्या माहिती तंत्रज्ञानातील कंपन्यांनी केलेला विश्वासघात, कामाच्या मूल्यांशी केलेली प्रतारणा उघडकीला आली. म्हाडाच्या परीक्षांचे काम डॉ. प्रीतिश देशमुख याच्या जी.ए. सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी या कंपनीला दिलेले होते. एमबीबीएस झालेल्या या व्यक्तीला गुणवत्तेशी काही देणेघेणे नव्हते. गैरमार्गाने बक्कळ पैसा कमवून मोठे व्हायचे होते. म्हणून तो स्वतः आणि त्याचे साथीदार अंकुश हरकळ आणि संतोष हरकळ यांनी गैरमार्गांचा अवलंब केला. पेपरफुटीतील त्यांचा सहभाग स्पष्ट झाल्याने त्यांना पोलिसांनी गजाआड केले आहे. देशमुखच्या घराची झडती घेतल्यावर अनेक पेनड्राईव्ह, शिक्षक पात्रता परीक्षेतील (टीईटी) उमेदवारांची कागदपत्रे, लॅपटॅप सापडले. त्यावरील तपासातून टीईटी परीक्षेतही झालेले गैरप्रकार उघडकीस आले.

म्हाडाच्या १४ पदांच्या ५६५ रिक्त जागांकरता १२, १५, १९ आणि २० डिसेंबर रोजी परीक्षा होणार होत्या. त्याचदरम्यान, 'घरातल्या वस्तूंचे पुढे काय?', या प्रश्नार्थक वाक्याने तपास यंत्रणेसमोर प्रश्नचिन्ह निर्माण केले. १०-११ डिसेंबर दरम्यानची ही घटना. यंत्रणांनी या कोडवाक्याचा छडा लावताना घरातील म्हणजे म्हाडाच्या आणि वस्तू म्हणजे परीक्षा असा अर्थ लावला गेला आणि म्हाडा परीक्षेचा पेपर फुटत असल्याचे ११ च्या रात्री लक्षात आले आणि परीक्षा रद्द केल्याची घोषणा करावी लागली. अंकुश आणि संतोष हरकळ तसेच देशमुख यांच्या अटकेनंतर सगळ्या प्रकाराचे बिंग पोलिसी खाक्या दाखवल्यावर फुटत गेले.

**जी.ए. कंपनीला केले पावन**

जी.ए. सॉफ्टवेअर कंपनीला तीन वर्षांच्या कराराने २०१७ मध्ये काम दिले होते. कंपनीने आपल्या कामकाजात अनेक चुका केल्या; तरीही सरकारमधील अधिकारी मंडळी कंपनीच्या पाठीशी उभी राहिली; नव्हे त्यांनी चुकांवर पांघरूण घालून कंपनीला पाठीशी घातले, असे आता समोर येते आहे. आरोग्य विभाग, म्हाडा आणि टीईटी या परीक्षांच्या तांत्रिकतेची बाजू सांभाळण्याची जबाबदारी जी.ए. सॉफ्टवेअरच्या शिरावर होती. मात्र या कंपनीने सरकारशी विश्वासघात केल्याचे उघडकीस आले आहे. शिवाय या कंपनीकडे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची संगणकीय कामे, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना शिष्यवृत्ती (एनएमएमएस), राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (एनटीएस), पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा, शिक्षक पात्रता परीक्षा अशी खूप मोठी जबाबदारी होती. आता



**देशात बेरोजगारी एवढी वाढली आहे, की कोणत्याही पदभरतीसाठी प्रचंड संख्येने बेरोजगारांची उपस्थिती दिसते.**

कंपनीने या सगळ्या बाबतीत केलेल्या कामकाजावरच यामुळे मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कंपनीने केलेली रास्त कामेदेखील संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहेत. कंपनीच्या कामकाजातील संशयामुळेच परीक्षा परिषदेची कार्यकारी समिती आणि वित्त समितीने कंपनीला काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय केला होता. तसे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त तुकाराम सुपे यांनी १ जून २०२० रोजी कंपनीला कळवलेदेखील होते. त्याबाबत जी.ए. सॉफ्टवेअरने १९ जून आणि ६ जुलै रोजी सरकारला पत्राद्वारे आपल्याला काळ्या यादीतून बाहेर काढावे, अशी विनंती केली होती.

खरे तर, जी.ए. कंपनीचे सगळे कारनामे आणि त्यांचा गैरप्रकार यांची पुरती माहिती असलेल्या परीक्षा परिषदेचा आयुक्त सुपे याने कंपनीला तात्पुरते नव्हे कायमचे काळ्या यादीत टाकून तिच्याशी असलेल्या सरकारी कामकाजाची कायमची काडीमोड करायला हवी होती. पण ज्याच्यावर सरकारी अधिकारी म्हणून तळे राखण्याची, म्हणजेच निरपेक्ष, वशिलाविरहीत, गैरप्रकारविरहीत वातावरणात परीक्षा घ्यायची जबाबदारी दिली होती, त्या सुपे नामक आयुक्त पदावरील अधिकाऱ्याने गैरप्रकार आणि गैरकारभाराला हातभार लावल्याचे आता स्पष्ट होत आहे. त्यामुळेच जी.ए. कंपनीची सरकारला फसवण्याचे आणि एवढेच नव्हे तर उगवत्या पिढीच्या भवितव्याशी खेळण्याचे धाडस वाढत गेले. या सगळ्यांचे खापर आपसूकच सरकारच्याच माथी फुटत आहे.

**सुपेकडे बक्कळ माया**

या सगळ्या प्रकरणांमध्ये परीक्षा परिषदेचा आयुक्त तुकाराम सुपे हाच केंद्रस्थानी आहे, असे जवळजवळ स्पष्ट होत आहे. सुपेने दिलेले बळ, उभा केलेला पाठिंबा, काळ्या यादीतून जी.ए. कंपनीला बाहेर पडायला केलेली मदत, नैसर्गिक न्याय, आकस्मिक परिस्थितीच्या कारणांचा बागुलबुवा उभा करून कंपनीला पुन्हा कामाची दिलेली संधी यामुळे राज्यातील विविध खात्यांच्या परीक्षा प्रक्रियेचा सगळा खेळखंडोबाच झाला. याच सुपेने २०१८ पासून टीईटी परीक्षेत गैरप्रकार केल्याचे, अपात्र ठरलेल्यांना पात्र ठरवून गंगेत घोडे न्हाऊन टाकण्याचा जो प्रकार केला, तो आता उघड होऊ लागला आहे. सुपे आणि त्याचा साथीदार, शिक्षण विभागातील तांत्रिक सल्लागार अभिषेक सावरीकर याला अटक केल्यानंतर अनेक बाबी आता उघड होऊ लागल्या आहेत. सुपेकडून ८८ लाख रुपयांची रोकड, मुदतठेव, दागदागिने असे एकूण एक कोटी रुपये जप्त केले गेले.

सुपेची मुलगी, जावई, जावयाचा मित्र यांच्याकडून दोन कोटींवर रकमेची मालमत्ता पोलिसांनी तपासाअंती जप्त केली आहे. एवढी प्रचंड माया सुपेने राज्यातील युवकांच्या सरकारी नोकरीच्या स्वप्नांचा चुराडा करून जमा केली असल्याचे उघड होते आहे. परीक्षांमधील गैरव्यवहार आणि घोटाळाप्रकरणी आतापर्यंत पाचवर गुन्हे दाखल झाले असून तीसच्या आसपास लोकांना गजाआड केले आहे. सुमारे पाच कोटींवर रकमेची मालमत्ता जप्त केली आहे. एवढेच नव्हे तर, या जी.ए. सॉफ्टवेअर कंपनीकडे राज्यातील वीस जिल्ह्यातील पोलिस भरती प्रक्रियेची तांत्रिकतेची बाजू सांभाळण्याची जबाबदारी दिलेली होती. त्याच्याही कामकाजावर यानिमित्ताने मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ती प्रक्रियाही संशयाच्या वादळात सापडू शकते.

**अशी होते निवड**

महाराष्ट्र महाआयटी आणि जीएडी या यंत्रणा परीक्षा घेण्यासाठी तांत्रिकतेची बाजू कोणावर द्यावी, यासाठी नियमन, अभ्यासाअंती शिफारस करण्याची जबाबदारी सांभाळत असतात. आपल्याकडे जिंजर, आपटेक, मेटा, जीए, न्यासा या खासगी क्षेत्रातील कंपन्या तांत्रिकतेची बाजू सांभाळत असतात. आरोग्य विभागाच्या परीक्षेत न्यासा ही कंपनी गुंतलेली आहे. या कंपन्यांच्या कारभाराची गुणवत्ता, क्षमता, त्यांचा व्यावसायिक प्रामाणिकपणा अशा निकषांवर त्यांना काम दिले जाते. यातील काही कंपन्या देशातील अन्य राज्यांतील परीक्षांकरता सेवा पुरवत असतात. त्यांच्या कारभाराच्या गुणवत्तेवर जशी कामे दिली जातात, तशी ती काढूनही घेतली जातात. त्यांचे काम बंद करण्यासाठी त्यांना काळ्या यादीतही टाकले जाते. या सूत्रानुसार, आपल्याकडील यंत्रणा जी.ए. सॉफ्टवेअर अँड टेक्नॉलॉजी अधिक प्रेमात पडल्याचे आणि त्या कंपनीने गुण उधळल्याचे लक्षात आले आहे.

**पंधरा हजार रिक्त पदे**

सध्या राज्याच्या विविध खात्यातील सुमारे पंधरा हजारांवर पदांकरता नोकरभरतीची घोषणा सरकारने केलेली आहे. कोरोना महामारीने या भरती प्रक्रियेला खीळ बसत आहे. सरकारने परीक्षा घेण्याचे नियोजन करूनही ते प्रत्यक्षात यायला विलंब लागत आहे. त्यात असले गैरप्रकार उघडकीला आल्याने प्रक्रियाच वादाच्या आणि संशयाच्या भोवऱ्यात अडकत आहे. काही शेकडा पदांकरता चार-पाच लाखांच्या आसपास उमेदवार राज्यातील विविध केंद्रांवर परीक्षेस बसत असतात. त्याकरता प्रत्येकजण चार-पाचशे रुपये शुल्क भरतो, प्रवासखर्च करून केंद्र गाठतो आणि परीक्षा देत असतो. जेमतेम ऐपत असलेली मुले रोजगाराची हुकमी, वशिलाविरहीत आणि आपल्या गुणवत्तेवर संधी मिळेल, या आशेने या परीक्षांचा मार्ग अवलंबत असतात. मात्र परीक्षांतील अशा गैरप्रकारांमुळे त्यांच्या पदरी निराशाच पडत असते. एकूण सरकारी यंत्रणेवरील त्यांच्या विश्वासाला तडा जातो. याची चाड सरकारने आणि त्याची प्रतिनिधी म्हणून मिरवणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनी ठेवली पाहिजे.

**जागतिक कंपन्यांचा विचार व्हावा**

कोरोना महामारीने मुळातच शहरी तसेच ग्रामीण भागात बेरोजगारी झपाट्याने वाढत आहे. सरकार कितीही सांगत असले तरी सरकारी नोकऱ्यांतील रोजगाराच्या संधी आटत चालल्या आहेत. सरकारी सेवेतील अनेक पदे व्यपगत होत आहेत म्हणजेच कायमस्वरुपी संपुष्टात येत आहेत. अशा स्थितीत सरकारी नोकरभरतीत होणारे असले गैरप्रकार युवकवर्गात चुकीचा संदेश देत आहेत. हे लक्षात घेऊनच सरकारने मुळात आपल्या कामकाजातील असले झारीतील शुक्राचार्य तातडीने दूर करावेत. शिवाय, विविध खात्यांतील विविध पदांकरता सातत्याने परीक्षा घेण्याचे प्रकारदेखील कसे टाळता येतील, याचा विचार सरकारने करावा. त्याऐवजी सरकारी पदांच्या पात्रता आणि गुणवत्तेनुसार पदांकरता एकच परीक्षा घ्यावी. तिच्या निकालावर विविध खात्यांतील सेवेची संधी उत्तीर्णांना द्यावी. शिवाय, सध्याच्या ऑटोमेशनच्या जगात सरकारने स्वतःमध्येच तांत्रिकतेची बाजू सांभाळण्याकरता पात्रता निर्माण करावी किंवा जागतिक दर्जाची सेवा पुरवणाऱ्या टीसीएस, इन्फोसिस, विप्रोसारख्या कंपन्यांकडे तांत्रिकतेची कामे द्यावीत, जेणेकरून कामकाजात अचूकता राहील, गैरप्रकाराला आळा बसेल, गुणवत्ता जोखून घेतली जाऊन पात्र उमेदवारांनाच संधी मिळेल. राज्यातील लाखो युवकांच्या मनात सरकारच्या कारभाराबाबत निर्माण झालेले मळभ दूर होईल. ●●●

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत)**



## *महाराष्ट्रातील बेरोजगारी : गंभीर समस्या*


*पिरियॉडिक लेबर फोर्सच्या (पीएलएफएस) सर्वेक्षणा-नुसार, महाराष्ट्रातील बेरोजगारीत मोठी वाढ झाली असून त्यात कोरोना महामारीने भर घातली आहे. विशेषतः शहरी भागातील बेरोजगारी वाढली आहे. देशातील बेरोजगारी ८ टक्क्यांवर आहे. गेल्या वर्षीच्या एप्रिल ते जून या कालावधीत राज्याच्या शहरी भागात हा दर ३५.६ टक्के आणि जुलै ते सप्टेंबर या कालावधीत २२.६ टक्के होता. याच काळात बेरोजगारीचा राष्ट्रीय सरासरी दर अनुक्रमे २०.९ टक्के आणि १३.३ टक्के होता. राज्यातील कोणत्याही भरती परीक्षेला सरासरी ४ ते ५ लाख उमेदवार अर्ज भरत असतात. विशेषतः ग्रामीण युवकांत अधिक लोकप्रिय असलेल्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला सरासरी ७ ते ८ लाख युवक हजेरी लावतात. असे असले तरी राज्यात कुठल्याही सेवेच्या जागा काही शेकड्यातच असतात. हे विदारक चित्र लक्षात घेता, महाराष्ट्रातील बेरोजगारीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येते.*

# एका वादळी घटनादुरूस्तीची चित्रकथा



प्रा. अविनाश कोल्हे

*आपल्या राज्यघटनेत शंभरावर दुरूस्त्या झाल्या आहेत. पहिली घटनादुरूस्ती मे १९५१ मध्ये झाली. त्यामुळे या घटनादुरूस्तीला ऐतिहासिक महत्त्व आहे. एवढेच नव्हे, तर या घटनादुरूस्तीमुळे देशाच्या मूळ राज्यघटनेत आमुलाग्र बदल करण्यात आल्याची टीकासुद्धा झाली होती. म्हणूनच पहिल्या घटनादुरूस्तीबद्दल सर्व माहिती असणे गरजेचे होते. त्रिपूरदमन सिंग यांच्या 'सिक्सटीन स्टॉर्मी डेज : द स्टोरी ऑफ द फर्स्ट अमेंडमेंट टू द कॉंस्टिट्युशन ऑफ इंडिया' या अभ्यासपूर्ण पुस्तकाने ही गरज भरून काढली आहे.*




राज्यशास्त्रामध्ये 'देशाची राज्यघटना' याला अनन्यसाधारण महत्त्व असते. आधुनिक काळात जगातल्या जवळपास प्रत्येक देशाला स्वतःची राज्यघटना असतेच. अशी राज्यघटना म्हणजे त्या देशाची ओळख असते. उदाहरणार्थ, भारतीय राज्यघटना निधर्मिवादावर आधारित आहे. म्हणून आपली राज्यघटना 'सॉवरीन, सोशॅलिस्ट, सेक्युलर, डेमॉक्रॅटिक, रिपब्लिक' आहे. आपला शेजारी पाकिस्तान 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान' आहे, तर आपला दुसरा महत्त्वाचा शेजारी म्हणजे चीन 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना' आहे. हे केवळ शब्द नसून यातून त्या देशाचा चेहरा जगासमोर येतो. मात्र देशाला चांगली राज्यघटना असणे पुरेसे नाही, तर तिची दुरूस्ती करण्याची वेळ आली तर त्यासाठी काय पद्धत असावी याचीही तरतूद राज्यघटनेत असावी लागते. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर दोन प्रारूपं होती. एक इंग्लंडचं, जिथं लिखित राज्यघटना नसल्यामुळे घटनादुरूस्तीसाठी लोकसभा (म्हणजे तिकडचं हाऊस ऑफ कॉमन्स) आणि राज्यसभेत (म्हणजे तिकडचे हाऊस ऑफ लॉर्डस) संमत झालेला ठराव आणि त्यावर राजेसाहेबांची स्वाक्षरी झाली, की घटनादुरूस्ती होते. या प्रक्रियेला जास्तीत जास्त एक आठवडा लागतो. अतिशय लवचिक पद्धत. दुसरीकडे, अमेरिकेचं प्रारूप होतं, जिथं घटनादुरूस्तीसाठी सरासरी दहा वर्षे लागू शकतात. अमेरिकेत लिखित राज्यघटना आहे. त्यात नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे अमेरिकेतील संसदेने म्हणजे तिकडच्या कॉंग्रेसने घटनादुरूस्ती संमत केली, की ती अमेरिकेतल्या पन्नास राज्यांच्या विधानसभांकडे मतदानासाठी जाते. अमेरिकेत पन्नास घटक राज्ये असल्यामुळे पन्नास विधानसभा आहेत. प्रत्येक विधानसभेत केंद्र सरकारने केलेल्या घटनादुरूस्तीची चर्चा होते आणि मग त्यावर मतदान होते. मतदानात घटनादुरूस्ती स्वीकारली जाते किंवा फेटाळली जाते. अशा प्रकारे पन्नास विधानसभांमध्ये मतदानाला टाकलेली घटनादुरूस्ती कमीत कमी दोन-तीन तृतीयांश राज्यांनी (म्हणजे ५० राज्यांपैकी कमीतकमी ३४ राज्यांनी) संमत केली तरच अमेरिकेत घटनादुरूस्ती प्रत्यक्षात येते.



**डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर येथे आयोजित कॉंग्रेस अधिवेशनात अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मार्गदर्शन केले. याच अधिवेशनात त्यांनी 'संपूर्ण स्वराज्या'ची मागणी करणारा ठराव मांडला होता.**

म्हणूनच अमेरिकेत गेल्या २२७ वर्षांत फक्त २७ वेळा घटनादुरूस्ती झालेल्या आहेत. डॉ. आंबेडकरांनी या सर्व प्रारूपांचा व्यवस्थित अभ्यास करून आपली राज्यघटना कशी दुरूस्त करता येईल, याची तरतूद केली.

### कॉंग्रेसचे लाहोर अधिवेशन महत्त्वाचे

आपली राज्यघटना घटना समितीने तयार केलेली आहे. घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली होती. त्यानंतर अनेक बैठका झाल्या आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना तयार झाली. म्हणून गेली काही वर्षे आपण '२६ नोव्हेंबर' हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करतो. घटना जरी २६ नोव्हेंबर रोजी तयार होती तरी आपण '२६ जानेवारी' या दिवसापासून ती लागू केली. याचा अर्थ, घटना तयार असूनही तब्बल दोन महिन्यांनी लागू केली. कारण भारत सरकारला '२६ जानेवारी' हा मुहूर्त साधायचा होता. यामागे वेगळेच पंचांग होते. डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर येथील रावी नदीच्या किनारी कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. आपल्या स्वातंत्र्यलढ्यात या अधिवेशनाचे फार महत्त्व आहे. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी पंडित जवाहरलाल नेहरू हा चाळीस वर्षांचा तरूण नेता होता. त्यांनी अधिवेशनात 'संपूर्ण स्वराज्य'ची मागणी करणारा ठराव मांडला होता. ही महत्त्वाची घटना होती. तोपर्यंत कॉंग्रेस 'स्वराज्यांतर्गत स्वराज्य' (डॉमिनियन स्टेटस)ची मागणी करत होती. आता त्याच कॉंग्रेसने संपूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. एवढेच नव्हे, तर यापुढे दरवर्षी '२६ जानेवारी' हा दिवस 'संपूर्ण स्वराज्य दिवस' म्हणून साजरा करण्याचे ठरवले. त्यानंतर स्वातंत्र्य मिळेपर्यंत कॉंग्रेसतर्फे दर वर्षी '२६ जानेवारी' हा दिवस साजरा होत असे. प्रत्यक्षात स्वातंत्र्य '५ ऑगस्ट' रोजी आले. अशा स्थितीत २६ जानेवारीचे महत्त्व मागे पडले असते. म्हणून घटना लागू करण्याचा दिवस म्हणून २६ जानेवारीची निवड झाली, ज्या दिवसाला आज आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.

२६ जानेवारी १९५० रोजी लागू झालेली राज्यघटना अवघ्या दीड वर्षांच्या आत म्हणजे मे १९५१ मध्ये दुरूस्त करावी लागली. तेव्हापासून आजपर्यंत आपली राज्यघटना शंभरपेक्षा जास्त वेळा दुरूस्त केली आहे. मराठा आरक्षणाच्या निमित्ताने १०२ आणि १०३ व्या घटनादुरूस्ती चर्चेत होत्या. या आकडेवारीची सरासरी काढली तर दर वर्षी किमान दीडवेळा तरी आपण घटनादुरूस्ती करतो.

### पहिली ऐतिहासिक घटनादुरूस्ती


या सर्व घटनादुरूस्तींपैकी पहिली घटनादुरूस्ती मे १९५१ मध्ये झाली. त्यामुळे या घटनादुरूस्तीला ऐतिहासिक महत्त्व आहे. एवढेच नव्हे, तर या घटनादुरूस्तीमुळे देशाच्या मूळ राज्यघटनेत आमुलाग्र बदल करण्यात आल्याची टीकासुद्धा झाली होती. म्हणूनच पहिल्या घटनादुरूस्तीबद्दल सर्व माहिती असणे गरजेचे होते. ही गरज त्रिपूरदमन सिंग यांच्या अभ्यासपूर्ण पुस्तकाने भरून काढली आहे. त्यांचे 'सिक्सटीन स्टॉर्मी डेज : द स्टोरी ऑफ द फर्स्ट अमेंडमेंट टू द कॉंस्टिट्युशन ऑफ इंडिया' हे पुस्तक पेंग्विन प्रकाशनाने इ.स. २०२० मध्ये प्रसिद्ध केले आहे. २८८ पानांचे हे पुस्तक म्हणजे माहितीचा खजिना आहे. वकील, कायद्याचे अभ्यासक वगैरेंनी हे पुस्तक वाचले तर पाहिजेच; शिवाय संग्रहीसुद्धा ठेवले पाहिजे.

### ६० देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास

अवघ्या दीड वर्षांत भारताला घटनादुरूस्ती करावी लागली. त्याबद्दल टीका झाली. पण त्यात फारसा अर्थ नव्हता. अमेरिकेची घटना जून १७८८ मध्ये लागू झाल्यानंतर लवकरच म्हणजे सप्टेंबर १७८९ मध्ये दहा दुरूस्त्या कराव्या लागल्या. इथे मुद्दा तो नाही. अमेरिकेची राज्यघटना आणि भारताची राज्यघटना यातील सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे, जगात जेव्हा 'लिखित राज्यघटना' हा प्रकारच नव्हता तेव्हा अमेरिकेने लिखित राज्यघटना निर्माण केली आणि अत्यंत स्तुत्य पायंडा पाडला. भारताची राज्यघटना विसाव्या शतकाच्या मध्यावर लिहिली गेली, जेव्हा जगातील सर्व महत्त्वाच्या देशांनी आपापल्या राज्यघटना लिहिल्या होत्या. आपल्या घटना समितीने सुमारे ६० देशांच्या राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास केला होता. एवढा अभ्यास केल्यानंतर जेव्हा दीड वर्षांत दुरूस्ती करण्याची वेळ आली, तेव्हा भुवया उंचावल्या जाणे अगदी नैसर्गिक होते.

**सुरुवातीचे आव्हान**

लेखकाने पहिल्या प्रकरणात याची चर्चा केली आहे. काँग्रेसचा देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सिंहाचा वाटा होता. परिणामी घटना समितीवर काँग्रेसचा वरचष्मा असणं स्वाभाविक होतं. नेमकं याच कारणासाठी महात्मा गांधींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगैरेंसारख्या अनेक बिगरकाँग्रेस नेत्यांना घटना समितीत घेण्याचा आग्रह धरला आणि तडीस नेला. म्हणून नेहरू, पटेलांनी प्रयत्नपूर्वक ही राज्यघटना काँग्रेसची न वाटता सर्व देशाची वाटली पाहिजे याकडे लक्ष दिले (पृ. ८). नाही तर 'इंग्रजांचं राज्य गेलं आणि काँग्रेसचं आलं' अशी भावना बळावली असती.




घटना लागू झाल्यानंतर कसोटीचा काळ सुरू झाला. याचा अचूक अंदाज पटेलांना होता. ते म्हणाले होते, 'स्वातंत्र्यासाठी कष्ट केले. आता ते टिकवण्यासाठी जास्त कष्ट करावे लागतील.' यातील आव्हानं समजून घेतली पाहिजेत. स्वातंत्र्यलढ्याच्या दरम्यान इंग्रजांच्या शासनव्यवस्थेशी देश लढला. आता तीच शासनयंत्रणा भारतीयांकडे आली आहे. आता पुन्हा एकदा शासनाविषयी प्रेम आणि दरारा मनात उत्पन्न करायचा आहे. ही एक प्रकारची विसंगती होती, जी लवकरच वर आली. घटना लागू झाल्याच्या पंधरा दिवसांत ही विसंगती समोर आली. ८ फेब्रुवारी १९५० रोजी मुंबई उच्च न्यायालयाने कम्युनिस्ट असल्याच्या आरोपांवरून ज्या २८ लोकांना तुरूंगात ठेवले होते, त्यांना मुक्त करण्याचा आदेश दिला (पृ.८).

**२८ जणांच्या सुटकेने पहिला धक्का**

मे १९४९ मध्ये मुंबई पोलिसांनी २८ जणांना अटक केली. आठ महिने झाले तरी आरोपपत्र दाखल केले नव्हते. देशाने स्वीकारलेल्या राज्यघटनेतील कलम २२ नुसार अशा प्रकारे विनाआरोपपत्र तुरूंगात ठेवता येत नव्हते. ९० दिवसांपेक्षा जास्त काळ ठेवायचे असल्यास सल्लागार मंडळाची परवानगी घ्यावे लागेल. अटकेत असलेले आरोपी भारतीय नागरिक होते, त्यांना मूलभूत अधिकार होते आणि न्यायपालिकेला त्यांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करायचे होते. त्या २८ जणांनी कोर्टात धाव घेतली आणि त्यांनी ६ फेब्रुवारी १९५० रोजी 'बॉम्बे पब्लिक सेफ्टी मेझर्स ॲक्ट'ला आव्हान दिले. तेव्हा कलम २२ नुसार 'सल्लागार मंडळ'च अस्तित्वात नव्हते. ७ फेब्रुवारीला सुनावणी सुरू झाली. सरकारतर्फे सांगण्यात आलं, की घटना पूर्वलक्ष्यी प्रभावानुसार लागू करता येणार नाही. कोर्टाने हे अमान्य करत त्या २८ जणांची सुटका केली. हा पहिला धक्का बसला (पृ. १०).

असेच निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालय आणि पाटणा उच्च न्यायालयांनी दिले. सरकारचा गोंधळ उडाला. गृहमंत्री सरदार पटेल विचारात पडले. 'नव्या भारतीय प्रजासत्ताकातील नागरिकांचे मूलभूत अधिकार की देशाची सुरक्षा', कोणाची निवड करायची? त्याच काळात हैदराबाद संस्थानातील तेलंगणा भागात कम्युनिस्ट पक्षाने सशस्त्र उठाव सुरू केला. शिवाय समाजवादी पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाने 'वसाहतवादी मानसिकतेचे कायदे रद्द करा' अशी मागणी केली होती. देशासमोर 'अंतर्गत सुरक्षा' हा अतिमहत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. पटेलांच्या गृह खात्याने 'देशाची सुरक्षा'च्या बाजूने कौल दिला. एवढेच नव्हे, तर भारत सरकारने 'प्रिव्हेंटीव्ह डिटेंशन विधेयक सादर केले. हे विधेयक पटेलांनी लोकसभेत सादर केले आणि २५ फेब्रुवारी १९५० रोजी एकमताने संमत झाले. म्हणजे घटना लागू झाल्यानंतर एकाच महिन्यात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आली (पृ.३१). याचा अर्थ, सर्व सदस्यांना मनापासून असं विधेयक मान्य होतं, असं नाही. लोकसभेत रोहिणीकुमार चौधरी म्हणाले होते 'केवळ सरदार पटेल या विधेयकाच्या मागे आहेत म्हणून मी या विधेयकाला मान्यता दिली आहे.' लेखक नमूद करतो त्याप्रमाणे पटेल आणि नेहरू यांच्यात अनेक मुद्यांबद्दल मतभेद होते. पण या मुद्यांवर मात्र एकमत होते. थोडक्यात काय, तर संसदेच्या परवानगीने प्रजासत्ताक भारतात 'प्रतिबंधात्मक अटक' (प्रिव्हेंटीव्ह डिटेंशन) सुरू झाली.

**उच्चार स्वातंत्र्याबद्दलचा वाद**

११ फेब्रुवारी १९५० रोजी मद्रास प्रांतातल्या सालेम येथील तुरूंगात असलेले २०० कम्युनिस्ट कार्यकर्ते संपावर गेले. 'आम्हाला सामान्य गुन्हेगारांप्रमाणे न वागवता राजकीय कैद्यांप्रमाणे वागवा' ही त्यांची मागणी होती. यात या कैद्यांची आणि पोलिसांची हाणामारी झाली. चिडलेल्या पोलिसांनी दोनशे कार्यकर्त्यांना एका खोलीत बंद केले आणि अंदाधुंद गोळीबार केला. यात २२ लोक मारले गेले, तर १०७ जबर जखमी झाले. या घटनेचे देशात तसेच परदेशात पडसाद उमटले. मुंबईतून प्रसिद्ध होणाऱ्या डाव्या विचारांचे मासिक 'क्रॉस रोड्स'चे संपादक रोमेश थापर यांनी या घटनेवर जबरदस्त टीका केली आणि त्यांच्या मासिकात लेख मालिका प्रसिद्ध झाली. १ मार्च रोजी मद्रास प्रांताच्या सरकारने मद्रास प्रांतात 'क्रॉस रोड्स'च्या वितरण आणि विक्रीवर बंदी घातली. 'क्रॉस रोड्स'च्या १७ मार्चच्या अंकात मद्रास सरकारच्या हुकूमावर कडाडून टीका करण्यात आली. 'हिटलर आणि मुसोलिनीप्रमाणेच काँग्रेस सरकारला सत्याची भीती वाटते' असे आरोप करण्यात आले. रोमेश थापर एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी १ एप्रिलच्या अंकात वाचकांना निधी गोळा करण्याचे आवाहन आहे. या निधीतून मद्रास सरकारच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरवले. येथे हेही नमूद केले पाहिजे, की मद्रास प्रांताप्रमाणेच 'क्रॉस रोड्स'वर मुंबई प्रांतातही जुलै १९४९ पासून बंदी होती. या मासिकाने 'कामगार नेत्यांना पोलिस त्रास देतात', असे आरोप केले होते. मुंबई उच्च न्यायालयाने या बंदीला स्थगिती दिली होती.

याच काळात केंद्र सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र असलेल्या 'ऑर्गनायझर' या साप्ताहिकावरसुद्धा बंदी होती. पूर्व पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासितांबद्दल असलेल्या नेहरू सरकारच्या धोरणांवर या साप्ताहिकात टीका होती. 'क्रॉस रोडस'प्रमाणेच 'ऑर्गनायझर'नेसुद्धा सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली (पृ.१९). एप्रिल आणि मे १९५० मध्ये सर्वोच्च न्यायालयात 'ब्रीज भूषण वि. स्टेट ऑफ दिल्ली' आणि 'रोमेश थापर वि. स्टेट ऑफ मद्रास' या दोन खटल्यांची सुनावणी सुरू होती. या दोन्ही खटल्यांत कळीचा मुद्दा होता आविष्कार स्वातंत्र्याची ग्वाही देणारं कलम १९ (१)!

**बंधने लादण्याबाबतच्या तरतुदी**

देशात या दोन्ही खटल्यांबद्दल जोरदार चर्चा सुरू होती. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एम.सी. छागला यांनी १ मे रोजी पुण्यात भाषण करताना या संदर्भात सरकारवर जोरदार टीका केली. घटनेच्या चौकटीबाहेर सरकारला कोणताही कायदा किंवा हुकूम जारी करता येणार नाही' असे ठणकावून सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने २६ मे १९५० रोजी दोन्ही खटल्यांत निकाल जाहीर केला. मद्रास सरकारने 'क्रॉस रोड्स'वर घातलेली बंदी रद्द केली, तसेच दिल्ली सरकारने 'ऑर्गनायझर'वर घातलेली बंदी रद्द केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात एक महत्त्वाचे तत्त्व अनुस्यूत होते. 'आविष्कारस्वातंत्र्यांवर बंधनं लादायची असतील तर तशा तरतुदी घटनेत उपलब्ध आहेत. त्याचा वापर करावा' (पृ.२२). याचा अर्थ असा, की बंधनं कधी लादता येतील याबद्दलच्या तरतुदी कलम १९ (२) मध्ये आहेत.

देशात सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे संमिश्र पडसाद उमटले. नेहरू सरकारच्या विरोधकांनी जल्लोष केला, तर सरकारच्या अडचणी वाढल्या. घटना समितीत नेहरू-पटेल म्हणजे व्यक्तीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असे वातावरण निर्माण झालेले होते. घटना लागू केल्यानंतरच अवघ्या चारच महिन्यांत लक्षात आले, की असं काही नाही. वेळ आली तर हे थोर नेते व्यक्तीस्वातंत्र्याचा बळी द्यायला तयार होतात. पण खरा मुद्दा वेगळाच होता. जयप्रकाश नारायण यांनी दाखवून दिल्याप्रमाणे 'शासनयंत्रणेचा दमनकारी चेहरा' ही खरी समस्या नसून लोकांना तसेच त्यांच्या नेत्यांना 'व्यक्तीस्वातंत्र्य आणि नागरी स्वातंत्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत' हे समजत नाही. लोक 'व्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य' असे समजतात ही खरी समस्या आहे (पृ.२४). हे पुस्तक वाचताना आपण इ.स. २०२१ मध्ये आहोत की १९५० सालात, असा प्रश्न पडावा, असं आजचं वातावरण आहे. राजकीय विरोधकांना, पत्रकारांना, व्यंगचित्रकारांना सरकार ऊठसूट राजद्रोहाच्या 'कलम १२४ अ' खाली अटक करत असते!

**मंडळाची स्थापना**

जमीनदारी निर्मुलनाच्या मुद्याला आणखी एक आयाम होता आणि तो म्हणजे १९५१ साली होणार असलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका. या निवडणुका काँग्रेसला जिंकायच्या होत्या आणि त्यासाठी जमीनदारी निर्मुलन कायदा प्रत्यक्षात आणायचा होता. याच काळात उत्तर प्रदेश आणि बिहार सरकारने आपापल्या विधानसभांत जमीनदारी निर्मुलन विधेयकं सादर केली होती. त्यावर विधानसभेत चर्चा सुरू होती. विरोधी पक्ष आणि काँग्रेसमधील काही आमदार अनेक हरकती उपस्थित करून, निरनिराळ्या दुरूस्त्या सुचवून चर्चा लांबवत होते. यातील सर्वात वादग्रस्त मुद्दा होता जमीनदारांना 'नुकसानभरपाई' देण्याचा. काँग्रेसने यासाठी चौधरी चरणसिंग (जे नंतर भारताचे पंतप्रधान झाले) यांच्या अध्यक्षतेखाली 'जमीनदारी निर्मुलन जाहिरात मंडळ' स्थापन केले. याद्वारे काँग्रेसने छोट्या शेतकऱ्यांकडून निधी गोळा करण्यास सुरुवात केली. या निधीतून

## जमीनदारी निर्मुलन

*ही आविष्कार स्वातंत्र्याची लढाई एका बाजूला सुरू होती, तर दुसरीकडे, खाजगी मालमत्तेवरून लढाई पेटली होती. लेखकाने याचा दुसऱ्या प्रकरणात ऊहापोह केला आहे. बिहार विधानसभेने इ.स. १९४९ साली 'मॅनेजमेंट ऑफ इस्टेट अँड टेन्युर ॲक्ट' पारित केला. हा कायदा जानेवारी १९५० मध्ये राज्यघटना लागू होण्याच्या आधीच पारित केला होता. या कायद्यानुसार सरकार जमीनदारांच्या जमिनी ताब्यात घेईल आणि त्यांना जमिनीच्या उत्पनातील वीस टक्के उत्पन्न देईल (पृ.२५). तसं पाहिलं तर १९३० च्या दशकापासून 'जमीन सुधारणा' हा विषय काँग्रेसच्या कार्यक्रमपत्रिकेवर होता. जमीनदारी निर्मुलन आणि जमिनीचे फेरवाटप यासाठी भारतीय प्रजासत्ताक कटिबद्ध होते. अर्थात, ही लढाई सोपी नव्हती. याची सुरुवात हजारीबाग जिल्ह्यात झाली. तेथील मोठे आणि प्रतिष्ठित जमीनदार म्हणजे राजा कामख्य नारायण सिंग. हे गृहस्थ पुढे स्वतंत्र पक्षाचे मोठे नेते आणि केंद्रीय मंत्री झाले. त्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीस पाठवली, की लवकरच त्यांची जमीन सरकारजमा होणार आहे. राजेसाहेबांनी ताबडतोब जिल्हा न्यायालयातून स्थगिती मिळवली. उत्साही जिल्हाधिकाऱ्याने याकडे दुर्लक्ष केले आणि जिल्ह्यात दवंडी पिटवली, की लोकांनी राजेसाहेबांना जमिनीचं भाडं देण्याची गरज नाही. पाटणा उच्च न्यायालयाला न्यायपालिकेचा अवमान सहन झाला नाही आणि त्यांनी जानेवारी १९५० मध्ये राज्य सरकारला 'कारणे दाखवा' नोटीस बजावली. सरकारने केलेले अपील उच्च न्यायालयाने फेब्रुवारी १९५० मध्ये धुडकावले आणि जिल्हा न्यायालयाने राजेसाहेबांची जमीन ताब्यात घेण्याच्या सरकारी हुकूमावरची स्थगिती कायम केली. मधल्या काळात म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक भारताची घटना लागू झाली. याचा आधार घेऊन बिहारचे मोठे जमीनदार दरभंग्याचे महाराजा सर कामेश्वर सिंग यांनी बिहार सरकारने केलेल्या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले (पृ.२६).*

जमीनदारांना नुकसानभरपाई देण्यास मदत होईल, अशी योजना होती. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी जमीनदारी निर्मुलन प्रत्यक्षात आणण्यासाठी कंबर कसली आणि देशभर दौरे सुरू केले. लेखकाने नमूद केल्याप्रमाणे एकट्या उत्तर प्रदेशात मे-जून १९५० दरम्यान काँग्रेसने जवळजवळ ३५,००० जाहीर सभा घेतल्या (पृ.३३).

उत्तर प्रदेशच्या तुलनेत बिहारमधील स्थिती तशी बरी होती. तेथेसुद्धा 'नुकसानभरपाई' हा मुद्दा वादग्रस्त ठरला होता. तेथील तरतुदींनुसार जमीनदारांचे नक्त उत्पन्न जर वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, तर नुकसानभरपाई या रकमेच्या तिप्पट मिळेल आणि जर नक्त वार्षिक उत्पन्न पाचशे रुपयांपेक्षा जास्त असेल तर वीसपट मिळेल. ही रक्कम सरकारी रोख्यांच्या रूपात देण्यात येणार हो ती. अशा प्रकारे बिहार विधानसभेने जमीनदारी निर्मुलन कायदा एप्रिल १९५० मध्ये पारित केला आणि लवकरच राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठवू, असे जाहीर केले.

या घटनांमुळे जमीनदारी संपल्यातच जमा आहे, असे वातावरण उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यांत निर्माण झाले होते. अशा वातावरणात ६ जून १९५० रोजी पाटणा उच्च न्यायालयाचा निर्णय आला. या निर्णयानुसार बिहार विधानसभेने पारित केलेला 'मॅनेजमेंट ऑफ इस्टेट अँड टेन्युर ॲक्ट' अवैधानिक असल्याचे जाहीर केले. हा निर्णय नव्हता, एक प्रकारचा बॉम्ब होता (पृ.३५). यातूनच 'राज्यघटना विरूद्ध राजकारणी वर्ग' असा संघर्ष उभा राहिला. एवढेच नव्हे, तर नेहरू सरकारच्या 'जमीन सुधारणा' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासमोर प्रश्नचिन्ह उभे केले.

**न्यायपालिकेचा लगाम**

लेखकाने तेव्हा दिल्लीत घडलेल्या काही घटनांचा उल्लेख केला आहे, ज्या घटनांमुळे दिल्लीच्या राजकारणावर परिणाम झाला. एक म्हणजे केंद्रीय अर्थमंत्री जॉन मथाईंचा राजीनामा. मथाई यांनी योजना आयोगाच्या वाढत्या हस्तक्षेपाच्या निषेधार्थ जून १९५० मध्ये राजीनामा दिला. केंद्र सरकारने पंधरा मार्च १९५० रोजी 'योजना आयोग' स्थापन केला होता. याद्वारे नेहरूंना भारतातसुद्धा सोव्हिएत युनियनमध्ये राबवत असलेलं 'योजनाबद्ध आर्थिक विकास' हे प्रारूप राबवायचे होते. एप्रिल १९५० मध्ये के.सी. नियोगी आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'नेहरू-लियाकत खान कराराचा' निषेध म्हणून राजीनामे दिले होते. या तीन राजीनाम्यांनी नेहरू सरकार हादरले होते. अशा वातावरणात पाटणा उच्च न्यायालयाचा निकाल आला! यासाठी सरकार कोणत्याच प्रकारे तयार नव्हते. 'जमीन सुधारणा' हे काँग्रेसचं महत्त्वाकांक्षी धोरण होतं. आता न्यायपालिकेनं त्यालाच लगाम घातला होता.

बिहारचे मुख्यमंत्री कृष्णा सिन्हा यांनी घटनेवर कडवट टीका करत घटनेत दुरूस्ती केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. इथून पहिल्या घटनादुरूस्तीचे वातावरण निर्माण व्हायला लागले (पृ.३९). जमीनदारांनी मात्र काळाची पावलं ओळखून सरकारशी समझोता करण्याची तयारी दाखवली. चिडलेले, अपमानित झालेले काँग्रेसचे नेते मात्र समझोता करण्याच्या मनस्थितीत नव्हते. जून आणि जुलै महिन्यांत सरकारला जमीनदारांच्या घेतलेल्या जमिनी परत द्याव्या लागल्या. या दरम्यान डाव्या नेत्यांच्या मानसिकतेत महत्त्वपूर्ण बदल झाला. जे जयप्रकाश नारायण नेहरूंवर घणाघाती टीका करत होते, तेच आता म्हणायला लागले की असं जर होणार असेल तर नवीन घटना लिहिली पाहिजे.

**दक्षिण भारतातील राजकारण**

या तपशीलानंतर लेखक दक्षिण भारतातील सामाजिक चळवळींचा विचार करतो. दक्षिण भारतातील मद्रास प्रांतात आत्मसन्मान चळवळ, जस्टीस पार्टी, त्यातून निघालेला आजचा द्रमुक हा पक्ष वगैरे दक्षिण भारताचा विसाव्या शतकाचा इतिहास माहीत असतो. ई.व्ही. रामस्वामी नायकर यांच्या नेतृत्वाखाली आकाराला आलेल्या या चळवळीचा नंतर देशभर प्रभाव पडला. राजकारणात 'जातीनिहाय प्रतिनिधित्व' हा जस्टीस पार्टीच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू होता (पृ.४३). इ.स. १९२१ साली मद्रास प्रांतात सत्तेत आलेल्या जस्टीस पार्टीने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण सुरू केले. अशा प्रकारे सामाजिक संस्थांचे 'निर्ब्राह्मणीकरण' सुरू झाले. १९४० च्या दशकात जरी काँग्रेसने जस्टीस पार्टीचा पराभव करून सत्ता मिळवली, तरी काँग्रेसचे नेते या प्रक्रियेला थांबवू शकले नाहीत. त्रिपूरदमन सिंग यांनी तेव्हाच्या आरक्षणाची टक्केवारी दिली आहे. समजा १४ जागा असतील तर ब्राह्मणेतर हिंदूंसाठी ६, ब्राह्मणांसाठी २, मुस्लिमांसाठी १, हरिजनांसाठी २, ॲंग्लो इंडियन, ख्रिश्चन आणि युरोपियन्ससाठी १ आणि इतरांसाठी २, अशी टक्केवारी होती. नेमकं यामुळेच वादावादीला सुरुवात झाली.

राज्यघटना लागू झाल्याबरोबर मद्रास प्रांतातील आरक्षणावर चर्चा सुरू झाली. घटनेतील कलम १५ नुसार असा अन्याय, असा भेदाभेद करता येत नाही. या संदर्भात कलम २९ बद्दलही चर्चा सुरू झाली. जातीधर्माच्या आधारे शैक्षणिक संस्थांत प्रवेश नाकारता येईल का, असा प्रश्न उपस्थित झाला. पाटणा उच्च न्यायालयाने बिहार सरकारचा कायदा अवैध ठरवल्याच्या धक्क्यातून सरकार सावरत होते, तेवढ्यात ७ जून १९५० रोजी मद्रास उच्च न्यायालयात श्रीमती चंपकम दोरायराजन आणि सी.आर. श्रीनिवासन् यांनी याचिका दाखल केली आणि आरक्षणाला आव्हान दिले. श्रीमती चंपकम १९३४ साली मद्रास विद्यापीठातून पदवीधर झाल्या होत्या आणि आता त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा होता. आरक्षणाच्या प्रचलित नियमांनुसार त्यांना प्रवेश मिळणे अशक्य होते. श्रीमती चंपकम ब्राह्मण होत्या. श्रीनिवासन् हा तरूण मुलगा होता आणि त्याला इंजिनिअरिंग महाविद्यालयात प्रवेश हवा होता. त्यालासुद्धा प्रवेश मिळाला नव्हता. त्यांनी आरक्षणाच्या विरोधात याचिका दाखल केल्या आणि आरक्षणामुळे आमच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते आणि कलम १५ (१) आणि कलम २९ (२) चा भंग होतो, अशी तक्रार केली. लेखक नमूद करतो त्याप्रमाणे या दोन विद्यार्थ्यांच्या याचिकांमुळे भारतीय प्रजासत्ताकांसमोर प्रचंड मोठे आव्हान उभे केले. हे आव्हान आजही नाहीसे झालेले नाही. आज आपल्या देशात महाराष्ट्रातील मराठा समाज, गुजरातेतील पटेल समाज वगैरे आधीचे उच्चवर्णीय आता आर्थिकदृष्ट्या दुर्बल झालेले घटक आरक्षणाची मागणी करत आहेत.

या विद्यार्थ्यांचा खटला नामवंत वकील अल्लादी कृष्णस्वामी अय्यर (१८८३-१९५३) यांनी लढवला. अय्यर घटना समितीचे सदस्य होते.

या खटल्याने साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेतले. या खटल्यात भारतातील आरक्षणाच्या धोरणाचे भवितव्य ठरणार होते. खटल्यादरम्यान मद्रास सरकारने मान्य केले, की आरक्षणाच्या धोरणात भेदाभेद आहे. पण 'सामाजिक न्याय' या तत्त्वासाठी हे गरजेचे आहे, असे सरकारतर्फे सांगण्यात आलं. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्व क्रमांक ४६ प्रत्यक्षात आणण्यासाठी आरक्षण गरजेचे आहे, असेही सरकारतर्फे सांगण्यात आले. हा खटला जून आणि जुलै १९५० दरम्यान सुरू होता. भारतीय समाजात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. अनेक उच्चवर्णियांनी 'वाचकांच्या पत्रव्यवहारातून' सरकारवर टीकेची झोड उठवली. २७ जुलै १९५० रोजी मद्रास उच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने निकाल दिला आणि जात-धर्म वगैरेंच्या आधारे दिलेले आरक्षण रद्द केले (पृ.४९). केंद्र सरकारला हा दुसरा धक्का होता. या निर्णयात दुसरा फार महत्त्वाचा मुद्दा दडलेला होता. खंडपीठाने सरकारच्या 'घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचा' मुद्दा नाकारला. याचा खरा अर्थ असा, की घटनेत मूलभूत अधिकार नमूद केलेला भाग तिसरा हा मार्गदर्शक तत्त्व नमूद केलेल्या भाग चवथ्यापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. भाग तीन आणि भाग चार यांच्यात जर वाद निर्माण झाला तर भाग तीनला महत्व दिले जाईल. कोणत्याही प्रकारचे भेदाभेद कलम १५ (१) च्या आधारे नाकारले जातील.

**दोन्ही कार्यक्रमांना लाल कंदील**

नेहरू सरकारला, काँग्रेस पक्षाला हा दुसरा जबरदस्त धक्का होता. मद्रास प्रांतात मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या निर्णयाविरूद्ध आंदोलनं केली. मद्रास सरकारने या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचं जाहीर केलं. यातली विसंगती लक्षात घेतली पाहिजे. 'जमीन सुधारणा' आणि 'सामाजिक न्याय/आरक्षण' या दोन्ही मुद्यांची घटना समितीत विस्तृत चर्चा झाली होती. या दोन्ही तत्त्वांना प्रजासत्ताक भारतात मूर्त रूप द्यायचे, याबद्दलही घटना समितीत एकमत होते. असे असतांना अवघ्या एका वर्षातच या दोन्ही कार्यक्रमांना न्यायपालिकेने लाल कंदील कसा दाखवला? आपणच बनवलेली घटना बदलण्याची आपल्यावर नामुष्की कशी आली, हे सर्व आता लोकांना कसं समजून सांगायचं? स्वातंत्र्यापूर्वी लोकांना दिलेली आश्वासनं आता आम्ही पूर्ण करू शकत नाही, हे कोणत्या तोंडाने गरीब जनतेला सांगायचं? आता नेहरू सरकार आणि काँग्रेस पक्ष काय करेल, याचा अंदाज ३ ऑगस्ट रोजी पंडितजींनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रावरून येतो. नेहरू लिहितात, 'आपल्याला घटनेचा आदर केलाच पाहिजे. पण जर कायदे सामाजिक न्यायाच्या मार्गात अडथळे निर्माण करत असतील, तर ते कायदे बदलावे लागतील' (पृ.५४).

अशा स्थितीत पंधरा ऑगस्ट उजाडला. स्वतंत्र भारताचा तिसरा वाढदिवस आणि प्रजासत्ताक निर्माण झाल्यापासूनचा पहिला. देशात निराशेचे वातावरण होते. यावर 'टाईम्स ऑफ इंडिया'ने लिहिलेले संपादकीय प्रकाश टाकते. 'देशातील जनता नाराज झाली. सरकारचे अपयश झाकता येत नाही' (पृ.५६). दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर समाजातील निराशा आकाशाला भिडली होती. द्रविड चळवळीचे सर्वोच्च नेते रामस्वामी पेरियार यांनी एका जाहीर भाषणात सांगितले, की जर आरक्षणाबद्दलच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले, तर मग घटनादुरूस्तीला पर्याय उरणार नाही आणि घटनादुरूस्ती झाली नाही तर मग आम्हाला 'स्वतंत्र द्रविडीस्तान'ची मागणी करावी लागेल.

## राष्ट्रपतींची विधेयकावर स्वाक्षरी

*या सर्व प्रकरणांत सरदार पटेल अनुपस्थित होते. ते आजारी असल्यामुळे मुंबईतल्या रूग्णालयात होते. त्यांनी एका पत्राद्वारे नेहरूंना सबुरीचा सल्ला दिला. पण नेहरू चिडलेले होते. एक तर त्यांच्या मनाविरूद्ध काँग्रेसच्या अध्यक्षपदी टंडन निवडून आले होते. दुसरं म्हणजे समाजात त्यांच्या सरकारची नाचक्की सुरू होती. अशा स्थितीत नाशिकला काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. हे अधिवेशन प्रजासत्ताक भारतात भरणारे काँग्रेसचे पहिले ऐतिहासिक अधिवेशन होते. पटेलांच्या सबुरीच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करत नेहरूंनी डॉ. प्रसादांना जरा कडक भाषेत पत्र लिहिले आणि बिहार विधेयकावर लवकरात लवकर स्वाक्षरी करावी, अशी सूचना केली. नेहरूंच्या विनंतीचा आदर करत डॉ. प्रसादांनी ११ सप्टेंबरला विधेयकावर सही केली. नेहरू सरकार उत्साहात आले.*

**कायद्यावर विचार करणारी मंत्रिमंडळ समिती**

दुसरीकडे, बिहार विधानसभेने संमत केलेला जमीनदारी निर्मुलन कायद्याचा मुद्दा होता. याबद्दल विचारविनिमय करायला एक मंत्रिमंडळ समिती गठीत केली होती. यात कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अर्थमंत्री सी.डी. देशमुख आणि मजूरमंत्री बाबू जगजीवनराम होते. समितीने २० ऑगस्ट रोजी जमीनदारांना सरकारी कर्जरोख्यांच्या रूपात 'नुकसानभरपाई' दिली जावी आणि या रोख्यांचा कार्यकाळ चाळीस वर्षांचा असावा, अशी शिफारस केली. याला आव्हान मिळणार होते, कलम ३१ मध्ये नमूद केलेल्या खाजगी मालमत्तेच्या मूलभूत हक्काने. या कलमानुसार सरकारला कोणत्याही व्यक्तीची खाजगी मालमत्ता ताब्यात घेता येणार नाही. घ्यावयाची झाली तर त्यासाठी कायदेशीर तरतुदींची पूर्तता केली पाहिजे आणि त्या व्यक्तीला नुकसानभरपाई दिली पाहिजे. या तरतुदी करून बिहार विधानसभेने पारीत केलेले जमीनदारी निर्मुलन विधेयक राष्ट्रपतींकडे स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आले.

याला समांतर जाणारी आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे, काँग्रेस पक्षातील राजकारण. २ सप्टेंबर १९५० रोजी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून पुरूषोत्तम दास टंडन निवडून आले. टंडन हे सरदार पटेल गटाचे आणि उजव्या विचारसरणीचे होते. टंडन अध्यक्ष होऊ नयेत म्हणून नेहरूंनी स्वतःचे वजन खर्च केले होते. तरीही टंडन निवडून आले (पृ. ६०). काँग्रेसच्या घटनेनुसार अध्यक्षपद तीन वर्षांसाठी असते.

लेखक नमूद करतो, की जसजसा बिहार विधानसभेच्या विधेयकाला वेळ जाऊ लागला तसंतसं काँग्रेसचं जनमाणसातलं स्थान

डळमळीत होऊ लागलं. केंद्रीय मंत्रिमंडळाने ९ सप्टेंबरला बिहार विधेयक राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांकडे स्वाक्षरीसाठी पाठवले आणि ताबडतोब स्वाक्षरी करावी अशी विनंती केली. डॉ. प्रसाद कमालीचे नाराज झाले. त्यांना या प्रकारे जमीनदार आणि शेतकरी यांच्यात सुरू झालेला झगडा मान्य नव्हता. दुसरं म्हणजे ते स्वतः बिहार प्रांताचे नेते होते. तिसरं म्हणजे डॉ. प्रसाद डाव्या, पुरोगामी विचारांचे नव्हते. त्यांनी या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळाला ८ सप्टेंबरला एक पत्र लिहिले होते, जे मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीरपणे वाचले होते आणि त्याकडे लक्ष देऊ नये असे मंत्रिमंडळ बैठकीत ठरले होते. घटना समितीचे कायम अध्यक्ष आणि आता प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपती असलेल्या डॉ. प्रसादांना यामुळे मोठा धक्का बसला. त्यांनी ॲटर्नी जनरल एम.सी. सेटलवाड यांना कायदेशीर सल्ला मागितला. हा सल्ला जसा बिहार जमीनदारी विधेयकाबद्दल होता, तसाच राष्ट्रपतींवर मंत्रिमंडळाचा सल्ला बंधनकारक असतो का, याबद्दलही होता (पृ.६२).

टंडन जर काँग्रेसचे अध्यक्ष झाले तर मी काँग्रेस कार्यकारिणीत राहणार नाही आणि पंतप्रधानपदाचासुद्धा राजीनामा देईन, अशी जाहीर भूमिका नेहरूंनी घेतली होती. यामुळे टंडन नरमले. ते नेहरूंशी जुळवून घेण्याच्या तयारीत होते. नाशिकला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनावर नेहरूंची जाणवेल अशी छाप होती. सरदार पटेल फार आजारी होते. नेहरूंनी अधिवेशनात केलेले भाषण फार गाजले. त्यांनी सरळ शब्दांत हिंदू राष्ट्रवादाचा धिक्कार केला आणि माझे कौतुक करणे पुरेसे नाही तर माझ्या आर्थिक धोरणांना दणदणीत आणि सक्रिय पाठिंबा दिला पाहिजे वगैरे अपेक्षा व्यक्त केल्या. नेहरूंना मिळत असलेला पाठिंबा बघून टंडन हादरले. लेखकाच्या मते, नेहरूंनी नाशिक अधिवेशन खिशात घातले (पृ.६६).

**काँग्रेसच्या लोकप्रियतेला ओहोटी**

नाशिकला नेहरू जिंकले होते, तर तिकडे मद्रास प्रांतात नवीन आव्हान समोर येत होते. मद्रास विधानसभेने 'इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट (मद्रास) ॲक्ट' १९५० पारित केला. यानुसार सरकारला एखाद्या संघटनेला 'बेकायदेशीर संघटना' म्हणून घोषित करणारे अधिकार प्राप्त झाले. याचा आधार घेऊन मद्रास सरकारने मार्च १९५० मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या संस्थेला 'बेकायदेशीर संघटना' म्हणून घोषित केले. संस्थेने या निर्णयाला मद्रास उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या खटल्याचा निर्णय १३ सप्टेंबर १९५० रोजी आला आणि मद्रास उच्च न्यायालयाने 'कलम १९' चा आधार घेत हा कायदा अवैध ठरवला. काँग्रेस पक्षाचं आणखी एकदा नाक कापलं गेलं. मार्च १९५१ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. काँग्रेस पक्षाची लोकप्रियता घसरत होती. काँग्रेसची राज्य सरकारं खास करून मद्रास, बिहार, पंजाब सार्वत्रिक निवडणुका होऊ देण्यास नाखुश होती. हाडाच्या लोकशाहीवादी नेहरूंना हे सहन होणे शक्यच नव्हते. लेखकाने नेहरूंनी मुख्यमंत्र्यांना या संदर्भात लिहिलेले पत्र उद्धृत केले आहे, ज्यात नेहरूंनी याबद्दल मुख्यमंत्र्यांची कानउघाडणी केली आहे (पृ.६९). राज्य पातळीच्या नेत्यांना मतदारांसमोर जाण्याची हिंमत होत नव्हती.

**खटल्याकडे देशाचे लक्ष**

### *पोलिस कारवाईचे देश-विदेशात पडसाद*

***११ फेब्रुवारी १९५० रोजी मद्रास प्रांतातल्या सालेम येथील तुरूंगात असलेले २०० कम्युनिस्ट कार्यकर्ते संपावर गेले. 'आम्हाला सामान्य गुन्हेगारांप्रमाणे न वागवता राजकीय कैद्यांप्रमाणे वागवा' ही त्यांची मागणी होती. यात या कैद्यांची आणि पोलिसांची हाणामारी झाली. चिडलेल्या पोलिसांनी दोनशे कार्यकर्त्यांना एका खोलीत बंद केले आणि अंदाधुंद गोळीबार केला. यात २२ लोक मारले गेले, तर १०७ जबर जखमी झाले. या घटनेचे देशात तसेच परदेशात पडसाद उमटले.***

बिहार सरकारने २४ सप्टेंबर १९५० रोजी काढलेल्या हुकूमानुसार तीन मोठ्या जमीनदारांची जमीन सरकारने ताब्यात घेतली. हे तीन जमीनदार म्हणजे दरभंग्याचे महाराज सर कामेश्वर सिंग, रामगडचे राजा बहादूर कामाख्य नारायण सिंग आणि दरभंग्याचे राजा बहादूर विश्वेश्वर सिंग. अपेक्षेप्रमाणे त्यांनी पाटणा उच्च न्यायालयातून अंतरिम स्थगिती मिळवली. बिहार सरकार नैराश्याच्या खाईत कोसळले. ही समस्या फक्त बिहारपुरती सीमित नव्हती तर सर्व काँग्रेस पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न होता. 'जमीनदारी निर्मुलन' हा कार्यक्रम फक्त बिहार आणि उत्तर प्रदेशचा नव्हता तर सर्व देशासाठी होता. बिहारमध्ये याची सुरुवात लवकर झाली, एवढेच. पण आता हा मुद्दा न्यायपालिकेत गेल्यामुळे या कार्यक्रमाला 'अखिल भारतीय' रूप आले आणि या खटल्याकडे सर्व देशाचे लक्ष लागले.

अशा स्थितीत पंजाब विधानसभेने 'शेतकऱ्यांना आणि मागासवर्गीयांना आरक्षण मिळावे' असा ठराव संमत केला (पृ. ७२). या ठरावातून पंजाबमधील 'ग्रामीण विरूद्ध शहरी' हा संघर्ष अधोरेखित झाला. याच काळात दुसरी महत्त्वाची घटना घडली, ती बिहार राज्यातील पुरूलिया या जिल्ह्यात. येथे 'भारती प्रेस' च्या मालकीण श्रीमती शैला बाला देवींनी बंगाल भाषेत 'संग्राम' नावाचं एक पत्रक छापलं, ज्यात भारतात क्रांती झाली पाहिजे असं आवाहन केलं. सरकारने ब्रिटिशकालिन 'इंडियन प्रेस (इमर्जंसी पॉवर्स) ॲक्ट' वापरून देवींकडून दोन हजार अमानत रक्कम मागितली. शैला बाला देवींनी पाटणा उच्च न्यायालयात दाद मागितली आणि या कायद्याचे कलम ४ (१) अवैध आहे, असा दावा केला. १३ ऑक्टोबर १९५० रोजी पाटणा उच्च न्यायालयाने शैला बाला देवींचे म्हणणे ग्राह्य धरले. हा निर्णय देताना न्यायमूर्ती सरजू प्रसाद यांनी जे नमूद केले त्याने खळबळ माजली. न्यायमूर्ती म्हणाले, 'सध्या अस्तित्वात असलेल्या उच्चारस्वातंत्र्यानुसार जर कोणी 'खून करणं योग्य आहे' असं म्हणत असेल तर तसं म्हणण्याचा त्या व्यक्तीला अधिकार आहे. विद्यमान हक्कांनुसार असं म्हणणं गुन्हा ठरत नाही.' न्यायमूर्तींनी अशीही अपेक्षा व्यक्त केली, की सर्वोच्च न्यायालयाने लवकरात लवकर याचा विचार करावा आणि आम्हाला मार्गदर्शन करावं. यानंतर न्यायमूर्तींना काय अपेक्षित होतं, काय अभिप्रेत होतं, हा मुद्दा बिनमहत्त्वाचा ठरला आणि राजकीय नेत्यांनी 'घटनेचा पुनर्विचार झालाच पाहिजे' अशी मागणी करायला सुरुवात केली. ●●● **(उत्तरार्ध पुढील अंकात)**



**रेणुका कड**

*महिला आणि बालकांवरील अत्याचारांना अटकाव करण्यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही 'शक्ती' कायदा येतोय. पण केवळ कायद्याने अत्याचार कमी होणार नाहीत. बाल पणापासूनच मुलांमध्ये लिंगसमभाव रुजवला आणि मानवी मूल्यांची शिकवण त्यांना दिली तरच महिलांवरील अत्याचारांना आळा बसू शकेल, असे वाटते.*

# ...तरच शक्ती कायदा प्रभावी ठरेल

२०२० च्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र शासनाने 'शक्ती विधेयक' मांडले. गतवर्षीच १० डिसेंबरला मानवी हक्कदिनी मंत्रिमंडळाने त्यास मान्यताही दिली. नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात ते संमत करून घेण्यात आले. महिलांच्या मानवी हक्काच्या दृष्टीने परिस्थितीचा आढावा घेतला तर लॉकडाऊनच्या काळात महिलांवरील कौटुंबिक अत्याचार वाढल्याचे दिसते. हाथरससारखी अमानवीय घटना, साकीनाका येथील बलात्काराची घटना, अशा प्रकारे रोज वृत्तपत्र उघडले की काही न काही घटना नजरेस पडते. या घटना महिलांच्या मानवी अधिकारांबद्दल आणि सुरक्षिततेबद्दल प्रश्नचिन्ह उभे करतात. टाइम्स ऑफ इंडियाच्या ३० डिसेंबर २०२० च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, महाराष्ट्रात सर्वाधिक बाललैंगिक शोषणाचे गुन्हे घडले आहेत. यातील ५०% गुन्ह्यांमध्ये बालक हे ऑनलाइन होणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये फसवले गेले आहेत.

### दोन विधेयकं

महिला आणि बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या तक्रारींवर जलद कारवाई करता यावी आणि लवकरात लवकर गुन्हेगाराला शिक्षा देता यावी यासाठी आंध्र प्रदेशच्या 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर 'शक्ती' नावाचे दोन कायदे राज्य सरकारने पारित केले आहेत. या कायद्यात प्रामुख्याने सोशल मीडियावरील गुन्ह्यांचाही समावेश करण्यात आलाय. त्याचबरोबर कठोर शिक्षेच्या तरतुदीसुद्धा यात आहेत. महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या तक्रारींवर प्रभावीपणे कारवाई करता यावी यासाठी प्रस्तावित कायद्यांची चौकट अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ (महाराष्ट्र अमेंडमेंट) ॲक्ट २०२० आणि स्पेशल कोर्ट अँड मशिनरी फॉर इंप्लिमेंटेशन ऑफ महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ २०२० अशी दोन विधेयकं विधिमंडळासमोर या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आली. यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमण्यात आली होती. या समितीमध्ये अनिल देशमुख, एकनाथ शिंदे, जयंत पाटील, यशोमती ठाकूर आणि वर्षा गायकवाड या



मंत्र्यांचा समावेश होता.

### कायद्याच्या अनिवार्यतेबद्दल मतमतांतरे

महिलांवरील अत्याचाराला अटकाव होण्याच्या दृष्टीने प्रस्तावित शक्ती कायद्यात अनेक कठोर उपाय आहेत. या तरतुदी चांगल्या वाटत असल्या तरी 'शक्ती' कायद्याची गरज आहे का, हा प्रश्नही चर्चेला येतो आहे. दिल्लीतल्या निर्भया घटनेनंतर न्यायमूर्ती वर्मा कमिटीने भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता यात अनेक महत्त्वपूर्ण बदल केले. शिक्षेचे स्वरूप कठोर केले. बालकांचे लैंगिकशोषण थांबावे म्हणून पोस्को कायदा तयार केला गेला. हे सगळे कायदे असतानाही पुन्हा शक्ती कायदा राज्य सरकारने पारित केला आहे. या कायद्याची नेमकी गरज आहे का किंवा गरज का पडली, यावर अनेक मतमतांतरे आहेत. महिलांवर अत्याचार वाढले की कायदे आणायचे हे धोरण सरकार जरी राबवत असले तरी मूळ मुद्दा हा आहे, की कायदे खूप आहेत, पण अंमलबजावणीच काय? हा कायदा मांडण्यात आला तेव्हा प्रसारमाध्यमांशी बोलताना राज्याच्या महिला विकास मंत्री यशोमती ठाकूर यांनी सांगितले, की सध्या देशातच नाही तर जगभर महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. यासाठी हा कायदा करणं गरजेच होतं.

### पीडितांच्या पुनर्वसनावर भर

क्रूर घटना घडल्यास गुन्हेगाराला फाशीची शिक्षा ठोठावण्याची तरतूदही या कायद्यात आहे. पोस्कोमध्ये आणि सीआरपीसीमध्ये काही दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. अन्याय झालेल्या महिलांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने समतोल आणि चांगला कायदा आहे. या कायद्यात ज्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून जलदगती न्यायालयाची व्यवस्थासुद्धा यामध्ये करण्यात आली आहे. यासोबतच महिलांचं पुनर्वसन व्हावं यावरही भर देण्यात आला आहे.

**सामाजिक शिकवण गरजेची**

या कायद्यात जलदगती न्यायालयाची तरतूद केल्यामुळे महिलांना न्याय मिळेल, असे म्हटले जात असले तरी मुख्य विषयाकडे कोणी लक्ष द्यायला तयार नाहीये. स्त्रीवादी लेखिका सीमोन दी बोव्हर असे म्हणतात, की स्त्री जन्मत नाही तर घडवली जाते. मला वाटते, की अत्याचार करणारा पुरुष, बलात्कार करणारा पुरुष हा काही जन्माला येत नाही तर इथल्या समाजात तो घडला जातो. कुटुंबात जन्माला येणारे मुलगे जेव्हा वडील आईला कधीही, केव्हाही, कोठेही आणि कशाही पद्धतीने मारहाण करत असताना, शिवीगाळ करत असताना पाहतच लहानाचे मोठे होतात, तेव्हा पुरुषाने बाईला मारले पाहिजे किंवा पुरुषाने बाईला मारले तर चुकीचे नाही, हाच विचार बालवयात मनात नकळतपणे रुजत असतो. मग आपण कायदे कितीही केले तरी उपयोग काय होणार? कायद्यात कडक शिक्षेची तरतूद आहे म्हणजे अत्याचार होणार नाही, हे आपण सांगू शकत नाही. म्हणून लहान वयापासूनच लिंगसमभाव आणि मानवी मूल्यांची शिकवण आणि रुजवण ही काळाची गरज आहे. काळाच्या ओघात कायद्यात बदल केले पाहिजे, ही भूमिका मान्य आहे; पण सोबतच कौटुंबिक आणि सामाजिक शिकवणीतही बदल केले जाणे तितकेच आवश्यक आहे. ●●●

**(लेखिका महिला प्रश्नांच्या अभ्यासिका आहेत)**

## *आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याचा अभ्यास करून तयार केलेल्या प्रस्तावित 'शक्ती' कायद्यातील तरतुदी*

- महिला अत्याचारांच्या प्रकरणात २१ दिवसांमध्ये आरोपपत्र दाखल करून खटला चालवून आरोपींना शिक्षेपर्यंत पोहोचवण्यासाठी मुदत देण्यात येणार आहे. महिलांवरील ॲसिड हल्ले आणि बलात्कारासारखे गुन्हे अजामीनपात्र करण्यात येणार आहेत.
- इतकंच नाही तर महिलांचा ई-मेलच्या माध्यमातून, इलेक्ट्रॉनिक मीडियातून किंवा मेसेजद्वारे छळ करण्यात आला, तसंच त्यावर कुणी आक्षेपार्ह कमेंट केली तर त्यासाठीही कडक शिक्षा होणार आहे.
- हे सगळे गुन्हे अजामीनपात्र असतील. बलात्कारप्रकरणी, विरळातल्या विरळ प्रकरणात फाशीच्या शिक्षेचीही तरतूद करण्यात आली आहे.
- आपल्याच ओळखीच्या व्यक्तीने बलात्कार केल्यास जन्मठेप किंवा मरेपर्यंत जन्मठेप आणि दंडाची शिक्षा केली जाईल.
- १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलींवर अत्याचार झाल्यास गुन्हेगाराला मरेपर्यंत जन्मठेप होऊ शकते.
- सामूहिक बलात्कारप्रकरणी २० वर्षे जन्मठेपेची तरतूद किंवा मरेपर्यंत जन्मठेप आणि १० लाख रुपये दंड किंवा मृत्युदंडाची तरतूद असेल.
- १२ वर्षाखालील मुलींवर अत्याचार झाल्यास मरेपर्यंत कठोर जन्मठेपेची शिक्षा आणि दहा लाख रुपये दंड.
- महिलांवर पुनःपुन्हा अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा दिली जाऊ शकते.
- ॲसिड हल्लाप्रकरणी किमान १० वर्षांची किंवा मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा आणि पीडित व्यक्तीला दंडाची रक्कम द्यावी लागेल.
- ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केल्यास १० ते १४ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.
- महिलेचा कोणत्याही पद्धतीने छळ केल्यास किमान २ वर्षे तुरुंगवास आणि एक लाख रुपये दंड होऊ शकतो.
- सोशल मीडिया, मेल, मेसेज, इलेक्ट्रॉनिक मीडिया यांच्या माध्यमातून महिलांवर कमेंट करणे, धमकी देणे, चुकीची माहिती पसरवणे यासाठीही शिक्षेची तरतूद या प्रस्तावित कायद्यात करण्यात आली आहे. याचबरोबर फौजदारी प्रक्रियेमध्येही या कायद्यांतर्गत काही बदल सुचवले गेले आहेत.
- तपासाचा कालावधी दोन महिन्यांवरून १५ दिवसांचा केला आहे.
- खटला चालवण्याचा कालावधी दोन महिन्यांवरून ३० दिवसांचा केला गेलाय.
- अपील करण्याचा कालावधी सहा महिन्यांवरून ४५ दिवसांवर आणण्यात आलाय. प्रक्रियांमध्ये बदल करत असतानाच न्यायालयीन, पोलीस आणि सामाजिक व्यवस्थांतही काही प्रस्ताव सुचवण्यात आले आहेत.
- ३६ अन्य विशेष न्यायालये स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे.
- प्रत्येक घटकामध्ये महिला आणि लहान मुलांवरील गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी जिल्हा अधीक्षक किंवा आयुक्तालयात विशेष पोलीस पथक, ज्यामध्ये किमान एक महिला अधिकारी नेमण्याचंही प्रस्तावित आहे.
- पीडितांना मदत आणि सहकार्य करण्यासाठी सेवाभावी संस्थांना अधिसूचित करण्याचाही प्रस्ताव आहे.

# लोकशाहीसाठी शिखर परिषद आणि सद्यस्थिती

**हवा दिल्लीची**



**विजय नाईक**

***अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी आयोजित केलेल्या लोकशाही राष्ट्रांच्या शिखर परिषदेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, संवेदनशीलता, उत्तरदायित्व, सहभाग व सुधारणामूलक वर्तन हे लोकशाहीचे चार स्तंभ असल्याचे सांगितले. वास्तविक, मोदी ज्या गोष्टींची चर्चा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर करतात त्या संदर्भातील आपल्या देशातील चित्र शोचनीय आहे. दलित, अल्पसंख्याकांवरील अत्याचार, नोटाबंदीमुळे रोजगार गमावलेल्या कामगारांची दैन्यावस्था, शेतकरी आंदोलनादरम्यान मरण पावलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकारची संवेदनहिनताच दिसून आली.***



**होनोलुलु, हवाई, अमेरिका येथून थेट खास वृत्तांत...**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या करताना ''गव्हर्नमेंट ऑफ द पीपल, बाय द पीपल अँड फॉर द पीपल (लोकांनी, लोकांचे व लोकांसाठी असलेले सरकार)'' अशी व्याख्या केली होती. त्या लोकशाहीसाठी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी ९ व १० डिसेंबर रोजी जागतिक परिषद घेतली. लोकशाहीप्रणाली असलेल्या ११२ देशांच्या राष्ट्रप्रमुखांना त्यांनी आमंत्रित केले होते. जगात आज २१२ देश व प्रदेश आहेत. या आकड्याकडे पाहता जवळजवळ निम्म्या जगात लोकशाही आहे, असे मानावयास हवे.

परिषदेचे चीन व रशियाच्या अध्यक्षांना आमंत्रण नव्हते. चीन व रशियामध्ये साम्यवादी सरकारे आहेत. 'रशियात लोकशाही आहे,' असा दावा अध्यक्ष व्लादिमीर पुतिन करीत नाहीत. तथापि, 'चीनमध्ये साम्यवादी समाजवादी लोकशाही आहे,' असे अध्यक्ष शी जिनपिंग सांगत असतात. भारताला जगातील सर्वात मोठी व अमेरिकेला सर्वात जुनी लोकशाही म्हटले जाते. भारतात लोकशाहीचे रोपण ब्रिटिशांनी केले. 'स्वतंत्र झाल्यावर भारताचे तुकडे होतील,' असे भाकित करणारे ब्रिटनचे माजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना इतिहासाने खोटे पाडले. पंचाहत्तरीत पदार्पण करणाऱ्या भारतात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये देशावर लादलेल्या आणीबाणीत व नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये सत्तेवर आल्यावर लादलेल्या अघोषित आणीबाणीतही देश तग धरून आहे.

**'वॉटरगेटने' अमेरिकेची लोकशाही आली होती धोक्यात**

बायडेन यांना लोकशाही टिकविण्याची तीव्र गरज भासते आहे. त्याबाबत ते निवडणुकीच्या दिवसांपासून बोलत आहेत. याचे कारण माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या चार वर्षांच्या कारकीर्दीत अमेरिकेतील लोकशाहीचे बारा वाजवून तिला पूर्णपणे खिळखिळे करण्याचे कसून प्रयत्न केले. जनतेत श्वेतवर्णीय, कृष्णवर्णीय व अन्य वर्णीय अशा भिंती तयार केल्या. व्हाईट हाऊस सोडेपर्यंत अतिउजव्यांना इतक्या चिथावण्या दिल्या, की लाठ्या, काठ्या, कांबी, बंदुका घेऊन लोकांनी कॅपिटॉल हिलवर हल्ला केला. त्याची चौकशी चालू असली, तरी ट्रम्प यांचे संकट संपलेले नाही. अमेरिकेच्या निवडणूक प्रक्रियेला त्यांनी 'बोगस' म्हटले. यापूर्वी अमेरिकेची लोकशाही खऱ्या अर्थाने धोक्यात आली होती ती, माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या कारकीर्दीतील कुप्रसिद्ध 'वॉटरगेट' प्रकरणाने.

'केवळ लोकशाही देशांपुढेच नव्हे, तर जगापुढे महाकाय संकटे उभी आहेत,' असे संकेत अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँथनी ब्लिंकेन यांनी शिखर परिषदेपूर्वी आयोजित करण्यात आलेल्या युवकांच्या परिषेदत दिला. 'हवामान

बदलाला रोखण्यासाठी कृती करा,' या मागणीसाठी ग्लासगो येथील हवामानबदल परिषदेत लाखापेक्षा अधिक लोकांनी निदर्शने केली. दुसरीकडे, युद्ध वा अन्य कारणांनी देशाटन केलेल्या लाखोंना आश्रय देण्याचे मोठेपण जर्मनीसारख्या देशांनी दाखविले. भ्रष्टाचाराविरूद्ध अनेक राष्ट्रांत लढा चालू आहे. परिषेदत बोलताना एलसॅल्वाडोरचा प्रतिनिधी लू आर्गुएटा याने, ''देशातील तरूणांच्या मते भ्रष्टाचार ही सॅल्वाडोरमधील सर्वात मोठी समस्या असून, शासनात पारदर्शकतेचा पूर्ण अभाव आहे,'' असं सांगितलं. बेलारूसचा विको आंद्रुकोविच याच्या मते, 'एकाधिकारशाहीविरूद्ध युवकांचा संघर्ष चालू आहे.' तर, सर्बियाचा अलेक्झांडर सॅव्हिक व फिलिपीन्सची लीना रोजजिनॅन यांच्या मते, त्यांच्या देशात एलजीबीटी (समलिंगी, तृतीयपंथीय आदी) समुदायाच्या मोहिमेत युवकांचा मोठा सहभाग आहे.

**लोकशाही पुनर्निर्माणाची गरज**

परिषदेचे उद्घाटन करताना बायडेन म्हणाले, ''लोकशाही व मानवाधिकाराला जगात सतत निर्माण होणारी धोकादायक आव्हाने पाहाता, लोकशाही जतन करणारे नेतृत्व हवे आहे. अमेरिकेलाच लोकशाहीचे पुनर्निर्माण करण्याची गरज आहे.'' 'फ्रिडम हाऊस'चा २०२० चा अहवाल व 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी' या संस्थांनी केलेल्या पाहाणीनुसार, ''गेल्या दहा वर्षात अमेरिकेसह सर्व लोकशाही राष्ट्रांत लोकशाहीच्या किमान एका मानदंडाचा ऱ्हास झाला आहे.'' बायडेन म्हणाले, ''न्याय, कायद्याचे राज्य, मुक्त वर्तमानपत्रे, एकत्र जमण्याचे तसेच धार्मिक स्वातंत्र्य व प्रत्येक माणसाला मानवाधिकाराचा हक्क, या मूल्यांसाठी आपण भक्कम उभे राहिले पाहिजे.'' राष्ट्रप्रमुखांनी दिलेल्या आश्वासनांचे पालन होत आहे की नाही, याचा आढावा २०२२ मध्ये होणाऱ्या लोकशाहीविषयक शिखर परिषदेतून घेतला जाईल.

अमेरिकेला लोकशाहीची सर्वाधिक काळजी वाटू लागली, ती माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीत. त्यांनी लोकशाहीचे सारे नियम धाब्यावर बसवून त्याप्रमाणे कारभार करणे सुरू केले. श्वेतवर्णियांच्या द्वेषाला चिथावणी तर दिलीच; परंतु ज्या कोट्यवधी लोकांनी अमेरिकेत स्थलांतर करून अमेरिकेला समृद्ध केले, त्यांच्यावरच त्यांनी निरनिराळे जाचक नियम लादून कुऱ्हाड चालविली, त्यांची अधिकार कपात केली. 'डिव्हाइड अँड रूल' या उक्तीप्रमाणे अमेरिकन समाजाला विभाजित करून अतिउजव्यांना हाताशी धरून वृत्तपत्रे, पत्रकार, मानवाधिकार संस्था, निवडणूक व्यवस्था यावर घणाघाती हल्ला केला. आपल्याला हव्या त्या व्यक्तिंच्या नेमणुका सर्वोच्च न्यायाधीशपदी केल्या. या घटनांची परिणती अध्यक्षीय निवडणुकांच्या ऐन काळात त्यांच्या समर्थकांनी अमेरिकन लोकशाहीचे पवित्र मंदिर मानल्या जाणाऱ्या कॅपिटॉल हिलवर हल्ला चढविण्यात झाली. बायडेन आल्यानंतर त्या घटनांची सुरू झालेली चौकशी अद्याप संपलेली नाही. रिपब्लिकन पक्ष व ट्रम्प यांचा धोका आजही टळलेला नाही. कारण, २०२४ मध्ये होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकात पुन्हा उतरण्याची तयारी ते करीत आहेत. बायडेन यांना या परिषदेची आवश्यकता भासली ती त्यामुळे.

**बदनामी सुरक्षा निधी उभारणार**

जनहित सुरक्षित राखण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्य जतन करणाऱ्या वृत्तपत्रे व माध्यमांसाठी 'आंतरराष्ट्रीय निधी' उभारण्याचे सूतोवाच त्यांनी केले. वृत्तपत्रे, माध्यमे व शोधक पत्रकार यांच्यावर ऊठसूठ बदनामीचे खटले लादण्याविरूद्ध कायदेशीर करवाई करण्यासाठी 'युएसएड' तर्फे 'डिफेमेशन डिफेन्स फंड (बदनामी सुरक्षा निधी)' उभारला जाईल, अशी घोषणा केली. आपल्या देशात अशी काही कल्पना करणे किती धोक्याचे आहे, हे सर्वश्रुत आहे. पत्रकारांचा शारीरिक व मानसिक छळ करण्यासाठी अनेक कायदे व पोलिसांचा वापर केला जात आहे.

विशेष म्हणजे, लोकशाही राष्ट्रांची शिखर परिषद आयोजित करण्यापूर्वी बायडेन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ऑस्ट्रेलिया, जपान या देशांच्या पंतप्रधानांबरोबर चर्चा केली होती. आपले भाषण संपल्यावर बायडेन यांनी घेतलेल्या 'क्लोज डोअर' बैठकीत झालेल्या विचार विमर्षादरम्यान त्यांनी मोदींसह बारा देशांच्या प्रमुखांना बोलावले होते.

मोदी यांनी आपल्या भाषणात, 'लोकशाहीचे पालन करताना घटनेशी निगडित राहिले पाहिजे,' असे सांगितले. 'संवेदनशीलता, उत्तरदायित्व, सहभाग व सुधारणामूलक वर्तन' हे लोकशाहीचे चार स्तंभ असल्याचे ते म्हणाले. 'तंत्रज्ञान विषयात काम करणाऱ्या कंपन्यांनी खुल्या लोकशाही समाजाच्या निर्मितीत योगदान करावे,' असे मत त्यांनी व्यक्त केले. तथापि, करोनाच्या काळात प्राणवायूविना झालेल्या हजारो मृत्यूंबाबत ते व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री किती संवेदनशील होते? नोटाबंदी केल्यावर रोजगाराला मुकल्यामुळे लाखो कामगारांना घरचा रस्ता धरावा लागला, बेकारीला सामोरे जावे लागले, त्यावेळी सरकारने कोणती संवेदनशीलता दाखविली? ऊठसूट पत्रकार, लेखक, विचारवंत, टीकाकार व विरोधकांना देशद्रोही ठरविताना सरकारने कोणती संवेदनशीलता दाखविली? शेतकरी आंदोलनात गेल्या वर्षात सातशेच्या वर शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, त्यांच्याबाबत एक शब्दही मोदी अथवा त्यांच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांनी काढला नाही. मानसिक निर्दयतेची ही परिसामा नव्हे काय?

**अशा लोकांपासून काय अपेक्षा करणार?**

सत्तेत आल्यावर मोदी यांनी 'सबका साथ, सबका विकास' हा नारा दिला होता. त्यात त्यांनी देशातील 'सव्वा अब्ज' जनतेला बरोबर घेऊन आपण वाटचाल करीत आहोत, असे म्हटले होते. त्याचा अर्थ सहभाग. तथापि, दलित, अल्पसंख्याक यांना वगळणे, मुस्लिमांवर डूख धरून इतिहासाचा वचपा काढण्यासाठी झुंडशाहीतर्फे होणाऱ्या अत्याचारांना प्रोत्साहन दिले. 'बोलायचे एक व कृती करायची त्याच्या विपरित' हा जणू नियम झाला आहे. ज्या सरकारचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल 'नागरी समाज हा अखेरचा शत्रू' असल्याचे व त्याविरूद्ध युद्ध उभारण्याचे भाष्य करतात, त्यांच्यापासून लोकशाहीची काय अपेक्षा करणार? सुधारणामूलक वर्तनाबाबत बोलायचे झाले, तर केंद्राने घिसाडघाईने केलेल्या तीन कृषिक्षेत्रातील सुधारणांसंदर्भात केलेल्या तीन कायद्यांच्या लाभाबाबत आपण 'काही शेतकऱ्यांना समजावू शकलो नाही,' अशी कबुली देऊन मोदी यांनी त्यांची क्षमा मागितली. कायदे मागे घेतले. त्यामागे दिलगिरीसोबत उत्तर प्रदेशात येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत, मतदार भाजपला अव्हेरतील हा धोका त्यांना अधिक महत्त्वाचा वाटला. भारतीय राज्यघटनेनुसार, न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुभाव हे लोकशाहीचे चार स्तंभ असून, जागरूक पत्रकारिता हा पाचवा स्तंभ मानला जातो. मोदी यांनी शिखर परिषेदेत नमूद

केलेल्या चार स्तंभांत याचा कुठेही उल्लेख नाही. पाचवा स्तंभ तर अस्तित्वातच नाही, असे ते सत्तेवर आल्यापासून वागत आहेत. गेल्या सात वर्षात ते एकदाही पत्रकार परिषदेला सामोरे गेले नाहीत. यावरून वृत्तपत्रमाध्यमांबाबत त्यांना किती कमालीचा तिरस्कार आहे, हेच दिसून येते. त्यांना केवळ त्यांचे व भारतीय जनता पक्षाचे लांगूलचालन व खुषमस्करी करणारी माध्यमे हवी आहेत. एनडीटीव्हीचे निर्भीड अँकर रविश कुमार म्हणूनच अशा माध्यमांना 'गोदी मीडिया' असे म्हणतात.

**राष्ट्रीय संपत्तीचा गैरवापर हाही भ्रष्टाचारच**

'फ्रीडम हाऊस'ने केलेल्या पाहणीत भारतीय लोकशाहीचा दर्जा 'पार्टली फ्री' असा केला असून, मतभिन्नतेचा तिरस्कार व विरोध, नागरी स्वातंत्र्यावर गदा, वृत्तपत्रमाध्यमांवरील जाचक कायदे, अल्पसंख्याकांना देण्यात येणारी वागणूक याकडे निर्देश केला आहे. थोडक्यात. भारतीय लोकशाहीची गेल्या काही वर्षात पीछेहाट झाली आहे. शिखर परिषदेच्या उद्दिष्टात अधिकारशाही व भ्रष्टाचाराचा विरोध व त्याविरूद्ध लढा उभारणे, तसेच 'मानवाधिकारांचे रक्षण' व 'आर्थिक गरजांची पूर्ती' यांचा समावेश आहे. 'सरकारमध्ये कुठेही भ्रष्टाचार नाही,' असा दावा मोदी करीत आले आहेत. जनतेच्या पैशाचा अपहार व राष्ट्रीय संपत्तीचा गैरवापर हाही भ्रष्टाचारच होय. उदा. उत्तर प्रदेशात ३४१ कि.मी.च्या पूर्वांचल एक्प्रेसवेचे उद्घाटन झाल्यावर सरकारी खर्चाने आणलेल्या लोकांची भली मोठी सभा घेऊन विरोधकांवर तोंडसुख घेतले. तसेच गेल्या आठवड्यात काशी विश्वनाथ मंदिराच्या समारंभादरम्यान शासनाचा पूर्ण वापर करून स्वतःची प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न केला. हा सारा पैसा जनतेचा आहे, याचे भान सरकारला राहिलेले नाही. त्याला अपहार म्हणायचे नाही तर काय? रविश कुमार यांनी केलेल्या टिप्पणीत म्हटले आहे, की या समारंभाचे व मोदी यांचे चित्रण करण्यासाठी दूरदर्शनने तब्बल पंचावन्न कॅमेऱ्यांची व्यवस्था केली होती. तर दुसरीकडे, केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा टेनी हे लखीमपूर खेरीतील घटनेबाबत प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराचा कॅमेरा हिसकाऊन घेत होते, धमकावत होते.

भारतीय उपखंडातून भारत, पाकिस्तान, मालदीव व नेपाळ या चार देशांना परिषदेचे आमंत्रण होते. पाकिस्तानला आमंत्रण देऊनही त्याने भाग घेतला नाही. तेथे नावाला लोकशाही आहे; परंतु भाग न घेण्याचे कारण चीन, रशिया यांचा दबाव हे आहे. आफ्रिकेतील ५४ देशांपैकी १७ देशांना आमंत्रण होते. दक्षिण आशियातील कंबोडिया, म्यानमार, लाओस, थायलंड, सिंगापूर व व्हिएतनाम यांना आमंत्रण नव्हते. परिषदेत भाग घेतलेल्या ११२ देशांमध्ये ७७ देश पूर्ण लोकशाही असलेले व ३१ देश अंशतः लोकशाही असलेले व तीन देश लोकशाहीचा पूर्णतः अभाव असलेले असे वर्गीकरण आहे. गेल्या दहा वर्षात लोकशाहीची पीछेहाट झालेल्या देशांत प्रामुख्याने ब्राझील, भारत, फिलिपीन्स व पोलंड यांचा समावेश असून, मध्य आशियातील निमंत्रित देशात इराक व इस्त्रायल या केवळ दोन देशांचा समावेश आहे.

**नेत्यांवर पाळत हा लोकशाहीवरील प्रहार**

लोकशाही राष्ट्रांना एकत्र येण्याची गरज आहे, ती आणखी एका कारणासाठी. हे सायबरयुद्धाचे जग आहे. तेव्हा, एखाद्या राष्ट्राला हतबल करावयाचे असेल, तर थेट युद्ध करण्याची गरज नसते. त्याच्यावर सायबरयुद्ध लादून ते साधता येते. हे वारंवार, चीन व रशिया दाखवून देत आहेत. काही महिन्यांपूर्वी मुंबईत एकाएकी झालेल्या ब्लॅकआऊटचे उगमस्थान चीनहून झालेला सायबर अटॅक होता. 'द इकॉनॉमिस्ट' या नियतकालिकाच्या १८ डिसेंबरच्या अंकातील माहितीनुसार, ''रशिया सायबरअस्त्राचा वापर करून अनेक सरकारे व कंपन्यांच्या कामकाजात अडथळे निर्माण करीत आहे. सायबर अटॅकर्स ते थांबविण्यासाठी लाखो बिटकॉइन्सची मागणी करतात. अमेरिकन फेडरल ब्यूरो ऑफ इन्हेस्टिगेशन (एफबीआय) नुसार, अमेरिकेतील कोलोनियल पाइपलाईन बंद करण्यासाठी एका सायबर गँगने कंपनीच्या बिटकॉइनच्या तपशीलाचा वापर केला. मार्चमध्ये मायक्रोसॉफ्टच्या आंतरराष्ट्रीय इ-मेल प्रणालीवर चीनने हल्ला केल्याचा आरोप बायडेन सरकारने केला होता. मे २०२१ मध्ये 'डार्कसाईड' गटाने अमेरिकेतील रसायने वितरित करणाऱ्या ब्रेनटॅग या कंपनीचा १५० जीबी डाटा चोरला व हल्ला थांबविण्यासाठी बिटकॉइनच्या ७.५ दशलक्ष चलनाची मागणी केली. बहुतेक हल्ले चीन, इराण, रशिया व उत्तर कोरियातून होत आहेत. 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इटरनॅशनल स्टडीज'नुसार, २०२१ मध्ये जगात ११८ मोठे सायबर हल्ले झाले. संशोधक व तज्ज्ञांच्या मते, ''सायबर हल्ल्याचे तब्बल सहा लाख प्रयत्न झाले आहेत. त्यातून संगणक प्रणालीतील डाटाची लूट केली जाते, तिची नासधूस करून ती निकामी केली जाते.'' इस्त्रायलच्या एनएसओ कंपनीने तयार केलेले 'पेगॅसस' तंत्रज्ञान वापरून भारत सरकारने अनेक पत्रकार आणि नेत्यांवर पाळत ठेवल्याचा आरोप होतोय. लोकशाहीवर हा प्रहार आहे. अशा हल्ल्यांना तोंड देण्यासाठी प्रतिहल्ला करणारे तंत्रज्ञान लोकशाही राष्ट्रांना सतत संशोधित व विकसित करावे लागेल.

यावेळी एका गोष्टीकडे लक्ष वळवणे गरजेचे आहे. गेल्या तीस-चाळीस वर्षात ''हुकूमशाही व लष्करशाही असलेल्या देशांमध्ये लोकशाहीचे रोपण करण्याचा ठेका आपल्याकडे आहे,'' असे अमेरिका वागत होती. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचा हा एक केंद्रबिदू होता. त्यामुळेच सर्वविनाशक अस्त्रे असल्याचा खोटा आरोप करून अमेरिकेने इराकवर हल्ला केला व अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना यमसदनी पाठविले. तोच कित्ता अमेरिकेने लीबियात गिरविला व अध्यक्ष मुअम्मर गद्दाफी यांचा काटा काढला. तेथे अद्याप लोकशाही प्रस्थापित झालेली नाही. अफगाणिस्तानातील तालिबानचा म्होरक्या ओसामा बिन लादेनला जलसमाधी देऊन आणि तब्बल २० वर्षे तालिबानविरूद्ध लढा देऊनही अमेरिका तेथे लोकशाही प्रस्थापित करू शकली नाही. जगात दहशतवाद पसरविणाऱ्या पाकिस्तानला गेली चाळीस वर्षे अमेरिकेने भारतीय लोकशाहीविरूद्ध पाठिंबा दिला. अमेरिकेच्या इतिहासाकडे पाहता, फिलिपीन्समधील फर्डिनांड मार्कोस, पनामातील इमॅन्यूएल नोरिएगा यांना अमेरिकेने पाठिंबा दिला. कहर केला तो अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी. त्यांनी तर उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांच्या गळ्यात गळा घातला. सारांश, आपण लोकशाहीचे सर्वोत्तम नेते आहोत, अशी शेखी अमेरिकेला मिरविता येणार नाही. तेथे आजही कृष्णवर्णीयांवर अत्याचार होत आहेत. तरीही बायडेन यांनी घेतलेली ही शिखर परिषद लोकशाहीप्रणाली असून हुकूमशाही वा एकाधिकारशाहीकडे झुकणाऱ्या नेत्यांसाठी इशारा आहे. येत्या वर्षात हे देश लोकशाहीच्या दिशेने किती प्रवास करतात, हे लोकशाहीसाठी पुढील वर्षी होणाऱ्या शिखर परिषदेतून प्रत्ययास येईल. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# फॅसिझमचे मूळ : मनुस्मृती



बी.जी. वाघ

*धर्म नावाचा चक्रव्यूह अत्यंत हुशार लोकांनी निर्माण केला आहे. त्यात जो प्रवेश करील त्याला बाहेर येता येणार नाही, अशी ही व्यवस्था आहे. अशा मनुस्मृतीचे दहन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी हजारो अस्पृश्यांच्या समोर केले ते योग्यच केले, असेच भविष्यकालीन इतिहासकार अभिमानाने म्हणतील.*




'मनुस्मृती'ला धार्मिक ग्रंथ म्हणण्याऐवजी त्याला प्राचीन काळातील आध्यात्मिक फॅसिझम म्हणावा लागेल. मनुस्मृतीत प्रत्येक अपराधाला कठोर शिक्षा आहे; परंतु ती फक्त शूद्र, अतिशूद्रांनाच. मनुस्मृतीने वंशहत्येचेच (Genocide) पातक केले आहे; परंतु त्या ग्रंथकर्त्याला किंवा त्याच्या वारसदारांना कुठलीही शिक्षा झालेली नाही. उलट ते सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात कायम अग्रस्थानी राहिले आहेत. याचा अर्थ असा, की या धर्मग्रंथांनी देशाला मानसिकदृष्ट्या गुलाम केलेले आहे. वंशवादाची मांडणी करणाऱ्या नित्शेने मनुस्मृतीपासूनच स्फूर्ती घेतलेली आहे. तसे त्याने कबूल केले आहे. तो लिहितो, 'मी जेव्हा मनुस्मृती वाचतो, तेव्हा एक वेगळाच अनुभव येतो. ते बौद्धिकदृष्ट्या एक सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे. त्याची बायबलशी तुलनाच करता येत नाही. ते एका जन्मजात श्रेष्ठत्वाची घोषणा करते. त्यात महान तत्त्वे आहेत. सूर्य त्या पुस्तकावर जणू प्रकाशतो.' फॅसिझम ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. विशेषतः हा फॅसिझम धर्माधिष्ठित अध्यात्मवादी आहे. नित्शे हा शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल होता. त्याला सामान्य जनतेविषयी पराकोटीचा द्वेष होता. बायबलचा आणि इतर मानवतावादी धर्मांचा त्याला तिरस्कार होता. दया, क्षमा, शांती, सहिष्णुता, सत्यनिष्ठा आदी गुण त्याला माणसाला दुर्बल करणारे वाटत होते. खरे आहे ते सामर्थ्य. सामर्थ्यच सर्व सद्गुण आहेत. सुपरमॅनची कल्पना त्याला आकर्षित करीत होती. त्याने लिहिलेले 'Thus Spoke Zarathustra' हे पुस्तक म्हणजे मनुस्मृतीची दुसरी आवृत्ती आहे. त्याच्या या तत्त्वज्ञानातूनच हिटलर आणि मुसोलिनी जन्माला आले.

**हिंदुत्व म्हणजेच ब्राह्मणत्व**

वंशाधारित श्रेष्ठत्व व आक्रमक राष्ट्रवाद ही फॅसिझमची तत्त्वे आहेत. भारतात फॅसिझमने प्रवेश केला आहे तो या मनुस्मृतीच्या आणि हिटलरच्या प्रेरणेमुळेच. स्वतःला आर्यवंशी समजणाऱ्या एका वर्गाने हिटलर-मुसोलिनीची भेट घेतली व आपल्या संघटना उभ्या केल्या. ज्यांना आपण 'प्रतिक्रांतीवादी' म्हणतो ते हेच लोक आहेत. जगातील महान तत्त्वज्ञ हेगेलने आपल्या 'लेक्चर्स ऑन द फिलॉसॉफी ऑफ वर्ल्ड हिस्ट्री'मध्ये म्हटले आहे, की 'एखाद्या ब्राह्मणाला जर विचारले की, 'ब्रह्म काय आहे' तर तो म्हणतो, 'मी जेव्हा स्वतःला स्वतःमध्ये बंदिस्त करून घेतो आणि माझी बाह्य ज्ञानेंद्रिये बंद करतो आणि स्वतःशीच ओम म्हणत राहतो तेव्हा तेच ब्रह्म असते.' हेगेल पुढे म्हणतो, 'हिंदुत्व म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून ब्राह्मणत्वच आहे. तो एखाद्या धर्माची निर्मिती करण्याचा एक मिथकीय (Myth)प्रकार आहे.' हेगेलला भारतीय समाजव्यवस्थेविषयी फारशी माहिती नव्हती. तरी त्याने लिहिले आहे, 'हिंदू लोक मुंगीवरसुद्धा पाय देणार नाहीत; पण जेव्हा गरीब, भटके लोक भुकेने कळवळत असतात, तेव्हा

मात्र त्यांच्यात काहीच फरक पडत नाही. विशेषत: ब्राह्मण लोक अनीतिमान असतात. इंग्रजांच्या अहवालाप्रमाणे ते खातात आणि झोपतात. त्यांच्या शास्त्रांमध्ये ज्या गोष्टींना प्रतिबंध केलेला नाही, त्या सर्व बाबतींत ते आपल्या नैसर्गिक प्रेरणांना अनुसरून वागतात. जेव्हा कधी ते एखाद्या सामाजिक गोष्टीत भाग घेतात, तेव्हा ते स्वतःच्या हावरटपणाचे, कपटीपणाचे, भोगी वृत्तीचे प्रदर्शन घडवतात.'

**माणसांची गुणधर्मानुसार विभागणी**

जातिव्यवस्था ही कायम स्वरूपाची श्रमविभागणी आहे. कुंभाराने कुंभारच राहावे. चांभाराने चांभारच. कारण ती जन्मजात आहे. चांभार कुंभार होऊ शकत नाही आणि कुंभार चांभार. यामुळे प्रत्येकाला रोजगाराची हमी आहे आणि कोणी कोणाशी भांडत नाही, असा समर्थकांचा युक्तिवाद असतो. कलाकौशल्यांचाही विकास होतो. कारण हजारो वर्षे ठराविक समाज त्याच व्यवसायात असतो. भगवद्गीतेत माणसांची गुणधर्मानुसार विभागणी केली आहे ती याच शास्त्रीय तत्त्वांमुळे. आमचे पूर्वज किती महान होते, हे त्यामुळे सिद्ध होते; परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'ही श्रमिकांची विभागणी आहे. त्यांच्या समस्या एक असूनही ते कधीही एकत्र येत नाहीत. त्यामुळे हजारो वर्षांपासून ही व्यवस्था विनातक्रार उभी आहे. तिच्यात कुठलेही परिवर्तन नाही. सामाजिक वा आर्थिक क्रांतीचा तर विचारही करता येत नाही. बुद्धाने आपले शेवटचे जेवण एका लोहाराच्या घरी घेतले; परंतु हिंदू धर्मगुरूंनी, शंकराचार्यांनी अशी चूक कधीही केली नाही. कारण त्यामुळे ही वेद, श्रुती, स्मृती, पुराणोक्त व्यवस्था कोसळली असती आणि ती कोसळू नये म्हणून एक धार्मिक तत्त्वज्ञान उभे केले, जे सामान्य माणसाला कधीही कळणार नाही. भारतातील एक बुद्धकाळ सोडला, तर भारत कधीही ज्ञानसत्ता नव्हती, याचे मुख्य कारण येथील वर्णव्यवस्था आणि धर्माच्या नावे उभी केलेली एक भ्रमसत्ता. धर्माचा मुख्य उद्देश माणसाचा नैतिक विकास हा आहे; परंतु या ब्राह्मणी धर्मात केवळ ब्राह्मणांचाच विकास आहे. पुरावा नसताना विधाने करणे, त्याला एक धार्मिक उत्पत्ती जोडणे, एक नवे मिथक तयार करणे किंवा अस्तित्वात नसलेल्या प्राचीन ऋषीमुनींची साक्ष काढणे याला धर्म म्हणत नाहीत. धर्माच्या प्रेरणा निव्वळ आध्यात्मिक असल्या पाहिजेत. त्यामागे सत्याची दृष्टी हवी. हिंदू धर्माची व्याख्या करताना सर एडवर्ड गेट म्हणतो, 'मत-मतांतरांचा एक असा समुच्चय ज्यात एकेश्वरवाद, बहुदेववाद, सर्वेश्वरवाद, महादेव, शिव, विष्णू, दुर्गा, लक्ष्मी आणि वृक्ष, दगड, नद्या इत्यादींचा पूजनात समावेश होतो. हे लोक वरील वस्तूंना बळी देऊन संतुष्ट करतात. धर्माच्या नावे जपजाप्य करतात.'

हिंदू धर्माच्या धार्मिक स्वरूपाबद्दल सर आल्फ्रेड लॉयलने म्हटले आहे, की 'हिंदू धर्म हा अंधश्रद्धा, आचारविचार, उपासनापद्धती, रूढी-परंपरा आणि पौराणिक कथांचा समावेश असलेल्या गुंतागुंतीचा समुच्चय आहे. त्याला ब्राह्मणांची मान्यता असून, त्याचा प्रचारदेखील तेच करतात.' प्रा. सेननुसार हिंदू व्यक्ती आपल्या जातीचा गर्व करते व अभिमान बाळगते; मात्र अशा हिंदूंना वेदाध्ययन करण्याचा अधिकार नाही. कारण मनुस्मृती म्हणते, ब्राह्मणांच्या परवानगीशिवाय कोणीही वेदाध्ययन करू शकत नाही. जो कोणी

## *मार्क्सचे तत्त्वज्ञान गैरलागू*

*जगात सर्वांत जास्त वंशसंहार यहुद्यांचा झाला आहे. हिटलरने साठ लाख यहुदी मारले; परंतु भारतातील या वंशव्यवस्थेने किती शूद्र, अतिशूद्रांना मारले, याचा हिशेब इतिहासाने ठेवलेला नाही. धार्मिक व जातीय छळामुळे आजही असंख्य दलित स्त्री-पुरुष मारले जातात. त्यांची आकडेवारी मात्र उपलब्ध आहे. या छळामागे हिंदू व्यवस्थाच आहे. ती बदलल्यासारखी वाटते; परंतु ती बदलत नाही. याला कारण मनुस्मृतीचे हिंदू मानसिकतेवर झालेले खोल संस्कार. यासाठी जसा हिंदू मानसिकतेचा शोध घ्यावा लागेल, तशीच या ब्राह्मणी धर्मग्रंथांची पडताळणीही करावी लागेल. मनुने म्हटले आहे, 'जन्माच्या अग्रहक्कामुळे व प्रथम जन्मामुळे ब्राह्मण जन्मजातच श्रेष्ठ आहेत. त्यांनाच वेदांचे ज्ञान आहे. तेच यज्ञोपवित धारण करू शकतात. तेच सर्व वर्गांचे, वर्णांचे, जातींचे मालक आहेत. कार्ल मार्क्सने जगाचा इतिहास हा वर्गयुद्धांचा इतिहास म्हटले आहे; परंतु हिंदू व्यवस्थेमुळे वर्गयुद्धांचा प्रश्नच येत नाही. मनुस्मृतीने तो आधीच मिटवून टाकला आहे. कारण सर्व वर्गांचा ईश्वरदत्त मालक ब्राह्मणच आहे. राजापेक्षा ब्राह्मण श्रेष्ठ आहेच; परंतु कायद्यापेक्षाही तो श्रेष्ठ आहे. कारण तोच कायद्याचा निर्माता आहे.' त्यामुळे मनुने असे म्हटले आहे की, राजाने भल्या पहाटे उठावे. ब्राह्मणांची पूजा करावी. त्यांचा सल्ला घ्यावा. कारण ब्राह्मण हाच शिक्षक आहे व शिक्षा देण्याचा त्याला अधिकार आहे. त्यामुळे ब्राह्मणविरोधी बोलणाऱ्यांना कठोर शिक्षा द्यावी. ब्राह्मणांमध्येच नित्शेने कायदा आणि राजसत्तेपेक्षा महान असा सुपरमॅन पाहिला आहे. वंशवाद व राष्ट्रवाद या दोन चलनी नाण्यांवर हिटलर सर्वसत्ताधीश झाला. आजचे मनूचे वारसदार असे प्रखर राष्ट्रवादी असतात. कारण त्यांचे राष्ट्र म्हणजेच त्यांचा धर्म असतो. तो धर्म मनुस्मृतीवर आधारित आहे आणि तो केवळ ब्राह्मणहिताकरिताच निर्माण झाला आहे. मनुस्मृती वेदप्रणित आहे आणि वेद ईश्वरप्रणित, अपौरुषेय असे आहेत. त्यांच्यावर टीका करणे म्हणजे देशद्रोह व धर्मद्रोह आहे. या व्याख्या पुरातन आहेत. त्यामुळे मार्क्सचे शास्त्रीय तत्त्वज्ञान या व्यवस्थेला लागू होत नाही. कारण ही व्यवस्थाच मुळी निव्वळ अंधश्रद्धांवर, काल्पनिक गृहीतकांवर (ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मले) उभी आहे. तिचे वारसदार किंवा निर्माते बुद्धिमान वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. या व्यवस्थेचे समर्थन करण्यालाच ते सर्वश्रेष्ठ बुद्धिमत्ता म्हणतात. कारण धर्म हा श्रद्धेचा प्रश्न आहे. तो कायद्याद्वारे सोडवता येणार नाही. कारण कायदा व राजसत्तेपेक्षा धर्म श्रेष्ठ असतो, या त्यांच्या तर्कशास्त्रापुढे कुठलाही विवेक टिकत नाही, याचे महत्त्वाचे कारण धर्मवेडी जनता विवेकी नसते, हे त्यांना माहीत आहे.*

असे करील, त्यावर चोरीचा आरोप ठेवावा. अशा परस्पर विसंगतीतून सुसंगती साधणे म्हणजे एक नवीन कथा निर्माण करणे किंवा तिचा सबंध संदर्भ वेदांत, आरण्यकांत किंवा स्मृतींत शोधणे. कारण अंतिम सत्य म्हणजे वेद. कारण ते ब्रह्माच्या मुखातून आले आहेत. ब्राह्मणही ब्रह्माच्या मुखातूनच आल्यामुळे ते सहोदरच आहेत. वेद म्हणजेच ब्राह्मण असा सहज अर्थ स्मृतिकार काढतात. इतर धर्मांचे संस्थापक हे ईश्वर आणि माणूस यातील दुवा असतात. त्यांना नबी, संदेष्टे किंवा प्रेषित म्हणतात. त्यांनी कधी आपले महत्त्व वाढवले नाही. पैगंबरांची कुठेही पूजा केली जात नाही. त्यांचे चित्र काढणेही धर्माची तोहीन समजली जाते. तीच गोष्ट येशू ख्रिस्ताचीही आहे. त्याने आपल्या शिष्यांचे पाय धुतले. धर्म सांगितला तो सेवेचाच.

**वंशपरंपरेप्रमाणे पीठासने चालवली**

हिंदूमधील धर्मवेत्त्यांनी, महंतांनी आपली पीठासने स्थापन केली आणि वंशपरंपरेप्रमाणे ती चालवली. म्हणजे गुरूने आपल्या शिष्यांना नव्हे तर आपल्या मुलांनाच गादीवर बसवले. हा आरोप आदि शंकराचार्यांवरही होतो. त्यांनी चारीधाम स्थापन केले; परंतु त्यांच्या पीठासनावर नंबुद्री ब्राह्मणांनाच बसवले. कारण शंकराचार्य हे नंबुद्री ब्राह्मण होते, हा आरोप खुद्द विवेकानंदांनी केला आहे. समर्थ रामदासांनीही आपल्या गादीवर आपल्या पुतण्यांनाच बसवले; आपल्या प्रिय शिष्याला नाही. बुद्धाने आपल्या मुलाला धर्म दिला, सत्ता दिली नाही. आपल्या पत्नीलाही दीक्षा दिली, परंतु तिचे स्तोम माजवले नाही. शेवटपर्यंत त्यांच्यासोबत त्यांचा शिष्य आनंद होता. त्यांनी सांगितले की, आपल्यानंतर धर्मच तुमचा गुरू राहील, कोणी व्यक्ती नव्हे. हिंदू धर्म आणि इतर धर्मांतील ही वैशिष्ट्ये सहजपणे लक्षात येतात. हिंदू धर्मात स्वामी असतात. बौद्ध धर्मात स्वामी संकल्पनाच नाही. तेथे आहे ती संपूर्ण समता. बुद्धाने वेद नाकारले. श्रुती, स्मृती नाकारल्या. परंपरा नाकारल्या. कारण त्या माणसामाणसांत भेद निर्माण करणाऱ्या होत्या. सत्याचा संबंध तर्कविवेकाशी असतो. माणसाच्या नैतिक उन्नतीशी असतो. माणसाची उच्चतम नैतिक शुद्धता सत्याला सत्याकडे घेऊन जाते. सत्याचा पाया शील, प्रज्ञा, करुणेशी आहे. सर्वांप्रति समानत्व हा धर्माचा अंगभूत विशेष आहे. सर्वांप्रति जातीनिहाय द्वेष हा हिंदू धर्माचा पाया आहे. विषमता हे त्याचे मर्म आहे. अशा उच्चतम जाणिवा ना वेदांत आहेत ना उपनिषदांत. तेथे आहे तो ऐहिक स्वार्थ आणि भोगवादी प्रेरणा. 'त्यक्तेन भुजिथ:' असे ईशावास्योपनिषदात म्हटले आहे; परंतु सगळीकडे आहे देवदेवतांचा, ऋषीमुनींचा भोगच. व्यक्तिगत नीतिमत्तेचा व सामाजिक नीतिमत्तेचाही अभाव आपल्याला दिसून येतो. त्याची असंख्य उदाहरणे धर्मग्रंथांत आहेत. कृष्णाने अर्जुनालाही उपदेश करताना म्हटले आहे, की 'जिंकलास तर पृथ्वीचा भोग घेशील, मेलास तर स्वर्गाचा.' कृष्ण-अर्जुनाचे व्यक्तिगत जीवन या भोगवादाने भरलेलेच आहे. कृष्ण जन्मखंडात विष्णू स्वतःच कृष्णाच्या प्रेमलीलांचे नारदाला वर्णन करतो. नऊ लाख गोपींसमवेत कृष्ण कामरत झालेला असताना (नऊ लाख गोपी + नऊ लाख कृष्ण) होणाऱ्या ध्वनी व आनंदोत्सवाचे तो साग्रसंगीत चित्र उभे करतो. भक्तिसंप्रदायात व्यभिचार मान्यच होता. भागवतात अशी अनेक वर्णने आहेत. अर्थात, त्याबद्दल आक्षेप घेण्याचे कारण नाही. भक्त आणि देव जीवनवादी होते, असे म्हणता येईल. मूळ वेदांतील तत्त्वज्ञान व त्यातून निर्माण झालेली कर्मकांडे भोगवादीच आहेत. ऋग्वेदात, यजुर्वेदात अशी अनेक वर्णने आहेत की, ज्यांना आज अश्लील आणि बीभत्स म्हणता येईल. वि. का. राजवाडे यांच्या 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या पुस्तकात ती आली

### धार्मिक कर्मकांडातून यज्ञसंस्थेचा जन्म

*शांतिपर्वात भीष्माने वर्णन केले आहे, की कृतयुगात स्त्री-पुरुषांच्या मनात आले म्हणजे संभोग होत असे. त्रेतायुगात स्त्री-पुरुषांनी परस्परांना स्पर्श केला तर तात्पुरत्या संभोगाची परवानगी असे. द्वापारयुगात मैथुनधर्म सुरू झाला. म्हणजे टोळ्यांतील स्त्री-पुरुषांना संभोगाची परवानगी होती. कलियुगात द्वंद्वावस्था आली. म्हणजे आधुनिक विवाहसंस्था आली. पूर्वी आर्य लोक मुक्त संभोग करीत, तेव्हा विवाहसंस्थेचा जन्म झालेला नव्हता. आगटीभोवती ते एकत्र जमत आणि वन्य पशू-पक्ष्यांप्रमाणे मुक्त संभोग करीत. कालांतराने त्याला धार्मिक कर्मकांड जोडले गेले व त्यातून यज्ञसंस्थेचा जन्म झाला. सोमरस पिऊन आर्य स्त्री-पुरुष उघड्यावर संभोग करीत. त्यामुळे सोम ही देवता रेत उत्पन्न करणारी ठरली. संभोगासाठी जी साधने वापरली जात, त्यांनाही देवत्व प्राप्त झाले. त्यात काटक्या, समिधा, अग्निकुंड (जे स्त्री योनीचे प्रतीक होते) यांना देवतारूप मिळाले. स्त्रीशी मुक्त संभोग हा देवतेचा प्रसाद ठरला. लिंगाला किंवा योनीला हात लावून अभद्र शब्द उच्चारणे त्या परंपरेतच होते. वाटेल त्या स्त्रीला वाटेल त्या पुरुषाने संभोगार्थ न्यावे, असा नियम होता. त्याला ते धर्म म्हणत. अश्वमेध यज्ञात राण्या घोड्याशी व नंतर ऋत्विजांशी संभोग करीत. त्याची वर्णने वेदांत आहेत.*

*ज्या स्त्रीला कोणी धरून नेत नाही व त्यामुळे तिला रतिसुख मिळत नाही म्हणून तक्रार ती करीत आहे, यासंबंधीची वर्णने वेदांत आहेत. कृष्ण यजुर्वेद संहितेत राजपत्नी घोड्याला आवाहन करते, 'तू प्रियकराचा प्रियकर आहेस. तू मजशी गर्भ घाल. तू वीर्यसंपन्न आहेस.' हे वर्णन पुढे अत्यंत अश्लीलतेकडे वळते. घोडा हा संभोगसामर्थ्याचे किंवा वीर्यसंपन्नतेचे प्रतीक आहे. या संभोगाच्या वेळी मंत्र म्हटले जात. यज्ञ म्हणजे आगटीभोवती जमणे, काटक्या (ज्याला समिधा म्हणत) व मारलेल्या जनावरांची चरबी टाकून अग्नी चेतवणे, सोमाची दारू पिणे, जननेंद्रियांबाबत हात लावून उघड बोलणे, मैथुन करणे या क्रियाक्रमांनाच ते रानटी लोक 'यज्ञ' म्हणत. यज्ञाचा अर्थ गमन करणे, एकत्र जमणे असा आहे. एका ठिकाणी बसून जननक्रिया करणे म्हणजे यज्ञ होय. त्यातून पुढे हवी अर्पण करणे, देवादिकांना आवाहने, पशूंचा बळी देणे असे प्रकार वाढीस लागले.*

आहेत.

### श्रेष्ठत्वासाठी मिथकाची निर्मिती


आपल्यापेक्षा बलिष्ठांना स्वस्त्री (स्वत:ची स्त्री) भोगण्यास देण्याची चाल होती. स्त्री एक वस्तू आहे, अशा तऱ्हेने तिची विल्हेवाट रामायण-महाभारतात अनेक कथांतून केलेली दिसते. स्त्रीच्या अग्रोपभोगाचा अधिकार देवा-ब्राह्मणांचा होता, असे अश्वलायन गुह्य सूत्रातून दिसते. अनोळखी पुरुषांना (तो ब्राह्मण असेल तर) स्त्री अर्पण करणे धर्मसंमत होते. महाभारताच्या अनुशासन पर्वात सुदर्शनाच्या पत्नीने अतिथी म्हणून आलेल्या ब्राह्मणांनी संभोग केला, तेव्हा भीष्म धर्मराजाला सांगतो, की या कृतीमुळे सुदर्शनाची कीर्ती त्रिभुवनात पसरली व त्याला इंद्रलोक प्राप्त झाला. चिरकारीच्या आईने गौतम ऋषी दुसरीकडे गुंतला असताना आलेल्या अतिथी इंद्राशी संभोग केला, तेव्हा गौतमाने चिरकारीला त्याच्या आईचा वध करण्यास सांगितले; पण त्याने तो केला नाही. जमदग्नीची बायको रेणुका हिने चित्ररथ गंधर्वाला सकाम हेतूने पाहिले, तेव्हा जमदग्नीने आपल्या पुत्राला- परशुरामाला रेणुकेचा वध करण्यास सांगितले आणि त्याने तो केला. परशुराम मनुस्मृतीचा समर्थक होता, हे उघड आहे. वर्णसंघर्षात ब्राह्मणच सर्वश्रेष्ठ आहेत, हे सिद्ध करण्यासाठी परशुराम हे मिथक निर्माण करण्यात आले आहे. त्यामागेही मनुस्मृतीच आहे. डॉ. आंबेडकरांनी भीष्माला दांभिक व ढोंगी म्हटलेले आहे. त्याने स्वतः लग्न केले नाही, परंतु आपल्या सुनांशी व्यासाकरवी नियोग पद्धतीने संभोग घडवून आणला. अशा संभोगाची तो वारंवार तरफदारी करताना दिसतो. उद्योग पर्वात सहाव्या अध्यायापासून १२३ व्या अध्यायापर्यंत माधवीचे आख्यान वर्णिले आहे. गालव नावाच्या ऋषीला दक्षिणा देता आली नाही म्हणून ययाति या राजाने आपली मुलगी माधवी दिली. गालवाने तीच मुलगी स्वतः भोगली आणि तीन राजांना एकेका वर्षाकरिता तिला भाड्याने दिली. म्हणजे पैसे घेऊन संभोगार्थ दिली. त्यांची मुदत संपल्यानंतर गालवाने माधवीला विश्वामित्राला अर्पण केले. त्याने ती स्वखुशीने एक वर्ष वापरली. तिच्यापासून विश्वामित्राला एक मुलगाही झाला. या कथेतून अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. मुलींना-स्त्रियांना भाड्याने देण्याची पद्धत त्या काळी असली पाहिजे.

### मनुस्मृती समर्थक का टिकून आहेत?

आपली दक्षिणा वसूल करण्यासाठी ब्राह्मण कोणत्याही पातळीवर जात होते. ययातिने आपली मुलगी ब्राह्मणाला अर्पण केली, हे भयंकर अनैतिक कृत्य होते; परंतु त्याची जाणीव ना ब्राह्मणाला होती ना राजाला. ययातिची मुलगी अविवाहित होती, म्हणजे दहा वर्षांची होती. मनुस्मृतीप्रमाणे आठव्या वर्षीच मुलीचे लग्न करणे आवश्यक होते. ती धर्माज्ञाच होती. दहाव्या वर्षी स्त्री संभोगाला योग्य होते, असे त्यांचे मत होते. अशा एका सुकुमार, कोवळ्या मुलीला चार-चार वयस्क माणसांनी भोगले. तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. तिचे आक्रंदन ना भीष्माला कळले ना विश्वामित्राला. मनुस्मृतीत तर स्त्रियांना नकाराचा अधिकारच नाही. आधुनिक दंडसंहितेप्रमाणे तर तो बलात्कार, खून अशाच स्वरूपाचा गंभीर गुन्हा आहे; परंतु मनुस्मृतीत ब्राह्मण अवध्य आहेत. ही परंपरा आजही अदृश्य स्वरूपात वावरते. स्वतंत्र भारतात अद्यापपर्यंत एकाही ब्राह्मण गुन्हेगाराला फाशी झालेली नाही. आजही उत्तर प्रदेशात एका प्रकरणात वकिलाने हाच मुद्दा मांडला, की ब्राह्मणाला आपल्या धर्मपरंपरेप्रमाणे फाशी देता येत नाही. आजची आकडेवारी पाहता, फासावर गेलेले गुन्हेगार व अनुसूचितजाती-जमातीचे, अल्पसंख्याक व मागासवर्गीय आहेत. मनुचा पुतळा आजही राजस्थानच्या हायकोर्टात दिमाखाने उभा आहे. याच्या कारणांची फार चर्चा करण्याची गरज नाही. भारताने समता हे तत्त्व कधीही मनापासून स्वीकारलेले नाही. मनुस्मृती समर्थकांची परंपरा आजही सक्षमपणे काम करीत आहे. ती अमानवी, अनैतिक आहे, हे दिसत असूनही तिला नाकारण्याइतके नैतिक सामर्थ्य आज अभावानेच आढळते. वर्णव्यवस्था टिकून राहण्याचे कारण आधुनिक मूल्यव्यवस्था स्वीकारायला भारतीय मन तयार नाही. ते

## *भीष्म मनुस्मृतीचा वारसदार*

*अग्नी आणि प्रजोत्पादन यांचा घनिष्ठ संबंध ऋग्वेदात आहे. स्त्री-पुरुष संबंधांना कुठलाही धरबंध नव्हता. त्यात बहीण-भावंडांचे विवाह होत. वशिष्ठाने आपल्या मुलीशी लग्न केले. मनुने आपल्या इला या मुलीशी संभोग केला. जन्हूची मुलगी जान्हवी हिने आपल्या बापाला पती केले. लोपामुद्रा या आपल्याच मुलीशी अगस्तीने विवाह केला. नियोग पद्धती फार प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. बळीराजाने संततीसाठी दीर्घतमा ऋषीस बाळगले. सुदेष्णेपासून दीर्घतमाच्या वीर्याने अंगवंग, कलिंग, पुंड व सुह्म असे पुत्र निर्माण झाले. काही थोडे द्रव्य देऊन एखादा ब्राह्मण बोलावून आणावा व त्याच्यापासून क्षेत्रामध्ये प्रजोत्पादन करून घ्यावे, असे भीष्म निर्लज्जपणे सांगतो. (आदिपर्व) याचा अर्थ हे काम फक्त ब्राह्मणच करू शकतो. क्षत्रिय किंवा शूद्र करू शकत नाही, असे त्याला सुचवायचे आहे. शरददंडायनाने आपल्या भार्येस पुत्रोत्पादन करण्यास सांगितले. तिने राजमार्गावर जाऊन एका ब्राह्मणास आमंत्रण दिले व पुत्रोत्पादन केले. (आदिपर्व, १२०) हा वंशवाद आहे. फक्त ब्राह्मणांपासूनच चांगली संतती निर्माण होऊ शकते, असे भीष्माने वारंवार सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या अर्थानेही तो मनुस्मृतीचा वारसदार आहे. क्षत्रिय स्त्रियांना ब्राह्मणांनीच भोगावे, असा त्याचा हट्ट दिसतो. क्षत्रियांना त्यांची जागा दाखवणे व धर्मग्रंथांद्वारे अशी मिथ रचणे की, क्षत्रिय ब्राह्मणांपासूनच निर्माण झाले आहेत व त्यामुळे ते ब्राह्मणांचे दास आहेत, यामागे निश्चितच ब्राह्मण-क्षत्रिय यांच्यातील संघर्ष असावा. या कथा पद्धतशीरपणे रचल्या गेल्या आहेत, हे सिद्ध होते. जे तलवारीच्या जोरावर करणे शक्य नाही, ते धर्मग्रंथांद्वारे त्यांनी साध्य केले आहे. क्षत्रियांनी ब्राह्मण स्त्रियांना गर्भदान केले, अशा कथा रामायण-महाभारतात दिसत नाहीत. तिन्ही वर्णांची संतती ब्राह्मणांच्या योगे झाली. ब्राह्मण हा सर्व वर्णांचा प्रजापती (जन्म देणारा) आहे व तो श्रेष्ठ आहे, असे शांतिपर्वात (७२) म्हटले आहे.*




## *विषमतेचे मूळ धर्मग्रंथांमध्ये*

*भारताच्या विषमतामूलक समाजव्यवस्थेचे व धर्मव्यवस्थेचे मूळ येथील धर्मग्रंथांत आहे. ते धर्मग्रंथ बुद्धाआधी की बुद्धानंतर निर्माण झाले, असा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'क्रांती आणि प्रतिक्रांती', 'रिडल्स', 'द अनटचेबल्स' इत्यादी ग्रंथांतून विचारला आहे. त्यासाठी त्यांनी अनेक जागतिक दर्जाच्या विद्वानांचे संशोधन अभ्यासले आहे. प्रा. गार्बे लिहितात की, आज जी गीता उपलब्ध आहे, त्यापेक्षा मूळ गीता वेगळी होती. या गीतेत १४६ श्लोक नवीन आहेत. भगवद्गीता इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात लिहिली गेली असावी, असे त्यांचे मत आहे. प्रा. कोसंबी यांनी आपले आग्रहपूर्वक मत नोंदवले आहे की, गीता बालादित्य राजवटीत लिहिलेली आहे. याचा अर्थ इसवी सनाच्या ४६७ मध्ये ती लिहिली असावी. त्याची दोन कारणे त्यांनी दिली आहेत : १) शंकराचार्यांनी भगवद्गीतेवर भाष्य करेपर्यंत ती कोणालाही माहीत नव्हती. शंकराचार्यांचा जन्म ७८८ व मृत्यू ८२० मध्ये झाला. गीतेचा उल्लेख शांतरक्षितांच्या तत्त्वसंग्रहात निश्चितपणे नव्हता. तत्त्वसंग्रह हा ग्रंथ शंकराचार्यांपूर्वी फक्त पन्नास वर्षे आधी निर्माण झाला होता. दुसरे असे, की वसुबंधू हा बौद्ध पंडित विज्ञानवाद या विचारधारेचा निर्माता होता. शंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्र भाष्यात विज्ञानवादावर टीका केली आहे. गीतेमध्ये ब्रह्मसूत्र भाष्याचा उल्लेख आहे. त्यामुळे गीतेची निर्मिती वसुबंधूनंतर केली गेली, असा निष्कर्ष काढता येतो. २) वसुबंधू हा गुप्त घराण्यातील राजा बालादित्याचा गुरू होता. या कारणावरून गीता बालादित्याच्या काळानंतर निर्माण झाली आहे.*

इतिहासापासून मुक्त झालेले नाही. ज्या गोष्टीची त्यांना शरम वाटली पाहिजे, त्याचा त्यांना अभिमान वाटतो.

**अनैतिक गोष्टींना धर्मग्रंथांची मान्यता**

ज्या गोष्टी अनैतिक आहेत, त्यांना आपल्या धर्मग्रंथांनी नैतिक रूप दिले आहे. रामायण-महाभारतात याची असंख्य उदाहरणे आहेत. कुंतीचा एकूण तीन पुरुषांशी संभोग झाला. तो कधी अनिच्छेने, कधी स्वेच्छेने. व्यासाने त्यावर पांघरूण घालून त्याला दैवी रूप केले व पांडवांची इज्जत वाचवली. माणसांच्या दृष्टीने जे अनैतिक ते देवांच्या दृष्टीने नैतिक ठरले. पुण्यकव्रतात स्त्रिया त्यांच्या नवऱ्यांपासून विकत घेऊन आचार्यास उदकपूर्व अर्पण कराव्यात, असे म्हटले आहे. नंतर द्रव्य देऊन ब्राह्मणांपासून त्या सोडवून घ्याव्यात, असे भविष्यपर्वात म्हटले आहे. पुढे वर्णव्यवस्था, वंशशुद्धता टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्यावर या धर्मव्यवस्थेने कठोर बंधने आणली; परंतु शूद्र स्त्रियांनी (क्षत्रियांसह) ब्राह्मणांशी केलेला व्यभिचार धर्मसंमतच राहिला. दक्षिणेकडील नायर स्त्रिया नंबुद्रीपाद ब्राह्मणांशी संबंध करीत. त्याला सामाजिक व धार्मिक मान्यता होती. केरळ राजघराण्यातील स्त्रिया लग्नानंतरची पहिली रात्र नंबुद्री ब्राह्मणांबरोबर घालवत. एवढेच नव्हे, तर त्या संबंधांतून झालेल्या मुलालाच राजा होता येत असे. ही चाल ब्रिटिश येईपर्यंत सुरू होती. त्यांच्या राजवाड्यातील भिंतींवर या चालीचा उल्लेख आजही पाहायला मिळतो. ही गोष्ट अपमानास्पद की गौरवास्पद, हे मात्र लिहिलेले नाही. शशी थरूर यांनी 'व्हाय आय ॲम हिंदू' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यांनी आर्यकाळातील बौद्धिक व वैचारिक स्वातंत्र्याचा उल्लेख केला आहे. परंतु ते खरोखर भारतात होते का, हा प्रश्न पडतो. विशेषत: नायर स्त्रिया स्वखुशीने ब्राह्मणांकडे गेल्या असतील का? ते शक्य नाही. तो स्त्रीत्वाचा अपमान आहे. भांडवलशाहीने स्त्रीचे वस्तुकरण केले आहे, असे म्हटले जाते; परंतु या व्यवस्थेने फार पूर्वीच स्त्रीचे वस्तुकरण केले आहे, हे वरील विवेचनावरून लक्षात येईल. भारतात बौद्धिक व नैतिक स्वातंत्र्य असावे; परंतु ते केवळ बुद्धकाळातच. कारण असल्या स्वातंत्र्यासाठीच बुद्धाने आपला बौद्ध धर्म स्थापन केला. अन्यथा बुद्धाला वेद, यज्ञसंस्था, स्मृती, श्रुती नाकारण्याचे काय कारण होते? ती अनैतिक व्यवस्थाच त्याला नष्ट करायची होती, जेथे स्त्री आणि शूद्रांना कुठलेही स्वातंत्र्य नव्हते. शशी थरूर यांनी बुद्धकाळ किंवा त्याच्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख केला नाही; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, बुद्धाला प्रतिवाद करणे शक्य नसल्यामुळे ब्राह्मणी धर्माला स्वत:मध्ये काही बदल करावेच लागले. त्यामुळे हिंदू धर्मात जे काही चांगले, उदात्त आणि सुंदर आहे, ते बुद्ध प्रभावामुळेच आलेले आहे. स्वामी विवेकानंदांनीसुद्धा म्हटले आहे की, सध्याचा हिंदू धर्म मूळच्या बौद्ध धर्माचे अवनत रूप आहे. हे विधान माणसाला दूरगामी चिंतन करण्यास भाग पाडते.

**मूळ गीता कोणती?**

काळाच्या ओघात गीतेत अनेक बदल झाले आहेत. राजारामशास्त्री भागवत यांच्या म्हणण्यानुसार, मूळ गीतेत केवळ ६० श्लोक होते. हॅबॉल्टसच्या मतानुसार, मूळ गीतेत केवळ ११ अध्याय होते. तर हॉपकिन्स म्हणतो, की केवळ १४ होते. वि. का. राजवाडेसुद्धा १० व ११ हे अध्याय नंतर जोडले गेले आहेत, याच्याशी सहमत आहेत. प्रा. गार्बे यांच्या मतानुसार, मूळ गीतेत १४६ छंद नवीन घातलेले आहेत. याचा अर्थ गीतेचा पाचवा अध्याय नंतर जोडण्यात आला आहे. त्याच्या लेखकाचा कुठेही उल्लेख नाही. तीच गोष्ट रामायण-महाभारताची आहे. शरद पाटील, डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. कांबळे (रामायणातील संस्कृती संघर्ष), रावसाहेब कसबे यांनी या विषयांची वेगवेगळ्या पद्धतीने मांडणी केली आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

# फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा गोव्यात जागर



प्रा. डॉ. रोहिदास जाधव

*फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने संमेलन घेणे ही जशी धारिष्ट्याची बाब आहे, तशीच ती खूप मोठी जबाबदारीचीही आहे. ज्या महापुरूषांच्या नावाने ही संमेलने भरतात, त्यांचा विचार आपणास जगता यायला पाहिजे. कारण या महापुरूषांनीच या देशाचा आणि जगातील मानवतेचाही पाया पक्का केलेला आहे. त्याला कुठेही धक्का लागू नये म्हणून आपण कायम दक्ष राहायला हवे.*



**पणजी येथे नुकत्याच पार पडलेल्या फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसार संमेलनाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. रावसाहेब कसबे. सोबत ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे आणि अन्य मान्यवर...**

गोवा म्हटले की आपल्या नजरेसमोर येतात भव्य सागरी किनारे, त्या किनाऱ्यांवरची देशी-विदेशी पर्यटकांची वर्दळ, नारळांच्या बागा, भव्य रेस्टॉरंटस्, झगमगत्या दिव्यांमध्ये उजळून निघालेली हॉटेल्स, रस्त्यारस्त्यांवर बहरलेली, झिंगलेली तरूणाई! केवळ जीवाचा गोवा करण्यासाठी जाणारी अनेक मंडळी गोव्यात सापडतील. गोव्याची म्हणून एक खास शैली आहे, एक संस्कृती आहे आणि तिला एक लयसुद्धा आहे. त्यामुळेच गोव्याचे आकर्षण प्रत्येकाला वाटत असते. भौतिक सुख आणि समाधानाच्या पलिकडे जाऊन गोव्याचा विचार करणारी माणसं तशी खूपच विरळ! त्यातूनही फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेच्या नजरेतून पाहणारी माणसं तर अधिकच दुर्मिळ! वर्षानुवर्षे पोर्तुगीज संस्कृतीच्या छत्रछायेखाली राहिलेल्या गोव्यात 'फुले-शाहू-आंबेडकरी' विचारधारा रुजविणे, तिचा विस्तार करणे ही तशी अतिशय दुर्मिळ बाब; परंतु तरीही दादू मांद्रेकरांसारखा विचारवंत या मातीनं जन्माला घातला. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे त्यांच्यावर संस्कार झाले आणि पुढे त्यांच्या विचारांचा वारू संपूर्ण गोव्यात असा काही चौफेर उधळला, की बस! आज गोव्याच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जा, दादू मांद्रेकरांचे नाव कुणाला माहीत नाही अशी व्यक्ती सापडणार नाही. दादू मांद्रेकरांनी फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची चळवळ गोव्यात रूजवली. ती फक्त मागास समाजापुरती मर्यादित ठेवली नाही तर, एकूणच गोवा संस्कृतीचे सगळेच समाजघटक दादूंच्या विचारप्रवाहात सामील झाले आणि त्याचा एक मोठा प्रवाह निर्माण झाला. गेल्या वर्षी दादूंचे दुःखद निधन झाले. त्याआधी या विचारचळवळीचे शिलेदार विष्णू सूर्या वाघ गेले. त्यांच्या जाण्याने गोव्यातली आंबेडकरी चळवळ पोरकी झाली असे म्हणता येणार नाही. कारण दादूंनी फुले-शाहू-आंबेडकरी विचार चळवळीचे जे एक रोपटे लावले होते, त्याचा आज महावृक्ष तयार झाला आहे. ध्येयाने पेटून उठलेले असंख्य कार्यकर्ते आज इथं कार्यरत आहेत; दादूंचे स्मरण करीत! अशा कार्यकर्त्यांच्या सहयोगाने भोर (जि. पुणे) येथील फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसारक मंडळाने नुकतेच गोव्यात 'फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसार संमेलन' आयोजित केले होते.

**गोव्याच्या मातीला एक वेगळी ओळख**

गोव्यात संमेलनाला जाण्यापूर्वी एक दिवस आधी कोकणी भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक दामोदर मावजो यांना 'ज्ञानपीठ' पुरस्कार जाहीर झाल्याची

बातमी येऊन धडकली होती. फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेशी नाते सांगणारे, अंधश्रद्धेविरूद्ध बंड करून उठणारे लेखक म्हणून मावजो यांचा लौकीक आहे. या संमेलनात त्यांना निमत्रित करून त्यांचा जाहीर सत्कार करण्याचा मनोदय होता; परंतु अतिशय व्यस्त वेळापत्रक आणि रसिक चाहत्यांची घरी लागलेली रांग यामुळे 'मावजो' यांना शक्य झाले नाही. गोव्याच्या मातीत जन्मलेले विष्णू सूर्या वाघ, दादू मांद्रेकर आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते दामोदर मावजो यांनी आपल्या मातीला राष्ट्रीय स्तरावर एक 'आयडेंटिटी' मिळवून दिली आहे. या तिघांच्या कार्याची महती हा संशोधनाचा आणि स्वतंत्रपणे विचार मांडण्याचा विषय आहे.

**डॉ. कसबेंची उपस्थिती : संमेलनाचं आकर्षण**

९ ते १२ डिसेंबर २०२१ या कालावधीत 'फुले-शाहू-आंबेडकर विचार संमेलन' हे दादू मांद्रेकर आणि विष्णू सूर्या वाघ यांच्या स्मृतींना अर्पण करूनच संपन्न झाले. गोव्याच्या कला अकादमीच्या सभागृहात पार पडलेल्या संमेलनाला एक वेगळीच ऊर्जा होती. डॉ. मेघना भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या संमेलनात खरा आकर्षणाचा भाग होता तो डॉ. रावसाहेब कसबे आणि उत्तम कांबळे यांच्या उपस्थितीचा व त्यांच्या भाषणाचा! डॉ. रावसाहेब कसबे हे संमेलनाचे उद्घाटक होते. महाराष्ट्र, गोवा आणि संपूर्ण देशात व विदेशातही कसबे सरांचा एक चाहता वर्ग आहे. त्यामुळे त्यांच्या नुसत्या उपस्थितीचीही जाणीव अनेकांना सुखद करणारी असते. महाराष्ट्रात आणि देशातही अनेक वैचारिक वादळे उठवणारे व अंगावर घेणारे अत्यंत समृद्ध, महनीय विचारवंत म्हणून डॉ. रावसाहेब कसबे यांचा लौकीक सर्वज्ञात आहे. अशा विचारवंतांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन आणि त्यांचे उद्घाटकीय भाषण हा संमेलनाचा अत्यंत महत्त्वाचा गाभा होता. त्यांची भूमिका, त्यांचे विचार आणि त्या विचारांवर असलेली अढळ श्रद्धा याबाबतीत कसबे सरांनी आजवर कुठेही तडजोड केलेली दिसली नाही, कुठे करतही नाहीत. म्हणूनच आजच्या महाराष्ट्रात रावसाहेबांसारखे इतके विचारांवर ठाम राहणारे विचारवंत मोजकेच आहेत. त्यात सर्वात वरचा नंबर त्यांचा आहे.

**उज्ज्वल गोव्यासाठी होताहेत सर्वंकष प्रयत्न**

कालच्या गोव्याचे चित्र अत्यंत बाजारू होते. या बाजारात सगळ्यांचीच सरमिसळ झालेली होती. पण आज फुले-शाहू-आंबेडकरी विचार चळवळीची एक वेगळी 'आयडेंटीटी' निर्माण झाली आहे. या विचारचळवळीत अनुसूचित जमातीचे अनेक कार्यकर्ते सक्रीय सहभागी झाले आहेत. संविधानाने दिलेले अधिकार आणि फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांची असलेली आवश्यकता त्यांच्या ध्यानात आली आहे. त्यामुळेच 'एसटी'ची चळवळ चालवणारे मधू नाईक, डॉ. उदय गावकरांसारखे कार्यकर्ते या संमेलनात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. डॉ. मनोज कामत यांच्यासारखे एका महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. उदय कुडाळकरांसारखे 'गोवा मेडिकल कॉलेज'चे प्राध्यापक, सुगिरेंसारखे गोवा दूरदर्शनचे संचालक, गोव्यातील आघाडीचे पत्रकार प्रभाकर ढगे आणि इतर पत्रकार, गोवा सरकारच्या कला व सांस्कृतिक संचालनालयातील अधिकारी डॉ. मिलिंद माटे ही नावे प्रातिनिधिक आहेत. अशी असंख्य मंडळी उत्स्फूर्तपणे आता पुढे येऊ लागली आहेत. त्यांना गोव्याचे सांस्कृतिकरण, अर्थकारण, समाजकारण आणि राष्ट्रकारणही बदलायचे आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची या सर्व व्यवस्थेला जोड द्यायची आहे. यासाठी फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने अनेक संस्था, संघटना काम करू लागल्या आहेत. या सर्वांना एकत्र आणण्यासाठी आणि उद्याच्या गोव्याचे आदर्श चित्र उभे करण्यासाठी परेश परमार, गणेश पवार, ॲड. वसुधा सावईकर, डॉ. चांदेलकर हे कार्यकर्ते झपाटल्यासारखे काम करत आहेत. गोव्यातील पहिले बुद्धविहार डॉ. चांदेलकर यांच्या प्रयत्नाने आता उभे राहत आहे. या सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांतूनच उद्याच्या उज्ज्वल गोव्याची ओळख निर्माण होईल. यांच्या प्रयत्नांना आपणा सर्वांची मात्र साथ हवी आहे. ●●●

**(लेखक फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे कार्यकर्तेआहेत)**

### *गोवा-महाराष्ट्राचे एकात्म स्वरूपाचे नाते*

*गोव्याला महाराष्ट्राची सीमा लागूनच आहे. नव्हे गोवा आणि महाराष्ट्राचे एकमेकांमध्ये असे मिसळून गेलेले एकात्म स्वरूपाचे नाते आहे. गोवा मुक्तीसंग्रामात महाराष्ट्राचा त्याग इतिहासाने नोंदवून ठेवलेला आहे. आजच्या गोव्याच्या विकासात पर्यटनाचे जसे मूलभूत योगदान आहे, तसेच ते विचारांच्या पातळीवरूनही अधिक सिद्ध व्हायला हवे, असे मत कसबे सरांनी आपल्या उद्घाटकीय भाषणातून व्यक्त केले. गोव्यात पर्यटन अधिक सुलभतेने व्हावे म्हणून सरकार अधिक दक्ष राहते; परंतु त्यालाच जर फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची ताकद मिळाली, ऊर्जा मिळाली, त्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले तर गोवा समृद्ध राज्य होईल. इतरांवर त्याला अवलंबून राहावे लागणार नाही. नुसते फुले-शाहू-आंबेडकर नाही तर त्याला कबिरांच्याही विचारांची आचारसंहिता जोडावी लागेल. मार्क्सच्या आर्थिक विचारांची पायाभरणी करावी लागेल. फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने संमेलन घेणे ही जशी धारिष्ट्याची बाब आहे, तशीच ती खूप मोठी जबाबदारीचीही आहे. ज्या महापुरूषांच्या नावाने ही संमेलने भरतात, त्यांचा विचार आपणास जगता यायला पाहिजे. कारण या महापुरूषांनीच या देशाचा आणि जगातील मानवतेचाही पाया पक्का केलेला आहे. त्याला कुठेही धक्का लागू नये म्हणून आपण कायम दक्ष राहायला हवे. दादूंच्या निधनानंतर त्यांच्या विचारांनी तयार झालेली कार्यकर्त्यांची फळी आज मोठ्या प्रमाणात उभी राहिली आहे. ती उद्याच्या गोव्याचे नवे शिल्प रेखाटेल, असा आशावाद कसबे सरांनी संमेलनाच्या उद्घाटनपर भाषणात व्यक्त केला.*

# डॉ. आंबेडकरांचे देदीप्यमान विद्यार्थीजीवन आणि शैक्षणिक तत्त्वज्ञान



भीमराव सरवदे

*शिक्षण हे सामाजिक सुधारणेचे प्रमुख साधन असल्याचे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत मुंबईत सिद्धार्थ महाविद्यालय, तर औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. या दोन्ही महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊन लाखो दलित-बहुजन विद्यार्थी मोठमोठ्या हुद्यांपर्यंत तर पोहचलेच; त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीला दिशा देणारी पिढीसुद्धा या महाविद्यालयांमधून निर्माण झाली.*

७ सप्टेंबर १९५३ रोजी संसदेत भाषण करताना टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे पहिले भारतीय संचालक व संसद सदस्य डॉ. जगदीशन मोहनदास कुमारप्पा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणाले होते, की डॉ. आंबेडकर हे कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना आपण त्यांचे सहअध्यायी होतो. डॉ. आंबेडकरांचे देदीप्यमान विद्यार्थीजीवन आपण पाहिलेले आहे. त्यांच्या दीर्घोद्योगांनी आणि बुद्धिमत्तेने त्यांचे शिक्षक व सहअध्यायी दिपून गेले होते. (श्री.चां.भ. खैरमोडे लिखित डॉ. आंबेडकर चरित्र खंड क्र ११, पृ.क्र. ५९)

बाबासाहेबांचा उदारमतवादी शिक्षणावर विश्वास होता. बाबासाहेबांच्या मते, शिक्षण हे जॉन डुईचा उपयुक्ततावाद आणि बुद्धाचा धम्म यांचे मिश्रण होते. बाबासाहेबांना असे वाटत होते, की शिक्षणामुळे आपल्या लोकांचे प्रबोधन होईल आणि उच्च वर्ग आणि अस्पृश्य यांच्यातील दरी कमी होईल. केवळ अस्पृश्यांनाच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजाला आयुष्यभर शिक्षण, वाचन, लेखन, अध्यापन आणि नवा विचार देण्यात बाबासाहेबांचा मोलाचा वाटा होता. शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे माणसाने समाज आणि जीवनशैलीत मोठे सकारात्मक बदल केले आहेत. ही एक ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तिच्या आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे खूप महत्त्वपूर्ण आहे. सर्वार्थाने समाजाच्या प्रगती आणि विकासाच्या सर्व टप्प्यांमध्ये शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे. सामाजिक गुलामी नष्ट करणाऱ्या आणि स्वातंत्र्याचा ध्यास असणाऱ्या धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला होता. बाबासाहेबांच्या सामाजिक आणि नैतिक तत्त्वज्ञानाचा उद्देश बहिष्कृत लोकांना त्यांचे



विचार आणि जुनी जीवनपद्धती बदलण्यासाठी जागरूक करणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून एकता आणि स्वातंत्र्याच्या दिशेने मार्गक्रमण करणे हा होता. सर्व धर्म, प्रदेश, वर्ग आणि जातीतील मुला-मुलींमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि नैतिक चारित्र्य ही मूल्ये रुजवणे हा त्यांच्या शिक्षण तत्त्वज्ञानाचा मूलभूत उद्देश होता.

**मानवतावादी शिक्षणाला प्राधान्य**

बाबासाहेबांना बालपणी आणि तरुणपणी मिळालेले शिक्षण आणि त्यासाठीचा संघर्ष हा अत्यंत वेदनादायी इतिहास आहे. बाबासाहेब केवळ उच्चविद्याविभूषित होऊन थांबले नाहीत, तर त्यांनी समाजही उच्चविद्याविभूषित व्हावा म्हणून विविध स्तरांवर सातत्याने प्रयत्न तर केलेच; परंतु शैक्षणिक संस्था स्थापन करून दलित-पीडितांसाठी शिक्षणाचे दालन खऱ्या अर्थाने खुले केले! बाबासाहेबांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब त्यांच्या व्याख्यानांमध्ये, विविध नियतकालिकांमध्ये प्रकाशित लेखांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांनी केलेल्या कार्यातून दिसून आले आहे. बाबासाहेब म्हणत असत, प्रत्येक शैक्षणिक संस्था ही समाज बदलण्याची यंत्रणा असावी. बाबासाहेबांनी ठामपणे सांगितले होते, की शिक्षण हे समाजासाठी प्राधान्य असले पाहिजे आणि चारित्र्य असलेल्या व्यक्तिंच्या

सर्वांगीण विकासासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे. बाबासाहेबांना अशा प्रकारचे शिक्षण हवे होते, जे केवळ नागरिकांमध्ये मानवी हक्कांची जागरूकता आणि पूर्तताच नव्हे तर भारतात मानवी प्रतिष्ठा आणि न्यायदेखील शिकवू शकेल! त्यांच्या मते, शिक्षण माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे अत्याचारितांना लढा देण्यासाठी आणि त्यांना युगानुयुगे त्यांच्यावर होत असलेला अन्याय आणि शोषण दूर करण्यासाठी प्रोत्साहित करू शकते. शिक्षणाचा अभाव हे गरीब लोकांच्या मागासलेपणाचे मुख्य कारण आहे, याची त्यांना जाण होती. त्यांनी खास करून मानवतावादी शिक्षणाला प्राधान्य दिले, ज्यामुळे माणसातला स्वाभिमान जागा होऊन तो गुलामीचे साखळदंड झुगारून देऊ शकेल. स्वतंत्र भारतातील सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव न करता शैक्षणिक संधी मिळावी यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी भारतीय संविधानातही शिक्षणाचा अधिकार बहाल केला.

**शालेय व महाविद्यालयीन शिक्षण**

बाबासाहेबांचे वडील सुभेदार रामजी हे लष्करी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर मध्य भारतातून कोकणातील दापोली शहरात स्थलांतरित झाले. वयाच्या पाचव्या वर्षी बाबासाहेब व त्यांचे बंधू या दोघांना दापोलीतील एका शाळेत दाखल केले. सुभेदार रामजी यांना दापोलीत जास्त काळ राहता आले नाही. नंतर ते सातारा येथे स्थलांतरित झाले. बाबासाहेब आणि त्यांचे बंधू सातारा येथील शाळेत बसण्यासाठी सोबत एक गोणपाट घेऊन जात असत. वर्गात शिक्षक त्यांच्या वहीला स्पर्श करत नव्हते. काही शिक्षक त्यांना शिकवले तर त्यांना पाप लागेल या भीतीने प्रश्नही विचारत नसत. बाबासाहेबांना शाळेत नळाला हात लावण्याची परवानगी नव्हती. तहान लागली तर शिपायाने नळ चालू करावयाचा व त्यांनी खाली वाकून ओंजळीने पाणी प्यायचे. शिपाई सुट्टीवर असल्यास त्यांना दिवसभर पाण्याविना राहावे लागत असे. अशा भीषण वातावरणात बाबासाहेबांचे अभ्यासात लक्ष लागत नसे. तरीसुद्धा वर्गाबाहेर गोणपाटावर बसून त्यांनी जिद्दीने शिक्षण घेतले. अस्पृश्य असल्याने बाबासाहेबांना संस्कृतचा भाषा विषय म्हणून शिक्षण घेण्याची परवानगी नव्हती. त्यांनी नंतर स्वत:च्या पुढाकाराने आणि अभ्यासकांच्या मदतीने संस्कृत शिकले. शाळेतील अभ्यासाबरोबर लहान वयातच त्यांना ग्रंथ वाचण्याची आवड होती. त्यांचे पाठ्यपुस्तकांपेक्षा अवांतर वाचनही अफाट होते.

बाबासाहेबांनी १९०७ मध्ये एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. प्रसिद्ध समाजसुधारक एस.के.बोले यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बाबासाहेबांची कौतुक सभा झाली. या कार्यक्रमात प्रसिद्ध मराठी लेखक आणि समाजसुधारक कृष्णाजी अर्जुन केळुस्कर गुरुजी यांनी स्वतः लिहिलेले 'गौतम बुद्धाचे चरित्र' बाबासाहेबांना भेट दिले. वडिलांच्या मार्गदर्शनात बाबासाहेबांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या शिक्षणासाठी केळुस्कर गुरुजींच्या मध्यस्थीने बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून बाबासाहेबांना आर्थिक सहकार्य झाले. अस्पृश्यांसाठी तो एक नवीन अनुभव होता. सुरुवातीपासूनच त्यांनी खूप मेहनतीने अभ्यास करण्यास सुरुवात केली होती. त्यांनी इंग्रजी तसेच पर्शियन भाषेचे शिक्षण घेतले आणि बीएची पदवी प्राप्त केली. या काळात त्यांनी राजकारण, विज्ञान, न्यायशास्त्र, तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्राचाही अभ्यास केला.

**परदेशात उच्च शिक्षण**

बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना काही विद्यार्थ्यांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी पाठवायचे होते. बाबासाहेब महाराजांना मुंबईच्या राजवाड्यात भेटल्यानंतर महाराजांनी त्यांना आपल्या सरकारने जाहिरात केलेल्या आर्थिक अनुदानासाठी अर्ज करण्याची सूचना केली. बाबासाहेबांनीही या संधीचा लाभ घ्यायचे ठरवून ४ जून १९१३ रोजी बडोदा सरकारच्या शिक्षण उपमंत्र्यांच्या उपस्थितीत त्यांनी एका करारावर स्वाक्षरी केली, ज्यात म्हटले होते, मी उल्लेख केलेल्या विषयांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर बडोदा सरकारमध्ये दहा वर्षे नोकरी करेन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अमेरिकेतील जीवन अद्वितीय आणि मुक्त होते. तेथे ते विद्यार्थी आणि इतरांशी मुक्तपणे संवाद साधू शकत होते. तेथे प्रत्येकच गोष्टीत समानता होती. विशिष्ट वेळी व डायनिंग टेबलावर भोजन करणे, कोलंबिया विद्यापीठाच्या जीवनातील अनेक चिरस्मरणीय आठवणी, त्यांच्यासाठी ते एक नवीन जग होतं. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाची व्याप्ती अधिक विस्तारली गेली होती. बाबासाहेबांनी दररोज अठरा-अठरा तास अभ्यास केला. दोन वर्षांच्या कठोर मेहनतीनंतर १९१५ मध्ये 'प्राचीन भारतीय वाणिज्य' या विषयावरील शोधप्रबंधासाठी त्यांना एमएची पदवी मिळाली. 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया: अ हिस्टॉरिकल अँड ॲनालिटिकल स्टडी' या शोधप्रबंधासाठी त्यांनी आपले संपूर्ण लक्ष केंद्रित करून कठोर परिश्रम घेतले. जून १९१६ च्या दुसऱ्या आठवड्यात कोलंबिया विद्यापीठाने हा प्रबंध स्वीकारून बाबासाहेब आंबेडकरांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) ही पदवी बहाल केली.

ऑक्टोबर १९१६ मध्ये ते कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले व तेथे ग्रेज इन लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सोबतच अर्थशास्त्र विषयातील डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी प्राप्त करण्यासाठी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर त्यांच्या अर्थशास्त्रातील अभ्यासाने चांगलीच प्रगती केली होती. त्यांनी डीएस्सीसाठीचे संशोधनकार्य सुरू केले. दरम्यान, उच्च शिक्षणासाठी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीचा कालावधी संपत आला होता. बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांना पुढे काही दिवसांसाठी शिष्यवृत्ती चालू ठेवण्याची बाबासाहेबांनी विनंती केली; परंतु ही विनंती बडोदा संस्थानाकडून फेटाळण्यात आली व बडोदा संस्थानच्या महाराजांनी बाबासाहेबांना भारतात परत येण्यास सांगितले. बाबासाहेब असहाय्य झाल्यामुळे भारतात परतण्याशिवाय त्यांच्यापुढे दुसरा मार्ग उरला नव्हता. असे असले तरी ते दृढ निश्चयी होते. त्यांनी पैशाची व्यवस्था करून लंडनला परत येण्याचा आणि कसल्याही परिस्थितीत अभ्यास पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. चार वर्षांत अभ्यास पुन्हा सुरू करण्याची परवानगी त्यांना लंडन विद्यापीठाकडून मिळाली. त्यानंतर जुलै १९२० मध्ये आपला कायदा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते लंडनला परत गेले.

**ज्ञानाच्या भुकेपुढे पोटाच्या भुकेचा विसर!**

अभ्यासाच्या काळात बाबासाहेबांना वेळही सोन्याहूनही अधिक

मौल्यवान वाटत असे. वेळ आणि पैसा वाचवण्यासाठी ते दुपारचे जेवण टाळत असत. त्यावेळी ते एक महिला चालवित असलेल्या हॉटेलमध्ये राहत होते. हे हॉटेल अर्धवेळ रेस्टॉरंट म्हणूनही चालवले जात होते. ती हॉटेल चालवणारी महिला अत्यंत कठोर आणि भयंकर रागीट स्वभावाची होती. तिथे राहणाऱ्यांना जॅमसह ब्रेडचा एक तुकडा, माशाचा एक छोटासा तुकडा आणि चहाचा एक ग्लास हा नाश्ता ती देत असे. बाबासाहेब सकाळी हा अल्पोपहार घेऊन संग्रहालयाच्या ग्रंथालयात जात असत. बाबासाहेब ग्रंथालयात सर्वात अगोदर प्रवेश करत असत. ते या ग्रंथालयात तासन्तास थांबून विश्रांती न घेता रोज अभ्यास करत असत. संध्याकाळी ग्रंथालयातून सर्वात शेवटी ते बाहेर पडत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संशोधनकार्य केवळ संग्रहालयाच्या ग्रंथालयापुरते मर्यादित नव्हते. इंडियन ऑफिस लायब्ररी, लंडन विद्यापीठाचे ग्रंथालय आणि त्यांच्या अर्थशास्त्रीय साहित्यासाठी प्रसिद्ध असलेल्या लंडनमधील इतर ग्रंथालयांमध्ये त्यांनी अनेक खंड आणि जुने अहवाल वाचून काढले. या आधाराने त्यांनी आपल्या संशोधनासाठी विपुल लेखन केले.

'साम्राज्याच्या निधीचे ब्रिटिश भारतातील प्रांतांमध्ये वाटप' या विषयावर शोधनिबंध लिहिणारे संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यामध्ये ते पहिलेच विद्यार्थी होते. त्यासाठी जून १९२१ मध्ये त्यांना एम.एस्सी. (मास्टर ऑफ सायन्स) पदवी प्रदान करण्यात आली. ऑक्टोबर १९२२ मध्ये त्यांनी 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' नावाचा प्रबंध पूर्ण करून लंडन विद्यापीठाला सादर केला व भारतात परत आले. मे १९२३ मध्ये बाबासाहेबांच्या या प्रबंधातील काही शब्द ब्रिटिश साम्राज्यवादी निवड समितीतील सदस्यांनी आक्षेपार्ह मानले होते. त्यामुळे बाबासाहेबांना ताबडतोब लंडनला केवळ काही शब्दांचे पुनर्लेखन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. बाबासाहेबांच्या लेखनामुळे लंडनच्या उच्च शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली होती. अशी पहिलीच वेळ होती. काही दिवसांपूर्वी त्यांनी स्टुडंट्स युनियनमध्ये 'भारतातील जबाबदार सरकारच्या जबाबदाऱ्या' नावाचा लेख वाचला होता. यामुळेही अभ्यासकांमध्ये मोठी खळबळ उडाली होती. त्यामुळे आंबेडकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांपैकी एक आहेत की काय, असे बोलले जात होते. हेरॉल्ड जे. लास्की यांच्यासारख्या इंग्लंडमधील प्राध्यापकांनीसुद्धा असेच मत व्यक्त केले होते. नंतर लंडनच्या निवड समितीने तो प्रबंध स्वीकारून डीएस्सी (डॉक्टर ऑफ सायन्स) पदवी प्रदान केली. ही पदवी मिळाल्यावर त्यांना खूप आनंद झाला. खूप कष्ट, अढळ मानसिकता आणि आत्ममग्न बुद्धीचा परिपाक म्हणून बाबासाहेबांना हे मोठे यश प्राप्त झाले होते.

### अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्य

बाबासाहेबांना वाटत होते, की आपले तर शिक्षण झाले, पण आपल्या समाजाचे काय? आपल्या समाजातील लोकांनाही शिक्षण देऊन प्रगत केले पाहिजे, त्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. यासाठी २० जुलै १९२४ रोजी त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. मुलामुलींसाठी दोन वसतिगृह बांधण्याचे या सभेने ठरविले. सोलापूरमधील हायस्कूलच्या दलित विद्यार्थ्यांसाठी या संस्थेने वसतिगृह बांधले. बाबासाहेबांनी नंतर १४ जून १९२८ रोजी डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे ध्येय या वर्गातील लोकांना उत्तम शालेय शिक्षण देऊन त्यांना सक्षम करणे हे होते. या संस्थेच्या माध्यमातूनही या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतिगृहं निर्माण करण्यात आले होते.

## सिद्धार्थ महाविद्यालयास सुरुवात

*आधुनिक वैज्ञानिक उपकरणे आणि उच्चविद्याविभूषित शिक्षकांसह एक उत्कृष्ट शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे बाबासाहेबांचे दीर्घकाळापासूनचे स्वप्न होते. अस्पृश्य जातींतील मुलांना उच्च शिक्षण देण्याचा त्यांचा हेतू होता. त्यासाठी त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून २० जून १९४६ रोजी सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले. त्यांनी औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. या दोन्ही महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊन लाखो दलित-बहुजन विद्यार्थी मोठमोठ्या हुद्यांपर्यंत तर पोहचलेच; त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीला दिशा देणारी पिढीसुद्धा या महाविद्यालयांमधून निर्माण झाली.*

### बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार

माणगाव येथे २१ व २२ मार्च १९२० रोजी आयोजित दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाच्या परिषदेच्या समारोपप्रसंगी काही ठराव पारित करण्यात आले होते. त्यामध्ये प्राथमिक शिक्षण मुलामुलींचा भेद न करता जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे व मोफत करण्यात यावे, बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार होणे अत्यंत जरुरीचे आहे त्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. म्हणून त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यास शाळा मास्तर, डेप्युटी असिस्टंट, डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर त्यांचे हितेच्छू असले पाहिजेत आदी ठरावांचा समावेश होता. ज्याअर्थी इतर वर्गातील माणसे बहिष्कृत वर्गाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात, किंबहुना अनुदारपणाही दाखवितात, त्याअर्थी वरील अधिकाऱ्यांत बहिष्कृत वर्गातील माणसे असावीत असे या परिषदेचे मत आहे, असेही ठरावात म्हटले होते. महाबळेश्वर येथे ६ मे १९२९ रोजी आयोजित सभेत बोलताना बाबासाहेब म्हणाले होते, प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. बाबासाहेबांच्या मते, प्राथमिक शिक्षणाचा उद्देश असा आहे, की प्राथमिक शाळेत प्रवेश करणारे प्रत्येक मूल केवळ अशा टप्प्यावर सोडते, जेव्हा ते साक्षर होऊन त्याला आयुष्यभरासाठी साक्षरतेची शिदोरी प्राप्त होते. बाबासाहेबांनी ज्ञानाचे दोन उद्देश सांगितले आहेत: पहिले, इतरांच्या भल्यासाठी ते मिळवणे आणि दुसरे म्हणजे, त्याचा स्वत: च्या उन्नतीसाठी उपयोग करणे. निव्वळ कारकुन निर्माण करण्याचे उद्दिष्ट असलेल्या ब्रिटिश शैक्षणिक धोरणातील व्यावसायिक शिक्षणाविरुद्ध त्यांनी परखड भूमिका घेतली होती.

•••

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

व्यक्तिविशेष

# विचारवंत अन् शिक्षणतज्ज्ञ : डॉ. जनार्दन वाघमारे



*माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचं कार्य केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरतच मर्यादित नाही, तर प्राचार्य असतानाच्या काळात आणि लातूरचे नगराध्यक्ष म्हणून त्यांनी सामाजिक कार्यातही मोठे योगदान दिले आहे. ७० च्या दशकामध्ये नामांतर लढ्यानंतर समाजात विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी धमक्यांना भीक न घालता त्यांनी लातुरात विषमता निर्मुलन शिबिर घेतले. ते सामाजिक समतेचा दूत असल्याचेच दाखवून देणारे हे मोठे उदाहरण आहे.*

प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आदरानं घेतलं जाणारं नाव म्हणजे प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे. जनार्दन वाघमारे हे नाव माहीत नाही अशी एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. कारण महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी दिलेलं योगदान अत्यंत मोलाचं आहे. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू, लातूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष एवढीच त्यांची ओळख नाही, तर इंग्रजी साहित्याचे अभ्यासक, निग्रो साहित्याचे भाष्यकार आणि दलित पुरोगामी साहित्य चळवळीचे ते अभ्यासक आहेत.

## 'लातूर पॅटर्न' निर्माण करण्यात सहभाग

लातूर जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील कौठा गावी एका सधन कुटुंबात ११ नोव्हेंबर १९३४ रोजी जनार्दन माधवराव वाघमारे यांचा जन्म झाला. हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठ, तत्कालीन पुणे विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अशा तीन ठिकाणी त्यांचं एम.ए.,एलएल.एम, पीएच.डी. पर्यंतच शिक्षण झालं. इंग्रजी हा त्यांच्या आवडीचा म्हणून अभ्यासाचाही विषय. उमरग्याच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापक म्हणून कारकीर्दीस प्रारंभ केला. तिथं तीन वर्षे सेवा बजावल्यानंतर औरंगाबादमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, देवगिरी महाविद्यालय आणि लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचं कार्य केलं. १९७० ते १९९४ अशी चोवीस वर्षे ते राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य होते. नांदेडला नव्याने स्थापन झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ते पहिले कुलगुरू बनले. विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेऊन त्यांनी विद्यापीठाच्या विकासासाठी प्रयत्न केले. व्यावसायिक व जीवनाभिमुख शिक्षणाची समाजाची गरज लक्षात घेऊन त्यांनी विविध अपारंपारिक अभ्यासक्रम सुरू केले. आज या विद्यापीठाची जी भरभराट दिसते आहे, त्याचे सर्व श्रेय संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांनाच जाते. कुलगुरु म्हणून शैक्षणिक क्षेत्रात 'लातूर पॅटर्न' निर्माण करण्यात त्यांची मोलाची भूमिका राहिली आहे. राज्यसभा सदस्य म्हणून काम करताना त्यांनी आपल्या भागातील अनेक प्रश्न संसदेत मांडून ते धसास लावण्याचे प्रयत्न केले.

प्रचंड वाचन, सखोल चिंतन आणि सूक्ष्म निरीक्षणातून व्यक्त झालेले त्यांचे आशयगर्भ लिखाण, साहित्य आणि समाजचिंतन परिवर्तनवादी चळवळींना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. डॉ. वाघमारे हे एक उत्तम वक्तेही आहेत. देशाच्या विविध भागात, विशेष करून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक विषयांवर त्यांनी व्याख्याने दिली आहेत. त्यांनी साहित्यात घेतलेली जीवनवादी भूमिका व सामाजिक चिंतनात घेतलेली फुले-आंबेडकरवादी पुरोगामी वैचारिक भूमिका महाराष्ट्रातील प्रबोधनकार्याला उपयुक्त ठरलेली आहे.

## नगराध्यक्ष म्हणून भरीव कार्य

महाराष्ट्रात पुरोगामी विचारवंतांची जी फळी आहे, तीत प्राचार्य जनार्दन वाघमारे अग्रस्थानी आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजातील सर्वच घटकांमध्ये त्यांची लोकप्रियता तितकीच आहे. त्यामुळेच तर शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा दबदबा कायम ठेऊन असलेल्या या शिक्षणमहर्षीची लातूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. नगराध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांनी गरिबांच्या वस्त्यांमध्ये फिरता दवाखाना, पाणीपुरवठा जलपुनर्भरण योजना, एक खिडकी योजना, नाना-नानी पार्क, लातूर व्हिजन-२०२५ हा यथार्थदर्शी विकास आराखडा अशा अनेक योजना राबवल्या.

## नामांतर लढ्यात योगदान

विद्यापीठ नामांतर लढ्यात त्यांनी दिलेलं योगदानही मोलाचं आहे. औरंगाबादच्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ज्ञानमहर्षीचं नाव

देणं ही मराठवाड्यासाठी गौरवास्पद बाब असल्याचं त्यांचं मतच त्यांना नामांतराच्या लढ्यात ओढण्यास कारणीभूत ठरलं. नामांतराला समतेचा लढा मानून या लढ्यासाठी कार्यकर्त्यांची फौज उभी करून अनुकूल वातावरण निर्माण करण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली. प्राचार्य ना.य. डोळे, प्राचार्य भगवानराव सबनीस, प्राचार्य राजाराम राठोड, प्राचार्य गजमल माळी यांच्यासह प्राचार्य जनार्दन वाघमारे यांनी या लढ्याला मोठं बळ देण्याचं काम केलं. या मंडळींसह इतरही अनेक प्राध्यापक, कार्यकर्ते डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येत आणि वेळोवेळी बैठका घेऊन नामांतरासाठी लोकांचे मन वळविण्याचे प्रयत्न करत.

**विषमता निर्मुलन शिबिरासाठी पुढाकार**

'एक गाव-एक पाणवठा' या अभियानाचे प्रणेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली डॉ. जनार्दन वाघमारे यांनी ४२ वर्षांपूर्वी लातूर येथे तिसरे विषमता निर्मुलन शिबिर घेतले. मराठवाड्यात नामांतर लढ्याच्या निमित्ताने झालेल्या भयानक आणि अमानुष हिंसाचाराने दलित दलितेतरांमध्ये अविश्वास आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दलित-दलितेतरांतील संवाद पूर्णपणे खंडित झाला होता. हा संवाद पुन्हा सुरू व्हावा आणि समाज परिवर्तनाशी संबंधित अशा मूलगामी प्रश्नांची चर्चा करून समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेला पुन्हा चालना द्यावी, या हेतूने त्यांनी हे शिबिर पूर्वनियोजित नागपूरऐवजी लातूरला घेतले. हे शिबिर होऊ नये म्हणून अनेकांनी अडथळे आणण्याचे प्रयत्न केले. त्याचबरोबर वाघमारे यांना अप्रत्यक्षपणे त्रासही दिला. पण आपल्या निर्णयापासून न ढळता वाघमारे यांनी विषमता निर्मुलन शिबिर यशस्वी करून दाखवले. या शिबिरात महाराष्ट्रातील तीनशेवर प्रतिनिधींनी भाग घेतला होता. प्राचार्य म.भि. चिटणीस, भाई उद्धवराव पाटील, बापूसाहेब काळदाते अशा मान्यवर मंडळींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

१९८२ मध्ये 'इंटरनॅशनल एक्सचेंज अँड स्कॉलर्स वॉशिंग्टन' आणि 'युनायटेड स्टेटस् फाऊंडेशन इन इंडिया', न्यू दिल्ली या दोन संस्थांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या अमेरिका आणि इंग्लंडच्या शैक्षणिक प्रश्नांच्या अभ्यासाच्या फुलब्राईट प्रकल्पात त्यांची निवड झाली होती. या प्रकल्पासाठी निवडलेल्या पाच भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या गटाचा नेता म्हणून त्यांची निवड झाली. प्रामुख्याने अमेरिकेतील कम्युनिटी कॉलेजांचा आणि इंग्लंडमधील तंत्रनिकेतनांचा विशेष अभ्यास त्यांनी केला. अमेरिका व इंग्लंडमधील विविध विद्यापीठे, महाविद्यालयातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांवर व्याख्याने दिली. काही ठिकाणी शैक्षणिक परिषदा व परिसंवादांमध्ये विचार मांडले. ऑगस्ट १९९८ मध्ये कॅनडाची राजधानी ओटावा येथे झालेल्या कॉमनवेल्थ राष्ट्रातील विद्यापीठ परिषदेमध्ये (युनिव्हर्सिटीज कॉन्फरन्स) त्यांनी सहभाग घेतला.

**विपुल साहित्य संपदा**

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये विपुल लेखन केले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील आपल्या समृद्ध अनुभवातून तसेच शिक्षण, साहित्य, राजकारण या विषयांचा गाढा अभ्यास यातून जनसामान्यांपासून बुद्धिवादी लोकांपर्यंत विचार पोहोचविण्यासाठी त्यांनी लेखन आणि ग्रंथनिर्मिती केली. त्यामध्ये वैचारिक, प्रवासवर्णन, आत्मचरित्रात्मक, व्यक्तिचित्रण आणि अनुवादित ग्रंथांचा समावेश आहे.

**वैचारिक** : 'अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती' (१९७८) हा अमेरिकन निग्रोंचे विवेचन करणारा पहिला ग्रंथ. 'आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव' (१९९३), 'चिंतन एका कुलगुरूचे' (१९९९), 'चिंतनयात्रा' (२००४), 'दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी' (२०१३), 'परिवर्तन : संकल्पना, वेध आणि वास्तव' (१९९९), 'प्राथमिक शिक्षण : यशापयश आणि भवितव्य' (१९८२), 'बदलते शिक्षण : स्वरूप आणि समस्या' (२००९), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातिअंताचा लढा' (१९९०), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारक शैक्षणिक विचार आणि कार्य' (२०१५), 'महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण' (१९८०), 'माझे मूळ : माझे कूळ' (२०१५), 'लोकशाही आणि शिक्षण' (२०१२), 'विमर्श' (२०१५), 'विचारमुद्रा' (२०११), 'शरद पवार : व्यक्तित्व, कर्तृत्व आणि नेतृत्व' (२०१६), 'शिक्षण : समाज परिवर्तन व राष्ट्रीय विकास' (१९८४), 'संपादन : कर्तृत्वाचा सह्याद्री' (२०१३), 'साहित्यचिंतन' (१९९६), 'स्वातंत्र्य : एक चिंतन' (२०१६), 'हाक आणि आक्रोश' (१९८४),

**प्रवासवर्णन** : 'ज्ञान-विज्ञानाच्या देशात' (२००५)

**कादंबरी** : 'बखर एका खेड्याची' (२००५)

**आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या** : 'चिंतन एका नगराध्यक्षाचे' (२००६), 'मूठभर माती' (२००६),

**व्यक्तिचित्रणे** : 'जीवनरेखा' (२००८), मला माहीत असलेले शरद पवार (संपादित, नऊ सहलेखक), 'व्यक्तित्व आणि कर्तृत्व' (२०१५), 'व्यक्तिवलये' (२००५), 'स्वामी दयानंद सरस्वती : विचार, कार्य व कर्तृत्व' (२०१०),

**ललित लेखसंग्रह** : 'मातीवरच्या ओळी' (२०१०) इत्यादी लेख संग्रह प्रसिद्ध आहेत.

## सामाजिक कार्यात अग्रेसर

***डॉ. जनार्दन वाघमारे यांचं काम केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरतं मर्यादित नाही. त्यांनी कुष्ठरोगी, अंध, अपंगांसाठी लातूर येथे सेवा दिली. जातीनिर्मुलन, राष्ट्रीय प्रौढशिक्षण, हमाल पंचायतीची स्थापना व कार्य यात त्यांनी सहभाग घेतला. किल्लारीतील १९९३ च्या भूकंपानंतर या आपत्तीला तोंड देण्यासाठी सुसज्ज यंत्रणा असावी म्हणून त्यांनी किल्लारी येथे भूकंपशास्त्र अभ्यास केंद्र स्थापन केले. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसन कार्याबरोबरच स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या लातूर येथील भूकंपग्रस्त ग्रामपुनर्रचना प्रकल्पाचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी केली. भूकंपग्रस्त भागात चलबुर्गा (ता. औसा) येथे जातीप्रथांना मूठमाती देणाऱ्या ८० घरांच्या 'राष्ट्रीय सेवाग्राम' या अभिनव गावाची राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून त्यांनी २००१ मध्ये निर्मिती केली.***

सात शतकांचा विविधांगी पट असलेली कादंबरी :


# सातपाटील कुलवृत्तांत

रंगनाथ पठारे हे लेखक म्हणून मराठी साहित्यविश्वात जसे परिचित आहेत, तसे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी त्यांनी जी मेहनत घेतली, जे संशोधन केले आणि अहवाल सादर केला, त्यामुळे समग्र मराठी माणसाला (जगात कुठेही असला तरी) त्यांचा अभिमान आहे. त्या अभिमानात अजून एक महत्त्वाची भर पडली, ती म्हणजे सातपाटील कुलवृत्तांत ही कादंबरी.

साहित्यलेखन असो की मानवी उत्क्रांतीचे टप्पे, त्यामध्ये चढती कमान असली पाहिजे. आपण यापूर्वी केलेल्या लेखनापेक्षा दोन इंच पुढे जाता आले पाहिजे, हे फारच कमी लोकांना जमतं. सतत लिहीत राहिलं म्हणजे साहित्याचा दर्जा वाढत जाणार, असं नाही. त्यामुळे बऱ्याच साहित्यिकांचे एखाद-दुसरे पुस्तकच लक्षात राहते. यास अपवाद पठारे सर आहेत. त्यांच्या दिवे गेलेले दिवस या पहिल्या कादंबरीपासून ते सातपाटील कुलवृत्तांत या चौदाव्या कादंबरीपर्यंतचा लेखनाचा प्रवास चढताच राहिला आहे. ही कादंबरी तर कळसच म्हटली पाहिजे. आता प्रश्न असा पडतो, की सर यापुढे काय लिहिणार? अर्थात, हे सर्व लेखन आत्मचरित्रपर नाही. आत्मचरित्रात्मक कादंबरी लेखनप्रकार तेथे बसत नाही. (आत्मचरित्रात्मक कादंबरी हा प्रकारच मला मजेशीर वाटतो. कारण काहींचा अपवाद वगळता बहुतांश कादंबऱ्या याच प्रकारात येतात) त्यांच्या कादंबरीत आलेले पात्र प्रातिनिधिक स्वरूपात असतात. वाचणाऱ्यांची फसगत होऊन ते पात्र व्यवहारात शोधतात. असा शोध घेणे किंवा एखाद्या व्यक्तीला, माझं वर्णन वाईट का केलं? (याचा संदर्भ याच कादंबरीत एके ठिकाणी येतो) म्हणून धमकावणं किंवा कादंबरीत वर्णन केलेली फोटोकॉपी पाहण्याची इच्छा होऊन (माझ्यासहित) ती मागणी करणं हे त्यांच्या लेखनाचं बलस्थान आहे. सध्याचं जग कोरोना व्हायरसमुळे भयभीत आहे. त्यावरचे वैज्ञानिक सत्यही ही कादंबरी सहज सांगून जाते. याचा अर्थ, या कादंबरीत राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, इतिहास, भूगोल, प्राणी-पक्षी, नदी, विद्यापीठ, विदेश, युद्ध, पलायन, खून, मारामाऱ्या, जंगल, पशू, वंश, देवक, गोत्र, भाषेचे मूळ, संशोधन, जातीच्या अहंपणातील फोलपणा, पोलीस, कामगार, व्यापार, गुलाम, सरंजामदार, राजे, सात-आठ शतकांचा कालावकाश अशा विविध अंगांना ही कादंबरी सामावून घेते. कादंबरीचा प्रारंभ १२८९ मध्ये, तर शेवट २०१९ मध्ये होतो. म्हणजे सातशे वीस वर्षांचा विविधांगी पट ही कादंबरी आवश्यक तपशीलांसह वाचकांसमोर उलगडून दाखवते.

**वेगळी कादंबरी**

ही कादंबरी वाचताना जगातील (भारतासह) अनेक भाषांमध्ये प्रकाशित झालेल्या काही ठळक महत्त्वाच्या कादंबऱ्या वाचकांसमोर नकळतपणे उभ्या राहतात. खरे पाहता, कोणत्याही कलाकृतीची तु-लना करणे योग्य नसते. कारण प्रत्येक कलाकृती ही नवनिर्मिती असते.



ग्रंथपरिचय

तरी कालपटाच्या अंगाने व महाकादंबरी या विशेषणाने तुलना करता, जगप्रसिद्ध रशियन लेखक लिओ टॉलस्टॉय यांचे वार अँड पीस, अमेरिकन कादंबरीकार ॲलेक्स हॅली यांचे रूट्स, श्री.ना. पेंडसे यांचे तुंबाडचे खोत आणि भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी हिंदू अशा काही कलाकृतींसोबत तुलना करण्याचा मोह होतो. (प्रस्तुत लेखकांच्या मते वाचकांना तो अधिकार आहे..) पण ही



प्रा. डॉ. शंकर विभुते

कादंबरी या सर्व कादंबऱ्यांपेक्षा वेगळी ठरते. त्यामुळे प्रकाशकाने कादंबरीची तोंडओळख संक्षिप्त स्वरूपात करून दिली आहे. लेखक मराठा जातीत जन्माला आलेले असून मराठा शब्द-ला व्यापक अर्थ लावण्याचा व आपली कुलपरंपरा शोधण्याचा त्यांचा प्रयत्न, वाचक म्हणून मला चुकीचे आकलन वाटते. कारण संपूर्ण कादंबरी बारकाईने वाचल्यास मराठा परंपरा शोधण्यापेक्षा मराठी माणसाचा शोध घेणे आणि मुळात मानव भटकी जमात असल्याचा निष्कर्ष काढणे या व्यापक अर्थापाशी येऊन ही कादंबरी थांबते. खरे पाहता, जसे आपण कवितेचे आकलन आपल्या पद्धतीने करून अर्थ सांगतो, तसा एकच अर्थ त्याचा नसतो. तोच निकष कादंबरी प्रकारालाही लागू पडतो. वाचकांशी संवाद साधताना लेखक म्हणून लेखकाने तोंडओळखीकरिता काही बाबी सांगितल्या असतील. त्या बाबी सोडल्या तर कादंबरीचे आकलन लेखकही पूर्णपणे करू शकत नाही, एवढी ताकद नवनिर्मितीच्या कलाकृतीत दडलेली असते. प्रत्येकाला हवा तसा अर्थ काढण्याची व घेण्याची व्यापक क्षमता ही कादंबरी देऊन जाते.

**कादंबरीतील पात्रं शूर आणि भित्रीही**

सामान्य मराठी माणसाचा इतिहास लिहिण्यासाठी जी साधने लेखकाला उपलब्ध झाली त्यानुसार १२८९ पासून म्हणजे अल्लाउद्दीन खिलजी याने पैठणवर केलेल्या स्वारीपासून ते मानववंशशास्त्रज्ञ रिचर्ड रेसिंग याच्या मृत्यूपर्यंतचा काळ या कादंबरीच्या आशयात व्यापलेला आहे. या कालपटावर लेखकाने काही पात्रं उभी केलेली आहेत. ही पात्रं

सामान्य मराठी माणसाचे प्रतिनिधित्व करतात. ही जशी शूरवीर आहेत तशी भित्रीही आहेत, जशी प्रामाणिक आहेत तशी लबाडही आहेत. वेळ येईल तशी तडजोड करणारी जशी आहेत, तशी जीव गेला तरी तडजोड न करणारीही आहेत. हुशार आहेत, मेहनती आहेत, बेरकी आहेत, आळशी आहेत, पळपुटे आहेत, कळकुटी आहेत, लोभी आहेत, चोर आहेत, लुटारू आहेत, धाडसी आहेत, दयाळू आहेत, नियतीने वागणारे आहेत, मतलबी आहेत, आस्तिक आहेत, नास्तिक आहेत... थोडक्यात, मानवी स्वभावाचे सहज अंतरंग उठून दिसणारे विविध गुण त्यांच्यात आहेत. ती हिंदी चित्रपटाच्या नायकासारखी सर्वगुणसंपन्न नाहीत, पण यातील नायक जगातील तरुणांचा आवडता असलेला. अवेंजर्स चित्रपटातील नायकांसारखे या कादंबरीतील पात्रं तितकीच महत्त्वाची आहेत. असे म्हटले जाते, की या चित्रपटात हॉलिवूडमधील सर्वश्रेष्ठ जवळपास ४० पेक्षा अधिक नायकांनी काम केलेले आहे. यातील प्रत्येक नायकाचे स्वतंत्र हिट झालेले चित्रपट आहेत, पण या चित्रपटात त्यांच्या वाट्याला जेवढं काम मिळालं किंवा संधी (दिग्दर्शकाने दिलेली) मिळाली, तेवढ्यात त्यांनी त्याचं सोनं केलं आहे. तसे या कादंबरीत प्रमुख नायक म्हणून जी पात्रं आलेली आहेत, उदा. श्रीपती, साहेबराव, दशरथ, जानराव, रखमाजी, पिराजी, विठ्ठल, शंभूराव, देवनाथ (ही पुरुष पात्रे) रोहिणी, गीता, आर्यन, आफिया, तुळसा, समिंदरा, उल्फा, देऊबाई, चिमाबाई (स्त्री पात्रे..) घोडा, गाय, किल्ले, रणांगण, विठोबा मूर्ती (ही अमानवी पात्रे..) ही सगळी पात्रं एकेका कादंबरीचा मुख्य नायक होण्याचे सामर्थ्य बाळगून आहेत. पण कालपटात त्यांना मिळालेले स्थान किंवा संधी (लेखकाने त्यांच्या वाट्याला दिलेली..) वाचकांच्या मनात घर करून जाते. या कादंबरीत वरील पुरुष पात्रानुसार भाग केलेले आपणास दिसून येते. ७९४ पानांत उभी केलेली ही कादंबरी आणि पात्रं संख्याशास्त्रीय किंवा गणितानुसार त्यांना पेजेस (समान) मिळाली नाहीत, पण कालावकाश व लेखकाने दिलेल्या संधीनुसार (उपलब्ध साधने व त्या पात्राचा कल्पनाविस्तार) ही पेजेस आहेत. पहिला श्रीपती जो नायक आहे तो वगळता (तसे तो पठारे वंशातील आहे, पण सलग रक्तनाते नाही) साहेबरावपासून ते देवनाथपर्यंत पणजोबा, आजोबा, वडील, भाऊ असे नातेसंबंध या पात्रात आहेत. यातील पहिला भाग म्हणजे श्रीपतीचा. जो मूळकूळ पठारे वंशज आहे. तो मेंढपाळ आहे, प्रामाणिक आहे, कष्टी आहे, दयाळू आहे. त्याच्या गुणांमुळे तो मानकरी दरबारात केशवराज एडकेचा विश्वासू रक्षक बनतो. शेवटी तर तो मानकऱ्याची पत्नी रोहिणीसोबत (ब्राह्मण) वांबोरी गावात जाऊन स्वतःचे वजन निर्माण करतो. याचा काळ हा अल्लाउद्दीन खिलजी याच्या आक्रमणाचा काळ आहे. तो स्वतः अल्लाउद्दीनच्या बाजूने लुटण्यासाठी सामील झाला होता. तेव्हा पैठण नगरीत रामदेव यादव यांचे राज्य होते. ती राज्यव्यवस्था कशी होती, याचे संक्षिप्त पण मार्मिक वर्णन या कादंबरीत येते. देवांनी जगावं तशा वैभवात जगणारी ती तुपट अंगाची माणसं फारच फुसकी होती. इतक्या उत्तम स्थितीत राहणारी ती माणसं अगदीच भेकड होती. त्यांना शस्त्रे चालवता येत नव्हती. (पृ.२३) यावरून या राज्याचा पराभव का झाला, याची प्रचिती येते.

साहेबराव ऊर्फ सायबू पठारे हा या कादंबरीतील दुसरा महत्त्वाचा नायक. श्रीपतीच्या वंशातला. त्याच गावातला. अर्थात, याच्या काळातही वांबोरी गावात पाटीलकी आहे, एडके (ब्राह्मण) या घराण्याकडे. हा काळ म्हणजे निजामशाही, आदिलशाही (अंदाजे सन १४९०) यांच्या वर्चस्वाचा काळ. निजामशाहीतील काही पठाण फार शोषक होते. त्यांनी वांबोरी गावातील एडके पाटलाच्या मुलीला पळवून नेले होते. ही वार्ता गावाला भयभीत करणारी होती. पण या पठाणांच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत कुणामध्येही नव्हती. तेव्हा या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी गावातील सात धाडसी तरुण एकत्र आले. शुकरे, शितोळे, चौथे, राहणे, पठारे (साहेबराव), एडके, तिडके.. ही सात तरुण मंडळी पठाणांचा बंदोबस्त करण्यासाठी शस्त्र घेऊन जंगलात लपून बसली. नियोजन करून त्या तीन-चार क्रूर पठाणांना एकटे गाठून मारून टाकले. काळाची पावले ओळखून सुलतानांनी यांना माफ केलं. यांच्या पराक्रमाबद्दल खुश होऊन एडके पाटलांनी गावबैठक घेऊन बक्षीस जाहीर केले. ते म्हणाले, आज माझ्या मुलासकट या सात पोरांनी जी हिंमत माझ्या लेकीसाठी दाखवली, तिला तोड नाही. त्याची आठवण म्हणून इतःपर इथली पाटीलकी आळीपाळीने या सात घराण्यात दिली जाईल, असे मी जाहीर करतो (पृ. १७२). ही घटना संपूर्ण कादंबरीत सातपाटील या नावाने प्रसिद्ध होते. या सातपाटलातील एक साहेबराव पठारे सातपाटील नामक तरुण मोर्हम खान पठाण (साहेबरावांनीच म्हणून टाकले होते) याची पत्नी आर्यनसोबत (पुढे आरेनाबाई नावाने प्रसिद्ध) पळून जाते. पुण्याजवळ खराडी येथे तो इम्रान खान आणि शिवरामबुवा यांच्या मदतीने गाव वसवतो. त्यांना मूलबाळ होत नाही, पण बहरामखान पठाणचा मुलगा यांचा वारस म्हणून पुढील सातपाटीलचा कुळपुरूष ठरतो.

### निवेदनशैलीत कादंबरीचे बलस्थान

कादंबरीचे बलस्थान कादंबरीच्या निवेदनशैलीत आहे. कादंबरी वाचताना एका वेळी लेखक आपली जीवनकहाणी सांगत आहे असा भास होतो, तर दुसऱ्या वेळी कादंबरीतील मुख्य नायक देवनाथ आपणास कथा सांगतो आहे असे वाटते. सातपाटील कुलवृत्तांत ही कादंबरी अनेक अर्थांनी दर्जेदार आहे. मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या (कदाचित भारतीय भाषांमध्येसुद्धा) आजपर्यंतच्या कोणत्याही कादंबरीत न आलेला एवढा मोठा प्रदीर्घ काळ या कादंबरीत येतो. ही कादंबरी कोणत्याही प्रवाहात (ग्रामीण, महानगरीय, स्त्रीवादी..) बसत नाही. अनेक विषयांना स्पर्श करण्याचे सामर्थ्य या कादंबरीत आहे. कादंबरीच्या शेवटी शेवटी तर फक्त मराठी माणसाचा विचार निवेदक करीत नाही, तर विश्वातील अख्ख्या सजीवसृष्टीच्या अस्तित्वाची तो चिंता करतो. वंश, गोत्र, जात, धर्म, पंथ, राज्य, राष्ट्र, विश्व या सगळ्यांच्या पलीकडे हे चिंतन जाते. या कादंबरीने मराठी कादंबरीला जगातील गाजलेल्या व मान्यताप्राप्त झालेल्या कादंबऱ्यांच्या रेषेत नेऊन उभे केले आहे, एवढे मात्र निश्चित. ●●●

**(लेखक साहित्यिक आहेत)**

पुस्तक : **सातपाटील कुलवृत्तांत**

लेखक : **रंगनाथ पठारे**

पाने : ७९४

किंमत : ८००/-

प्रकाशन : **शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर**

## नाती मनातली

नाती मनातली जणू...
आर्जवी भडक जास्वंद!

नात्यांची आरास जणू...
मोगऱ्याचा मंद सुगंध!

नात्यांची मिजास जणू...
सोनचाफ्याची धुंद!

नात्यांचा बहर जणू...
पारिजातकी सडा बेधुंद!

नात्यांचा गोडवा जणू...
गुलाबी गोड गुलकंद!

नात्यांचा रुसवा जणू...
प्राजक्त अन् निशिगंध!

नात्यांचा दुरावा जणू
क्षितिज हे धरती-आसमंत!

नाती निभावणारे जणू
सर्वकालीन भाग्यवंत!

नात्यासाठी सर्वस्व अर्पिणारे
तेवढेच या धरेवरचे कुलवंत!

**- डॉ. संगीता जी. आवचार**




## बापाची दिवाळी

उधारीत

फटाके घेणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलानं
बापाला विचारला प्रश्न...
बाबा, खिशात दमडी नसताना
बार उडविण्याचा नाद का करायचा?
बापानं विचार केला...
एवढ्या मोठ्या सणाला नाही करायचा
आनंद साजरा, तर कधी...
अन् म्हणाला...
दिवाळी एकदाच येते भाऊ वर्षात,
पुन्हा नसतोच की आनंद...
बापजाद्यापासून करतो आपण दिवाळी साजरी.
मुलानं बापाला नाही केला प्रतिप्रश्न ;
पण मनाशीच बोलला
दोष बापाचा नाहीच...

**- माधव जाधव**

# आज-कालचे प्रश्न

**पंक्चरवाला**

## ऊस डोंगा परी मजूर नोहे डोंगा



महाराष्ट्रात दोन-तीन लाखांहून अधिक असलेल्या आणि पिढ्यान्पिढ्या ऊसतोडणी मजूर म्हणून काम करणाऱ्या मजुरांच्या कल्याणासाठी अखेर राज्य सरकार आणि साखर कारखाने यांनी निम्मा-निम्मा निधी गोळा करून तो मजुरांच्या कल्याणासाठी वापरायचा ठरवलं, हे बरंच झालं. ज्या दिवशी कारखान्यांतून साखर बाहेर पडू लागली, त्या दिवसांपासून मजुरांच्या अनेक मागण्या आहेत. त्यापैकी अजून काही मान्य व्हायच्या आहेत. साखरेचे उत्पन्न विक्रमी, उसाचे उत्पन्न विक्रमी, मजुरांची संख्या विक्रमी; पण मागण्या मान्य होण्याची गती गोगलगाईची आहे. मजुरांच्या अनेक संघटना जन्माला आल्या. पुढेही त्या येतच राहतील. ऊसतोडणी मजूर शक्यतो एकाच जातीतील आहेत. त्यांनी आपले श्रद्धास्थान सुंदर बनवले. आपल्या नेत्याला मंत्री बनवले. नेत्याच्या नातेवाईकांनाही मंत्री बनवले, स्वतः चा विकास मात्र त्यांना करता आला नाही. त्यांच्या विकासाचे प्रश्नही राजकारणात घालून त्याचा रस काढला जाऊ लागला. प्रत्यक्षात मजुरांच्या हाती फार काही भरीव पडत नव्हते. दरवर्षी मजुरांचा संप होतो. कारखाना सुरू होण्याची वेळ आणि संपाची हाक जुळूनच येते. चर्चा होते, तडजोड होते आणि मजूर कोयते घेऊन कामाला लागतात. मजुरांचा प्रश्न शेतकऱ्यांशीच जोडला गेलेला आहे, असे शेतकरी संघटना मानत नाहीत. शेतमजूर असोत, ऊसतोडणी मजूर असोत पण त्यांना शेतकऱ्यांच्या हितात वाटा कधी मिळत नाही. शेतकऱ्यांप्रमाणे मजूरही सातत्याने कर्जबाजारीच असतात. पण यांचे कर्ज माफ झाल्याचे ऐकिवात नाही. सर्वहारा बनलेला आणि संख्येने शेतकऱ्यांपेक्षा अधिक असलेला मजूर सातत्यानं उपेक्षेचा आणि पिळवणुकीचाच धनी बनला आहे.

ऊसतोडणी मजूर वर्षातले सात-आठ महिने उघड्यावर जगतो. स्थलांतर करत राहतो. धावणाऱ्या इंडियातील सोयी-सवलती किंवा विकास त्याच्यापर्यंत कधी पोहोचत नाही. उसाच्या काटेरी पानांबरोबर रात्रंदिवस झुंज देत जणूकाही या मजुराने चेहराच गमावलेला आहे. आता चेहरा नसलेल्याला कोण गिणणार, हाही प्रश्न आहेच. स्वच्छ भारत असो, तंटामुक्ती गाव असो, धावणारा देश असो, सुदृढ भारत असो, कोणी अमूलचं दूध पिणारा इंडिया असो; कशाशीचं त्याचा संबंध राहत नाही. चिंध्यांची पाले ठोकून राहणाऱ्या मजुराची पिळवणूक मुकादमापासून सुरू होते आणि मायबाप सरकारपर्यंत ती संपते. कोणीच त्याला वाली नाही. उसाशी झुंजणाऱ्या महिला मजुरांचे प्रश्न आणखी बिकट. उघड्यावरच त्यांचा संसार थाटलेला असतो. आरोग्याच्या कसल्याही सोयी त्यांच्यासाठी नसतात. महिलांचे म्हणून काही वेगळे प्रश्न असतात. त्याकडे कुटुंब, कारखाना, मुकादम किंवा सरकार यांपैकी कोणचेही लक्ष नसते. मासिक पाळीच्या काळात मजूर महिला दुर्बल होतात. काम करू शकत नाहीत. रोजगार बुडतो. मुकादमाकडे घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढते. नवऱ्यावर भार पडतो. अशा महिलांना कामावर पण घेतले जात नाही. अशा परिस्थितीत पाळीच दुष्मन होते, असे समजून गर्भाशय काढून टाकण्याचा प्रयत्न अनेक महिला करतात. डॉक्टराच्या हातावर बक्कळ पैसा ठेवतात आणि तोही कर्ज काढून. काही जण गावठी आणि जीवघेण्या औषधांचा वापर करतात. काही जणी दगावतातही. त्यांचा हा प्रश्न सोडवण्याचा विचार कोणी करत नाही; ना संघटना, ना सरकार. वर्षानुवर्षे हे असंच चाललं आहे. गर्भाशय काढून टाकणाऱ्या महिलांची संख्या वाढतेच आहे. खरे तर तीन दिवसांचा रोजगार देऊन ही अघोरी गोष्ट थांबवता येते, पण विचार कोण करणार? ज्यांना देव मानतात त्या मुंडे महामंडळानेही विचार केला नाही आणि संकोच बाळगून महिला आपला आवाज बंद करतात. यावर उपाय काय?

मजुरांच्या मागण्या म्हणजे केवळ अर्थकारण असे समजून चालणार नाही, तर त्यांनाही इतरांप्रमाणे आयुष्य असते, त्यालाही विविध कंगोरे असतात. मजुरांच्या मुलांसाठी असलेल्या साखरशाळांचे काय चाललेय, दवाखान्यांचे काय चाललेय, रेशन दुकानांचे काय चाललेय, त्यांना स्वयंपाकाचा गॅस का मिळत नाही, त्यांना भरपाईची तरतूद का नाही असे अनेक प्रश्न आहेत. ऊस वेडावाकडा असतो म्हणून मजुरांचे जीवनही तसेच असते असे समजून चालणार नाही. त्यालाही सरळ, सुंदर जीवनाची आस आहे. ती कशी पूर्ण करायची हा प्रश्न उसाच्या बांधावर किती काळ लोंबकळत ठेवायचा?

## गिरणी कामगारांच्या वळणावर एस.टी. कामगार

महाराष्ट्रात १९४८ मध्ये म्हणजे स्वातंत्र्यानंतर एक वर्षाने पहिली बस धावली ती पुणे-नगर रस्त्यावर. ती मुंबई राज्यातली होती. पुढे १९६० ला महाराष्ट्र स्थापन झाला, म्हणजे

स्वतंत्र राज्य झालं आणि एस.टी. महामंडळाची स्थापना झाली. बससेवा शासनाची, पण स्वतंत्र महामंडळातर्फे सुरू झाली. या सेवेचा विकास होत गाव तेथे एस.टी. पोहोचली. महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेची ती आर्थिक नाडी झाली. जेथे रेल्वेची कमी सोय आहे तेथे आणि जास्त सोय आहे तेथेही एस.टी. धाऊ लागली. महामंडळाने नफ्यापेक्षा जनतेची सोय महत्त्वाची मानली. विद्यार्थी, अंध-अपंग, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, राज्य शासनाच्या सन्मानाचे मानकरी आदी अनेक घटकांना स्वस्तात किंवा मोफत सेवा सुरू झाली. सवलतीतील प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. एखाददुसरा प्रवासी असला तरी डबल बेल वाजवत बसं धाऊ लागल्या. अतिशय दुर्गम भागातही त्या मुक्कामाला जाऊ लागल्या. शिक्षण, कृषी, औद्योगिक आदी अनेक क्षेत्रांत क्रांती घडण्यास एस.टी.चाही मोठा वाटा आहे, हे नाकारून चालणार नाही. १९४८ मध्ये मुंबई स्टेट रोड ट्रान्सपोर्ट या नावानं धावणारी बस आता राज्य शासनाचा उपक्रम म्हणून धावते आहे. महाराष्ट्रातील बससेवेचा व्याप खूपच मोठा आहे. १९ हजारांहून अधिक बस, एक लाखांहून अधिक कर्मचारी रोज २५-३० कोटींचा रोकडा महसूल आणि असंख्य बसस्थानके असा हा पसारा राजधानी मुंबईपासून आदिवासी भागातील वाड्या-पाड्यांपर्यंत पोहोचला आहे. महामंडळाला बरीच वर्षे एकाधिकारशाही पद्धतीने काम करता आले. तिला अन्य व्यवस्थांचे आव्हान नव्हते. खाजगी क्षेत्राने हळूहळू पाय पसरायला सुरुवात केली आणि आव्हान निर्माण झाले. अर्थात, शासनानेच अशी परवानगी दिली होती. रिक्षा, टेम्पो, जीप आणि थेट बस अशी पर्यायी खासगी व्यवस्था निर्माण झाली. ज्या रस्त्यावर अधिक नफा होतो, असे बहुतेक मार्ग खाजगीच्या घशात गेले. महामंडळ गाव तेथे एस.टी. हे व्रत चालवत राहिले. नवनवे कामगार कायदे झाले. एस.टी. कामगारांमध्ये त्याबाबत जागृती तयार झाली. सुमारे पन्नासेक संघटना तयार झाल्या. प्रत्येक संघटना कोणत्या ना कोणत्या पक्षाच्या, नेत्याच्या रंगात रंगली आहे. मागण्यांसाठी अधूनमधून आंदोलने होत राहिली, पण शंभरी म्हणजे शंभर दिवस पार करेल असे आंदोलन महाराष्ट्रात प्रथमच होते आहे. ऐतिहासिक आंदोलन म्हणावे असे ते आहे. महागाई भत्ता, घरभाडे आणि पगारात वाढ व राज्य सरकारमध्ये महामंडळाचे विलिनीकरण त्यांच्या या चार प्रमुख मागण्या आहेत. विलिनीकरण वगळता बहुतेक मागण्या मान्य झाल्या आहेत. पण विलिनीकरणाच्या मुद्यावर गाडे अडून बसले आहे. संपाच्या काळात अनेक कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. काही जण संपात मरण पावले. काहींनी आत्महत्या केल्या. काहींनी सामुदायिकरित्या आत्महत्येस परवानगी मागितली आहे. संप मिटण्याची चिन्हे दिसत नाहीत आणि दुसरीकडे, महामंडळ रोज तोट्याच्या चिखलात खोलवर रुतते आहे. रोज नऊ हजार कोटींच्या आसपास तोटा जातो आहे. प्रवाशांचे हाल होत आहेत. खाजगी व्यवस्था अधिक सशक्त आणि आक्रमक बनते आहे आणि दुसरीकडे, संपातील राजकारणही वाढले आहे. मुंबईतल्या गिरणी कामगार संपात झाले होते, अगदी तसेच घडते आहे.

मुंबईत बिगरकामगार असलेल्या म्हणजे पेशाने डॉक्टर असलेल्या दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली ऐंशीच्या दशकात गिरणी कामगारांचा संप सुरू झाला. एस.टी. कर्मचारीही आता



बिगरकामगार नेत्याकडे म्हणजे वकिलाकडे नेतृत्व घेऊन गेले आहेत. मुंबईतल्या गिरणी कामगार संपाने पारंपारिक कामगार संघटना मोडीत काढल्या होत्या. सामंतांना पाठिंबा देण्याशिवाय त्यांच्याकडे काहीच उरले नव्हते. आताही तसेच होते आहे. राजकीय पक्षांची म्हणजे बिगरसत्ताधारी पक्षांची तर पाठिंब्यासाठी स्पर्धाच सुरू आहे. गिरणी कामगारांचा संप कधीच मिटला नाही म्हणजे आज ४२ वर्षे झाली तरी तो कागदोपत्री चालूच आहे. गिरण्या बंद पडल्या किंवा पाडल्या गेल्या. तेथे मॉल उभे राहिले. कामगार देशोधडीला लागले. त्यांनी मुंबई सोडली. रोजगार हमीवर गेले. काहींनी पोट भरेना म्हणून आत्महत्या केल्या. मुंबईतील खोल्या विकल्या. पोटासाठी काहींच्या मुली आणि मुले वाम मार्गाला लागली. संप चालूच राहिला. १९९७ मध्ये कामगार नेता बनलेल्या सामंतांची हत्या झाली, तरी संप चालूच होता आणि आहे. कागदोपत्री संप सुरू आहे हे कुणालाच ठाऊक नाही. संप लढवायला नेता उरला नाही, संघटना उरल्या नाहीत. काही कामगारांनी हा विषय जीवंत ठेवला. संपावर पुस्तकं निघाली, नाटकं, चित्रपट निघाले. गिनीज बुकात त्याची नोंद झाली, पण संप सुरूच राहिला. आता एस.टी. कर्मचाऱ्यांचे तसेच होणार का आणि तसे होण्याच्या वळणावर संप निघाला आहे का, हा प्रश्न आहे. खाजगीकरण भरात आल्याच्या काळातील हा संप आहे. सरकार कल्याणकारी भूमिकेपासून दूर पळत रोज छोटे होत असण्याच्या काळात हा संप आहे. भारतात अनेक संप दीर्घकाळ चालले आहेत. म. गांधी, डॉ. आंबेडकर, कॉ. डांगे आदी अनेकांनी संप घडवले. हे जरी खरे असले तरी संप हातातून निसटू दिला गेला नव्हता. तो दिशाहिन होऊ दिला नव्हता. अगदी अलीकडेच जवळपास वर्षभर चाललेला शेतकऱ्यांचा संप विचारात घ्या. तोही भरकटवण्याचा प्रयत्न खूप झाला, नाही असे नाही. पण नेत्यांनी त्यावर पूर्ण नियंत्रण ठेवले होते. एस.टी. कामगारांच्या काही संघटनांनी संपातून माघार घेतली. ते कामावर रुजू झाले. काहींनी तसे करण्यास नकार दिला आहे, म्हणजे संपात गळती जोरात चालू आहे. तरीही हा संप रेटून नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. संपासंदर्भातील दोन बाजू म्हणजे संपकरी आणि व्यवस्थापन हे मूळ मुद्यांवरून अहंकाराचे, सूड घेण्याच्या विचारांचे बळी ठरतात तेव्हा मूळ मागण्या मागे पडतात. अहंकाराची टक्कर होऊ लागते आणि स्वाभाविकच मागण्यांच्या चिंध्या होतात. संप कधी सुरू करायचा, तो किती काळ चालवायचा, चर्चेच्या

टेबलावर कधी बसायचे, वाटाघाटीत नेमके काय करायचे, माघार कधी आणि कशी घ्यायची म्हणजे संप कधी बंद करायचा याची सर्व गणिते जाणत्या संघटना आणि नेता पाळत असतो. त्यात त्याला अपयश आले किंवा नसत्या अहंकाराची नशा त्याला आली, तर गिरणी कामगारांच्या संपासारखे चित्र तयार होते. कोणीही शहाणा लाकूडतोड्या स्वतः बसलेल्या फांदीवर घाव घालत नसतो. ढुंगणाखालची फांदी सुरक्षित ठेऊन घाव घालत असतो. आता हे सगळं झालं संपाची एक विधायक निती ठरवून लढणाऱ्यांविषयी. पण ज्यांना हे करायचं नाही, त्यांच्याविषयी काय बोलणार?

# एकीकडे विज्ञानाचा स्फोट, तर दुसरीकडे अघोरी प्रथा

जगभरातील महिला सक्षम व्हाव्यात, त्यांना आत्मसन्मान लाभावा, त्यांनाही माणूस म्हणून प्रतिष्ठा लाभावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तर दुसरीकडे या प्रयत्नांवर बोळा फिरावा यासारख्या अघोरी प्रथाही सुरू आहेत. म्हणजे उजेडाच्या हातात हात देऊन अंधारानंही फिरावं असा हा प्रकार आहे. जगभर अनेक ठिकाणी तो कधी उघड तर कधी अउघड स्वरूपात दिसतो. अंधार कधी कायद्यावर म्हणजे उजेडावर मात करतो, तर कधी उजेडाला चकवा देऊन स्वतः विस्तारत राहतो. मानवी जीवन असं अंधार आणि उजेडाच्या चक्रातून पुढं जात आहे. उजेड उघडणारे हातही भरपूर आहेत आणि तो अडवणारे हातही आहेत. संस्कृती, परंपरा, धर्म, रिवाज आदी अनेक प्रकारची आवरणे घेऊन अघोरी प्रथा टिकून राहतात. काही नव्याने तयार होतात. महिलांच्या बाबतीत त्यांचा दुय्यम दर्जा टिकून राहावा म्हणून, ती पापयोनी ठरवली गेलीय म्हणून आणि सततच तिला दाबून ठेवायचे म्हणूनही तिच्यासाठी अघोरी प्रथा तयार केल्या जातात. भारतात तिला कधी चेटकीण ठरवलं जातं, कधी योनी परीक्षेला सामोरे जाण्यास भाग पाडलं जातं, कधी बालपणीच बोहल्यावर चढवलं जातं, कधी संततीहीन म्हणून छळलं जातं, कधी निर्दोष आहोत हे सिद्ध करण्यासाठी जात पंचायतीसमोर उकळत्या तेलात हात घालायला लावलं जातं तर कधी हुंड्यासाठी जाळलं जातं. सरसकट या घटना घडत नसल्या किंवा दिसत नसल्या, तरी त्या अधूनमधून घडतात आणि समाज सुन्न होऊन जातो, चक्रावतो. वाढती कर्मकांडे, वाढता मूलतत्त्ववाद आणि वाढता पण आंधळा धर्मवाद अशा कितीतरी काटेरी कुंपणातून तिला प्रवास करावा लागतो किंवा त्यासाठी तिला भाग पाडलं जातं. प्रदेशानुसार, संस्कृती आणि धर्मानुसार या प्रथा-परंपरा बदलत जात असल्या तरी महिलांची अमानवी पिळवणूक हा एक समान घटक सर्वत्र असतोच.

पश्चिम आफ्रिकेत स्तनामुळे मुलगी आकर्षित होऊ नये किंवा तिला पाहणाऱ्यांच्या वासना उफाळून येऊ नयेत यासाठी जन्माला येणाऱ्या बहुतेक मुलींच्या स्तनांचे सपाटीकरण केले जाते. बीबीसी या नामवंत वृत्तसंस्थेने या प्रथेची पाळेमुळे खोदून काढली. मुळातच मागास मानल्या जाणाऱ्या आफ्रिकेत स्तन सपाटीकरणासाठी अगदी लहानपणीच क्रूर मार्ग अवलंबले जातात. गरम इस्त्री छातीवर



ठेवणे, काठ्यांनी छाती दाबणे, दगड-फरशांनी छाती दाबून ठेवणे आदी प्रकार करून छाती वाढणार नाही याची काळजी घेतली जाते. अशा दाबलेल्या किंवा दबलेल्या छातीचं दुःख वाटू नये म्हणून सपाट छातीला सौंदर्याचा दागिना बनवलं जातं. दबलेल्या छातीची स्त्री सुंदर मानली जाते आणि तिच्या वेदनानांही एक प्रकारे दाबूनच टाकलं जातं. छाती सपाट करून एका अर्थाने मुलीला कुरूप करण्याची ही प्रथा आधुनिक मानल्या जाणाऱ्या, स्त्रीमुक्तीचं माहेरघर मानल्या जाणाऱ्या युरोपमधील काही देशातही पोहोचली. या प्रथेला विरोध करणारे जसे आहेत, तसे पाठिंबा देणारेही आहेत. आपलं शरीर कसं ठेवायचं याचा अधिकार स्त्रीला आहे, असे सांगणारे आहेत. विशेष म्हणजे, अशा अघोरी प्रथांना विरोध करणारे कायदे अजून बऱ्याच ठिकाणी झालेले नाहीत. अन्य कायद्यांचा वापर करून या प्रथांना विरोध करण्याचा प्रयत्न चालू आहे. काही मुस्लिम राष्ट्रांत मुलाचा जसा सुंता करण्याची प्रथा आहे, तशीच मुलींसाठी 'खतना' करण्याची प्रथा आहे. बऱ्याच इस्लामी राष्ट्रांत खतना बंद करण्यासाठी कायदे झाले. इजिप्तमध्ये खतनाची प्रथा मोठ्या प्रमाणात होती पण तेथेही कायदे झाले, पण तरीही गुप्त स्वरूपात ही प्रथा चालू आहे. बालपणीच स्त्रीच्या जननेंद्रियाचं विच्छेदन करण्याच्या प्रक्रियेला खतना म्हणतात. या प्रथेला जोपर्यंत स्त्री सामोरे जात नाही किंवा खतना करून घेत नाही तोपर्यंत ती अपवित्र असते. लग्नासाठी पात्र नसते. अलीकडे ही प्रक्रिया मोठी फी घेऊन डॉक्टर करतात, हे धर्माचे काम आहे असे मानतात. ही अघोरी प्रथाही अनेक देशांत पोहोचली आहे. अर्थात, गुप्त स्वरूपात. अनेक मुली त्यात दगावल्या आहेत. काही अधू झाल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर प्रश्न तयार होतो आणि तो म्हणजे महिलांच्या वाट्याला येत असलेला हा छळ कधी आणि कसा संपणार? मूलतत्त्ववादी घटक या सर्व कृत्यांना धर्माचा, संस्कृतीचा मुलामा देतात. अनेक बाबतीत जबरदस्ती करतात. महिला राष्ट्रप्रमुख झाल्या, न्यायाधीश झाल्या, वैमानिक झाल्या, शास्त्रज्ञ झाल्या पण दुसऱ्या बाजुने त्यांच्याकडे अंधार फेकण्याचीही प्रक्रिया चालूच राहिली. स्त्री-पुरूष समान आहेत या तत्त्वाकडे जाण्याच्या मार्गात मूलमत्त्ववादी मोठा अडथळा ठरत आहेत. तो कसा संपवायचा, हाच प्रश्न सतत उभा असतो.

●●●

# कोण काय बोलतं



२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आंध्रप्रदेशात भाजपला एक कोटी मतं मिळाली, तर दारूची बाटली केवळ ७० रुपयांमध्ये उपलब्ध करून देऊ

**– एस.वीरराजू**
(आंध्रप्रदेशचे भाजप प्रदेशाध्यक्ष)



देशात लोकशाही आणि राज्यघटना धाब्यावर बसवून हुकूमशाही सुरू आहे. यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षितता आणि भीतीचे वातावरण आहे

**– सोनिया गांधी** (काँग्रेस अध्यक्षा)



वेगवान ओमायक्रॉन संसर्गाला घाबरू नका. फुफ्फुसात गेल्यानंतर डेल्टाच्या तुलनेत तो कमी गतीने पसरतो. महामारीचा अंत निश्चित आहे

**– डॉ. राम एस. उपाध्याय** (ब्रिटिश मेडिकल कौन्सिलचे माजी शास्त्रज्ञ)



आता ज्यांचे घोडे उधळत आहेत, त्यांना एकेकाळी शरद पवार यांनी वाचवलं आहे. त्यामुळे अशा लोकांनी राजकारणात मदांध हत्तीप्रमाणे वावरू नये

**– संजय राऊत**
(शिवसेनेचे राज्यसभा सदस्य)



विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर हे मुंबै बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत मजूर म्हणून कसे उभे राहू शकतात? याची चौकशी झाली पाहिजे

**– नाना पटोले**
(काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष)




आमदारांना तलाठी मोजत नाहीत, पोलिस अधिकारी तर आमचे फोनही घेत नाहीत. जिल्हाधिकारी आम्हाला दरवाजावर दोन-दोन तास बसवून ठेवतात, अशी आमची अवस्था आहे

**– भास्कर जाधव**
(शिवसेनेचे ज्येष्ठ आमदार)



मराठवाड्याच्या बोली भाषेत ठाशीवपणा असून कलावंतांनी आपल्या भाषेतच व्यक्त व्हावे. आपल्या बोलीभाषेने मला मोठे केले

**– मकरंद अनासपुरे** (चित्रपट अभिनेता)



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या घरवापसीचे वृत्त निरर्थक असून विरोधकांनी प्रसिद्धीसाठी केलेली ही व्यर्थ बडबड आहे

**– शेख रशीद अहेमद** (पाकिस्तानचे अंतर्गत व्यवहार मंत्री)



ऑस्ट्रेलियातील कसोटी मालिका विजय, इंग्लंडमध्ये दोन कसोटी विजयासह घेतलेली आघाडी आणि सेंच्युरियन मैदानावर जिंकलेला पहिला कसोटी सामना, यामुळे भारतीय क्रिकेटच्या इतिहासात हे वर्ष सुवर्णाक्षरात नोंदवले जाईल

**– के.एल. राहुल** (भारतीय कसोटी संघाचा उपकर्णधार)



'मल्हार'च्या भूमिकेत लोकांना मी आवडतोय, हे कळतेय. पण प्रेक्षकांचा आवडता होण्याबरोबरच मनोरंजनाद्वारे त्यांची सेवा करण्याची संधी अजून मिळावी ही अपेक्षा

**– सौरभ चौगुले** ('तुझ्यात जीव रंगला' मालिकेतील 'मल्हार')

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

